# संपर्क

दिवाळी २०२४

मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया



# Thanks to Our 2024 Platinum Sponsors


















# संपर्क

## दिवाळी अंक २०२४

**मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया**

# श्रेयनामावली

- **संपादक**
  पराग सहस्रबुद्धे
- **संपादन साहाय्य**
  श्वेता पाटील
- **शब्दांकन, देवनागरीकरण, मुद्रित शोधन**
  पराग सहस्रबुद्धे, अश्विनी खाडिलकर
- **रेखाटने**
  देवयानी गोखले
- **रेखाटने साहाय्य**
  विदुला नायगांवकर कुलकर्णी, श्वेता पाटील
- **अंक सजावट साहाय्य**
  शैलेश अरोरा, आकांक्षा म्हैसकर
  विदुला नायगांवकर कुलकर्णी
- **प्रकाशक**
  मराठी सोसायटी ऑफ बीसी (MSBC)
- **मुद्रक**
  ट्रीनिटी अकॅडमी, पुणे
- **मुखपृष्ठ**
  श्रुती देसाई

**२०२४ कार्यकारी मंडळ**

अध्यक्ष – अमित फडके

उपाध्यक्ष – देवयानी गोखले

कोषाध्यक्ष – शैलेश भाटे

सचिव – आकांक्षा म्हैसकर

सांस्कृतिक समिती अध्यक्ष – शैलेश अरोरा

सांस्कृतिक समन्वयक – संदिप कुलकर्णी

सांस्कृतिक समन्वयक – अश्विनी खाडिलकर

कार्यक्रम (इव्हेंट सेटअप) समन्वयक – विक्रम डाबरे

क्रीडा व बाह्य क्रियाकलाप समन्वयक – अक्षय गोरे

गुणवत्ता आश्वासन समन्वयक – हर्षदा नाईक

---

ह्या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील विचार आणि मते ही सर्वस्वी लेखक-लेखिकांची आहेत. त्या मतांशी संपादक आणि एमएसबीसी कार्यकारी मंडळ सहमत असेलच असे नाही. कृपया अधिकृत परवानगीशिवाय या अंकातील साहित्य पुनः मुद्रित करू नये ही नम्र विनंती. हा अंक आपल्या पुढे ठेवताना त्यात त्रुटी राहू नयेत यासाठी आम्ही विशेष काळजी घेतलेली आहे, तरीही आमच्या नजरचूकीने काही त्रुटी, मुद्रणदोष राहिले असल्यास आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. धन्यवाद!

आपले नम्र,
**संपादक मंडळ**

Copyright @ Marathi Society of BC

# संपादकीय

तिमिरातुनी तेजाकडे ने दीपदेवा जीवना, ज्योतीपरी शिवमंदिरी रे जागवी माझ्या मना,
दे मुक्तता, भयहीनता, अभिमान दे, दे लीनता, दे अंतरा शुभदायिनी मलयनिलासम भावना ।।

दिवाळी म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा सण, आपले कुटुंब, मित्रपरिवार ह्यांच्याबरोबर आनंद साजरा करण्याचा सण, आजच्या धकाधकीच्या काळात विसाव्याचे क्षण आणणारा सण! यंदाच्या वर्षीची दिवाळी बऱ्याच अर्थांनी खास आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे नुकताच आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषेचा समृद्ध वारसा आणि साहित्यिक परंपरा ह्यांचा हा सन्मान आहे! मराठी भााषेच्या वारश्याला पुढे घेऊन जाण्यात आता आपल्यालाही खारीचा वाटा उचलायचा आहे. दुसरं म्हणजे ह्या वर्षी भारतासह जगभरातल्या सुमारे ८० देशांमध्ये लोकशाहीचा सण म्हणजे सार्वत्रिक निवडणूका पार पडत आहेत. आपल्यासारख्या सामान्य नागरिकांना देशाच्या ध्येयधोरणांवर प्रभाव पाडण्याची संधी मिळते हे आपले भाग्यच! अतिशय उच्चपातळीवरच्या विजिगिषु वृत्तीचे दर्शन घडवणारा आणि त्याच बरोबरीने खिलाडूवृत्तीचे बाळकडू पाजणारा क्रिडामहोत्सव म्हणजे ऑलिंपिक आणि पॅराऑलिंपिक स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. अंतिम पदकसंख्या बघता आपली जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणजे भारत आणि कॅनडा ह्या दोन्ही देशांनी ह्या स्पर्धांमध्ये समाधानकारक कामगिरी केली असं म्हणता येईल. ह्याशिवाय विविध देशांच्या अंतराळ मोहिमा, सौरऊर्जा वापरामध्ये झालेली विक्रमी वाढ, सूर्यग्रहण, Aurora Borealis सारखी भौगोलिक आश्चर्य ह्यांनी हे वर्ष गाजतं आहे. पण हे झालं जागतिक पातळीवरचं!

वैयक्तिक पातळीवरही आपल्या सगळ्यांसाठी ह्यावर्षीची दिवाळी महत्त्वाची आणि आनंदाची आहे कारण यंदा आपल्या एमएसबीसीला तीस वर्ष पूर्ण झाली! २५ सदस्यांसह १९९४ साली सुरू झालेली आपली 'मराठी सोसायटी' आज तीस वर्ष पूर्ण करताना तीनशेपेक्षा जास्त सदस्य कुटुंबाना एकत्र जोडते आहे! ह्या सगळ्या वर्षांमध्ये कार्यकारी मंडळांच्या सदस्यांनी तसेच बाकीही अनेक सभासदांनी नि:स्पृहपणे, नि:स्वार्थीपणे केलेल्या कार्यामुळे आज आपण हा टप्पा गाठू शकलो आहोत. विविध कार्यकारी मंडळांनी कायम एमएसबीसीची उद्दिष्टे आणि हित जपत आपल्या परीने सातत्याने काहीतरी नवीन देण्याचा प्रयत्न केला, अनेक प्रयोग केले. त्यातले काही अव्याहतपणे सुरू राहिले, काही कालपरत्वे बदलत गेले, तर काही कालौघातात बंद झाले. 'जुने ते सोने' ही म्हण अन् 'जुने जाऊ द्या मरणा लागुनि' ही कविता यांत सांगड घालण्याची अवघड कसरत प्रत्येक कार्यकारी मंडळाने नक्की केली असावी. तिसाव्या वर्षपूर्तीनिमित्त ह्या दोहोंचा सुवर्णमध्य काढत आम्हीही एक प्रयोग ह्यावर्षी करत आहोत. मध्यंतरी काही वर्षं एमएसबीसी कार्यकारी मंडळांतर्फे 'संपर्क' ह्या नावाने बातमीपत्र चालवले जात असे. मराठीत टंकलेखन करणं आजच्या इतकं सोपं नसण्याच्या काळात काही अंक तर हस्तलिखित स्वरूपात प्रकाशित केले होते. यंदा 'संपर्क'चा अंक थोड्या वेगळ्या म्हणजेच दिवाळी अंकाच्या रूपात आपल्यासमोर सादर करत आहोत. मराठी माणसासाठी दिवाळी म्हणजे सुग्रास फराळ, पहाटेच्या थंडीत तेल उटणं लावून केलेलं अभ्यंग स्नान, आकाशकंदील-पणत्यांनी उजळून गेलेला परिसर, नवे कपडे, सजावट आणि त्याबरोबरच दिवाळी अंक सुद्धा! नरक चतुर्दशीच्या दिवशी पहाटे अभ्यंग स्नान झाल्यावर, देवदर्शन आणि फराळ उरकला की नुकतेच हाती पडलेले दिवाळी अंक वाचत बसण्यासारखं दुसरं सुख नाही. तुम्हांला आमचा हा प्रयोग कसा वाटला, हे जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

अनेक सभासदांचा ह्या अंकात सहभाग आहे. कथा, कविता, ललित लेख, आपल्या युवा सभासदांचे त्यांच्या अनुभवविश्वासंबंधीचे लेखन, या वर्षीच्या औचित्यानिमित्त 'एमएसबीसी आणि मी' ह्या विषयावरचे लेखन तसेच लहान मुलांनी काढलेली चित्र ह्या अंकात समाविष्ट आहेत. साहित्य प्रकार आणि विषय ह्यांचे वैविध्य असलेला हा अंक सर्वांना आवडेल अशी आम्ही आशा करतो. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे इथे शिकणाऱ्या आपल्या पुढच्या पिढीतल्या सभासदांनीही मराठीत लेखन करण्याचा आवर्जून प्रयत्न केला आणि तो उत्तमरित्या निभावला आहे. त्याबद्दल ह्या युवा लेखकांचे खूप कौतुक!

ज्या सर्वांचा ह्या अंकाच्या निर्मितीत हातभार लागला त्या सगळ्यांचे मनापासून आभार. ही दिवाळी आणि येणारे नवीन वर्ष एमएसबीसीच्या सर्व सभासदांना, प्रायोजकांना आणि हितचिंतकांना सुखासमाधानाचे, भरभराटीचे आणि आरोग्यपूर्ण जावो आणि येत्या वर्षांमध्ये एमएसबीसी प्रगतीचे नवनवीन टप्पे गाठत राहो अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

धन्यवाद.

# अध्यक्षीय

नमस्कार,

तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप शुभेच्छा. आपल्या मंडळाला ह्यावर्षी ३० वर्षं पूर्ण झाली आहेत. मागील काही वर्षांत आपल्या येथील मराठी समाज अनेक पटीने वाढला आहे. त्याचबरोबर यंदा आपल्या मंडळाने ३०० सभासद करण्याचा विक्रमी उच्चांक गाठला आहे.

३० वर्षांपूर्वी आपल्यापैकी काही जणांनी मराठी मंडळ सुरू केलं. त्यांच्या आणि त्यानंतरच्या सगळ्या कार्यकारी मंडळांच्या निःस्वार्थी आणि अथक परिश्रममामुळे आणि मराठी समाजाकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळेच आज आपल्याला हा टप्पा गाठणं शक्य झालं आहे. आपलं मंडळ लोकशाही पद्धतीने काम करतं. मग ती कार्यकारी मंडळाची निवडणूक असो अथवा निरनिराळ्या कार्यक्रमात भाग घेणाऱ्या उत्साही उमेदवारांची निवड असो. हेच आपल्या मंडळाचे वैशिष्ट्य आहे. आपलं मंडळ खऱ्या अर्थाने सभासदांचे असून सभासदांद्वारे चालवले जाते.

दरवर्षी नवीन कार्यकारी मंडळ नवनवीन संकल्पना घेऊन उत्साहाने पुढे येत आहेत. आपली किलबिल शाळा पुढच्या पिढीला मराठी शाळेच्या माध्यमातून एकत्र आणण्यास कारणीभूत ठरत आहे.

विविध विषयांत रस असणाऱ्या आपल्या रसिक सभासदांसाठी त्यांना रुचतील असे कार्यक्रम उदा.सांस्कृतिक, कला, क्रीडा आयोजित करण्याचे आपले ध्येय असते, आणि प्रत्येक सभासदास या कार्यक्रमात भाग घेण्याची समान संधी आहे.

आपल्या कार्यक्रमाचा दर्जा सुधारण्यासाठी आम्ही प्रत्येक मोठ्या कार्यक्रमानंतर आपला अभिप्राय घेत आलो आहोत. तुम्ही सर्व सभासद जे सहकार्य करीत आहात त्याचे आम्हास खरच कौतुक आहे आणि अशाच प्रकारे आपल्या मंडळाची कामगिरी आपण उच्च पातळीवर नेऊ शकू. आपण सगळे जण असेच एकत्र येऊन विविध कल्पना, कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून आपली मराठी संस्कृती टिकवून ठेऊया आणि परदेशात जन्मलेल्या/वाढणाऱ्या आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी कायम प्रयत्न करत राहूया! दिवाळीच्या तसेच एमएसबीसीच्या तिसाव्या वर्धापन वर्षाच्या पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा!

**– अमित फडके**

# BMM President's note

नमस्कार मंडळी :

मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियाच्या तिसाव्या वर्धापन दिनानिमित्त तुम्हा सर्वांचे हार्दिक अभिनंदन! १९९४ साली लावलेल्या छोट्याशा रोपट्याचे आता वृक्षामध्ये रूपांतर झालं आहे आणि पुढील पिढी आता जबाबदारी घ्यायला सज्ज झाली आहे. थोडक्यात, या वृक्षाला आता गोड फळं लागली आहेत असं म्हटलं तर अतिशयोक्ती वाटू नये.

हे असं म्हणायचं कारण म्हणजे मंडळाने गेल्या पाच वर्षात घेतलेली गरुड भरारी! या काळात वर्षाला सरासरी ३० वेगवेगळे कार्यक्रम आणि त्यात मिळालेला भरघोस प्रतिसाद! मंडळाने २०२१ साली पहिला मराठी चित्रपट, तसेच २०२३ साली पहिले मराठी नाटक आणून एक इतिहास रचला. कोविडमुळे मंडळाचा रौप्य महोत्सव जरा लांबणीवर पडला खरा, पण ५०० हून अधिक लोकांनी दाखवलेला भरघोस प्रतिसाद, हे तुमचे मंडळावर किती प्रेम आहे हे दाखवून देतं. तरुणाईला आकर्षित करणारा अजून एक उपक्रम म्हणजे ढोल ताशा पथक! आबालवृद्धांना ठेका धरायला लावणारा आणि गणेशोत्सवाच्या काळात सगळ्यांना एकत्र घेऊन येणारा हा कार्यक्रम संपूच नये असं वाटतं.

विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे मंडळाच्या नाट्य विभागाने गेल्यावर्षी सीमोल्लंघन करून थेट सियाटलपर्यंत धडक मारली आणि यावर्षी कॅलगरी आणि एडमिंटन येथे जाऊन तेथील नाट्य रसिकांचीपण मने जिंकली. या सगळ्या गडबडीत आपल्या पुढील पिढीला विसरून कसं चालेल? आपल्या भाषेची आणि संस्कृतीची जवळून ओळख करून देणारी संस्था म्हणजे 'किलबिल मराठी शाळा.' ही संस्था गेली १५ पेक्षा जास्त वर्षे कार्यरत आहे. शाळेसाठी काम करणाऱ्या सर्व शिक्षकांचे, पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करतो!

सगळ्यांच्या आवडीनिवडी बघून सर्वांना सामावून घेण्यासाठी क्रीडा, संगीत, नाट्य, मराठी साहित्य, फोटोग्राफी, आणि इतर गट तयार करून लोकांच्या कल्पकतेला आणि उत्साहाला चालना देण्यासाठी मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबीयाने केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

साता समुद्रापलीकडे येऊन आपल्यापैकी अनेक जण आता इकडचे झाले आहेत. आपली पुढील पिढी आता इकडे वाढत आहे आणि त्यांच्यासाठी आपण एक वेगळा 'भारत' इकडे तयार करत आहोत आणि हे करण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे तुम्हाला कोणत्याही प्रकारची मदत करायला मी आणि माझी समिती वचनबद्ध आहे.

सियाटल मध्ये २०२६ साली बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन होणार आहे आणि त्या अधिवेशनात 'मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबीया'चा जोरदार सहभाग असणार यात मला कोणतीही शंका वाटत नाही.

गेली तीस वर्षे विविध पदांवरून काम करणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांचे तसेच स्वयंसेवकांचे मी आभार मानतो आणि अभिनंदन पण करतो. त्याचप्रमाणे तुमच्या मंडळाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो यासाठी शुभेच्छा देतो.

जय हिंद - जय महाराष्ट्र!

- प्रसाद पानवळकर
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

# अनुक्रम


■ **आख्यान**

- सुसंस्कृत - प्रगती नाडकर्णी ७
- पत्र - निलेश अग्निहोत्री १७
- वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें-विद्युल्लेखा अकलूजकर ४७
- खुर्ची - एक सिंहासन - विवेक आस्वलकर ५३
- झुणका - केतकी पाटील पारखी ६०

■ **काव्यधारा**

- माणसं वाचताना - मंगला धुमे १६
- प्रवाह प्रपंच - सुहास कुलकर्णी २३
- लग्नानंतरचा वॅलेंटाईन डे - सोनाली एडके पिंपरकर २९
- रान - विदुला नायगांवकर-कुलकर्णी ५५
- MSBC ची दिवाळी - सुजाता परळकर ६२

■ **नवी क्षितीजे**

- माझा कॅम्पिंगचा अनुभव - अदिती काळुस्कर १४
- नवशिक्यापासून चॅम्पियनपर्यंत : राष्ट्रीय आणि जागतिक कराटे स्पर्धेतील यशाचा माझा प्रवास - निहारिका बाऊस्कर २१
- भरारी - अग्रजा डाबरे ५१
- When you see something, say something - स्वरा भाटे ५६

■ **मी आणि एमएसबीसी**

- मी, MSBC आणि किलबिल शाळा - देवश्री इंगळे ३२
- एमएसबीसी रौप्य महोत्सव! - स्वानंद काळुस्कर ३३
- साठवणी - शंकुतला रांगणेकर ३४
- मराठी सोसायटीतला माझा नृत्यप्रवास - प्रिया आजगावकर ३६
- एक अविस्मरणीय आठवण - अमित वैशंपायन ३८
- एमएसबीसी सभासदाची कहाणी - पराग सहस्रबुद्धे ४०
- खुल जा सिम सिम! - देवयानी गोखले ४३
- नाटकं करताना! - शैलेश अरोरा ४५

■ **अवती भवती**

- व्हॅन्कुव्हर - एक निसर्गकविता - यामिनी पाठक १०
- माझं जग - संजीवनी अभ्यंकर २७
- सफरनामा - हैदा ग्वाई - जगाच्या काठावर - अनघा सुरा ५८

■ **शब्दलिपी**

- गगन सदन तेजोमय - शैलेश भाटे २४
- कलाकृती नको पण प्रमोशन आवरा ..! - नेत्रा जोशी ४९
- बापजन्म - प्रणव साकुळकर ६३
- लग्न सोहळा - जयदीप खाडिलकर ६५

# सुसंस्कृत

• प्रगती नाडकर्णी •



एका प्रसिद्ध रिसॉर्टमध्ये निरीक्षक म्हणून माझा पहिला दिवस. मी रिसॉर्टच्या अंगणात काळ्याभोर आकाशात चमकणाऱ्या ताऱ्यांशी गप्पा मारत बसलो आणि शेकोटीच्या हलक्या उष्णतेने आराम वाटून खुर्चीवर झोपी गेलो.

मला इतकी झोप लागली की सकाळी दहा वाजेपर्यंत डोळे उघडले नाहीत. रविवार असल्याने मला उठवायलाही कोणी आले नाही. आंघोळ करून मी बाल्कनीत कोवळया उन्हाचा आनंद घेत होतो, इतक्यात एक २०-२२ वर्षांचा तरुण माझ्यासाठी कॉफी घेऊन आला आणि संकोचून म्हणाला, ''सर,...कॉफी!''

कॉफीचा कप घेताना मी विचारले. तू ''काल रात्री आलास का? नाव काय तुझे?''

''काशा.''

अरे तुझे पूर्ण नाव सांग.

''काशिनाथ, सर.

काही वैयक्तिक परिचयानंतर, काश्या माझ्याशी खुलून बोलू लागला.

माझ्यासारख्याच ग्रामीण वातावरणात लहानाचा मोठा झाल्यामुळे घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे उच्च शिक्षण पूर्ण करू न शकलेल्या आणि गरिबीशी झुंजणाऱ्या काशाच्या बोलण्यातली खोली मला चांगलीच उमजली.

डोंगराळ भागातले जीवन आपल्या कल्पनेपेक्षा बरेच कठीण आहे. साधनसंपत्तीपासून वंचित असूनही आधुनिक सुसंस्कृत समाजाशी ताळमेळ राखण्यासाठी अनेक त्याग करावे लागतात. त्यामुळे काश्या बद्दल माझी सदिच्छा आणि आपुलकी स्वाभाविक होती.

मी रोज काश्याला भेटायला आणि बोलायला उत्सुक होतो. तोही सुट्टी मिळताच किचनमधून कॉफीचा कप घेऊन यायचा.

बारावीत ८३% गुण मिळवूनही एक तरुण रिसॉर्टमध्ये भांडी धुण्यात आपला भविष्यकाळ घालवत होता. हे पाहून खूप वाईट वाटले. काश्या २-३ महिन्यातच रिसॉर्टच्या सर्व कामात पारंगत झाला होता. सगळ्यांच्या ओठांवर एकच नाव होतं; 'काश्या'.

दिवस भराभर सरत होते आणि पगार वाढण्याची वेळ आली. रिसॉर्टचा एकूण नफा अपेक्षेपेक्षा खूप चांगला होता. त्यामुळे मुख्य कार्यालयातून वेतनवाढीची मंजूरी मिळाल्यानंतर प्रत्येकाला १५ टक्के वाढीसह पगार देताना मलाही खूप बरे वाटले. या वाढीमुळे काश्या अतिशय खूश झाला होता आणि मला त्याची तितकीच काळजी वाटू लागली.

माझ्या चिंतेचे मूळ कारण होते, तुटपुंज्या बक्षीसावर खूप समाधानी असलेला काशा आणि त्याची जीव ओतून प्रामाणिकपणे परिश्रम करण्याची वृत्ती. मी निरिक्षक, ऑडिटर आणि आता अकाउंटंट केव्हा झालो ते मला कळलेही नाही. संपूर्ण रिसॉर्टचे सर्व व्यवहार माझ्याकडे असल्याने त्या जबाबदाऱ्या सोडून मुख्य कार्यालयात शहरात परतणे मला आता शक्य नव्हते. सकाळी ७ ते दुपारी ४ पर्यंतची आरामदायी नोकरी, स्वादिष्ट जेवण आणि संपूर्ण रिसॉर्टवर दबदबा, मलाही सोडवत नव्हते.

मला गावी भावाच्या लग्नाला जायचे होते. लग्न शनिवारी असल्याने मुख्य कार्यालयाने सुट्टी देण्याचे मान्य केले. शुक्रवारी संध्याकाळी मी मित्रासोबत गावाकडे निघालो. दोन दिवस गावातील वातावरणात स्वत:ला झोकून दिल्यावर जी शांतता मिळाली त्यामुळे मला रिसॉर्टमध्ये लगेच परत यावेसे वाटले नाही. मला गावात आणखी काही दिवस घालवायचे होते. अचानक मॅनेजरचा फोन आला. तो काश्या बद्दल भलतेच, वाईट-साईट बोलत सुटला.

''अहो साहेब! या एक नंबर च्या मूर्खाला कामावर ठेवले..., ढोंगी साला....'' त्याचे बोलणे चालूच होते. अस्वस्थ मन:स्थिती

मी त्याला तिथे पोहोचून सविस्तर बोलू असे सांगितले.

काशाची स्तुती करताना कधीही न थकणारा मॅनेजर आज त्याच्यावर इतका का रागावला? काश्याने असे काय केले असेल? प्रश्नांची यादी घेऊनच मी रिसॉर्टवर पोहोचलो.

संध्याकाळ झाली होती. आम्हाला येताना पाहून काश्या रिसेप्शनजवळून आमच्या दिशेने धावत आला. आज त्याच्या चेहऱ्यावर गहिरे दुःख होते, जणू काही तो मला भेटण्यासाठीच तिथे थांबला होता. माझ्याकडे येत तो मला म्हणाला – ''सर, मी काही केले नाही. ते काय सांगतात त्यावर विश्वास ठेवण्या आधी माझे एकदा ऐकून घ्या.''

मी काश्या च्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हणालो, माझ्यासाठी कॉफी आण, आपण खोलीत बोलू.

काही वेळाने काश्या आणि शेफ माझ्याकडे आले.

''सर, कॉफी!

मी काश्या च्या हातातून कॉफीचा कप घेतला आणि दोघांना बसायला सांगितले. दरम्यान, मॅनेजरही खोलीत आले आणि काशाकडे एक तिखट कटाक्ष फेकत गेल्या दोन दिवसांत काश्याने पाहुण्यांची काळजी घेण्यातच निष्काळजीपणा दाखवला नाही, तर शनिवारी संध्याकाळी झालेल्या पावसात जनरेटर चालू करून गेस्ट रूममध्ये बसवलेल्या सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांचेही नुकसान केल्याचे मला रंगवून सांगितले. व्यवस्थापकाने पुन्हा वाईट शब्द वापरण्यास सुरुवात केली.

शेफने काशाच्या बचावात तोंड उघडताच मॅनेजरने त्याच्याकडे डोळेझाक करायला सुरुवात केली.

मी काश्याला त्याची बाजू मांडण्यास सांगितले. तो अंतर्बाह्य दुखवला गेला होता. त्याने रिसॉर्ट सोडण्याचा निर्णय घेतलेला होता. मी काश्याला खूप समजावले आणि काही दिवस राहण्याची विनंती केली पण त्याने आधीच निर्णय घेतला होता. मुख्य कार्यालयही त्याला ठेऊन घेण्यास राजी नव्हते. त्यांच्याशी वाद घालणे व्यर्थ होते.

या घटनेने माझे मन अत्यंत अस्वस्थ झाले. मी इतर ठिकाणी अर्ज करू लागलो आणि एका जागतिक दर्जाच्या कंपनीच्या शहरातल्या कार्यालयात लेखापाल पदासाठी निवड झाली. मुख्य कार्यालयाने माझा पगार पुन्हा ३५% ने वाढवण्याचा प्रस्ताव ठेवत मला थांबवण्याचा प्रयत्न केला. याची माहिती मिळताच त्या दिवशी संध्याकाळी शेफ मला ऑफिसमध्ये भेटायला आला. शेफने मला सांगितले की मॅनेजरने काश्याला स्वतःच्या चुकीची शिक्षा दिली.

काश्याने काहीही केले नव्हते. मुख्य कार्यालयातून रिसॉर्टचे सीईओ तिथे आले होते ज्यांच्यासोबत मॅनेजर गेस्ट हाऊसमध्ये पार्टी करत होते. रात्री उशीर झाला होता आणि मॅनेजरने त्याला आपल्या रूममधून दारू आणण्यास सांगितले तेव्हा काश्याने दारू आणण्यास नकार दिला. व्यवस्थापकाने त्याला चांगलेच फटकारले. काश्या मनाविरुद्ध त्यांच्या खोलीत पोहोचल्यावर वीज गेली. गेस्ट रूमसाठी जनरेटर सुरू करणे धोकादायक ठरू शकते हे काश्या ला माहीत होते, त्यामुळे त्याने मॅनेजरला थांबवण्याचा प्रयत्न केला पण दारूच्या नशेत मॅनेजरने जनरेटर चालू केला त्यामुळे गेस्ट हाऊसचे संपूर्ण कनेक्शनच जळाले आणि काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळून खाक झाली. जनरेटर देखील जळाले.

मॅनेजर आणि सीईओला सत्य माहीत असूनही, झालेल्या नुकसानाचे खापर त्यांनी काशाच्या डोक्यावर फोडले.

काश्या बद्दल हे सर्व जाणून मला खूप दुःख झाले आणि मी कोणत्याही किंमतीत येथे न राहण्याचा निर्णय घेतला. कदाचित माझा भावनिक निर्णय चुकला असेल पण त्यावेळी मला रिसॉर्ट सोडणे योग्य वाटले.

माझ्या निर्णयावर मुख्य कार्यालय नाराज होते त्यामुळे शेवटी त्यांनी मला पगारवाढीसह मुख्य कार्यालयात पदभार स्वीकारण्याची ऑफर दिली, पण तोपर्यंत माझा निर्णय पक्का होता आणि तो बदलणे मला शक्य नव्हते.

एक महिन्याचा नोटीस पीरियड पूर्ण करून मी शहरात आलो आणि कामाला लागलो. यादरम्यान, मी काश्याला शोधण्याचा त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण अयशस्वी ठरलो. दिवस सरत गेले आणि काश्या, भूतकाळातील कथांप्रमाणे, आठवणींच्या पुस्तकात अस्पष्ट होत राहीला.

सुमारे चार वर्षांनी मला पुन्हा एकदा त्या भागात जाण्याची संधी मिळाली. मी आणि ऑफिसमधले इतर १० लोक. दिवसभराच्या प्रवासानंतर संध्याकाळी एका अतिशय प्रसिद्ध हॉटेलमध्ये पोहोचलो. रात्रीचे जेवण झाल्यावर मी असाच चौकीदाराशी बोलू लागलो. तेवढ्यात किचनजवळ काही आवाज ऐकू आले. पहारेकरी टॉर्च घेऊन त्यांच्याकडे गेला, पाठोपाठ मी पण धावत गेलो.

मला पाहून एक मुलगा माझ्याकडे सरकला. तो दुसरा कोणी नसून तोच शेफ होता ज्याने मला काश्या बद्दल सांगितले होते. त्याला पाहून मला खूप आनंद झाला, रात्री उशिरापर्यंत आम्ही शेकोटीजवळ बसून जुन्या काळाबद्दल बोलत होतो. जेव्हा मी काश्या बद्दल विचारले तेव्हा मला एवढंच कळलं की तोही शहरातच कुठेतरी आहे.

हॉटेलमधून बाहेर पडताना मी शेफला सांगितले, ''आपण त्याला शोधू या. तुला काही कळले तर मला फोन करून सांग आणि मला काही कळले तर मी तुला सांगेन.'' शेफने आणि मी मोबाईल नंबर एकमेकाना दिले.

जुन्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आणि मी काश्याचा शोध सुरू केला. जवळपास दोन महिन्यांनी, एके दिवशी मला शेफचा फोन आला, सर काश्याचा नंबर मिळाला, तो तुमच्याच शहरात आहे. तुम्हीच बोला.

मी अधीर होऊन फोन लावला. मी हॅलो म्हणताच त्याने मला ओळखले. माझ्या आनंदाला सीमा नव्हती.

तो माझा पत्ता घेऊन दोन-तीन दिवसांनी मला भेटायला घरी आला. रविवार होता, दोघांची सुट्टी. जेवणादरम्यान काश्या एका सरकारी खात्यात लिपिक म्हणून काम करत असल्याचे कळले. हे जाणून मला आनंदापेक्षा जास्त आश्चर्य वाटले. माफक उत्पन्नावर रिसॉर्टच्या मेहनतीच्या कामातही अत्यंत समाधानी असलेला, झाडा डोंगरात रमणारा हा तरुण सरकारी नोकरीसारख्या रुक्ष पर्यायाकडे कसा वळला?

न राहवून, उत्सुकतेपोटी मी काश्याला विचारले. आपल्या चार वर्षांचा संघर्ष सांगताना, काश्या भावूक झाला आणि म्हणाला, त्या दिवशी व्यवस्थापक आणि सीईओ यांनी ज्याप्रकारे रिसॉर्टमध्ये गावातील ठग, ग्रामीण, मूर्ख, इत्यादी अनेक शब्दांनी माझा वारंवार अपमान केला, तेव्हा मी ठरवले की हा मूर्ख स्वतःला त्यांच्यापेक्षा चांगला माणूस म्हणून सिद्ध करेन. पण आपल्या समाजाचे दुर्दैव आहे; इथे श्रीमंत असणे हीच सुसंस्कृत असण्याची व्याख्या आहे, मग त्यासाठी आयुष्यभर नैतिकतेचा गळा घोटावा लागला तरी चालेल.

संध्याकाळचा चहा झाल्यावर काशाने माझ्याकडून रजा घेतली, निरोप घेताना मी काश्याला मिठी मारली. नंतर बरेच बरेच दिवस विचार करत राहिलो की सुसंस्कृत असण्याचा अर्थ काय? शेवटी, खऱ्या आयुष्यात असंस्कृत, असंस्कारी कोण आहेत? काश्या की व्यवस्थापकांसारखे लोक? सत्ता आणि अहंकार माणसातला माणूस आणि त्याचे गुण ओळखण्याची कुवत पोखरून टाकतात हे आजचे दुर्दैव म्हणायचे.

# मंडळाविषयी बोलू काही - १९९४ ते २००४

- मार्च १९९४ - १५ कुटुंबांच्या पुढाकाराने, २५ सभासदांसह मराठी सोसायटीची स्थापना झाली. संस्थेला Marathi Cultural Society of B.C, (Canada) असं नाव दिलं तर डॉ. वसंत साकळीकर पहिले अध्यक्ष झाले.
- ऑक्टोबर १९९४ - श्री. समीर सुगवेकर आणि श्री. राज साळवी ह्यांनी संस्थेचे पहिले बोधचिन्ह (लोगो) तयार केले.
- ऑक्टोबर १९९५- डॉ. वाघ आणि श्री. रामदास फुटाणे ह्यांनी 'हास्यधारा' हा कार्यक्रम सादर केला.
- जुलै १९९६ - श्री. अतुल गोखले ह्यांनी इतर सभासदांना बरोबर घेऊन निधी उभारणीसाठी 'गीतधारा' हा कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम पुढेही काही वेळा सादर झाला.
- मार्च १९९७ - संस्थेच्या बातमीपत्राचे 'संपर्क' असे नामकरण करण्यात आले.
- जुन १९९८ - संस्थेचे अध्यक्ष श्री. गिरीश मुजुमदार ह्यांनी 'वॉकिंग क्लब' ह्या उपक्रमाची सुरूवात केली. त्याच वर्षी पुढे संस्थेने 'टेरी फॉक्स रन' मध्ये भाग घ्यायला सुरूवात केली.
- डिसेंबर २००० - श्री. समीर फडणीस ह्यांनी संस्थेची पहिली वेबसाईट तयार केली. संस्थेतर्फे ग्रंथालयाची सुरूवात करण्यात आली.
- जून २००४ - संस्थेतर्फे विविध सणवार तसेच सांस्कृतिक कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जाऊ लागले. दहाव्या वर्षपूर्ती निमित्त वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी श्री. गोपाळ मराठे ह्यांचा गीत रामायणाचा कार्यक्रम आयोजित केला गेला तसेच सभासदांना छोटसं स्मृतिचिन्ह देण्यात आलं.




# व्हॅन्कुव्हर - एक निसर्गकविता!!

• यामिनी पाठक •

कॅनडा हा उत्तर अमेरिकेतील एक भलामोठा नैसर्गिक सौंदर्याने नटलेला, समृद्ध व पाण्याने वेढलेला देश. कॅनडाचे ब्रीद वाक्य आहे. 'समुद्रापासून समुद्रापर्यंत'. इथले सगळे प्रदेश जंगलमय आहेत. जगातील मोठे गोड्या पाण्याचे तलाव इथे आहेत. कॅनडा म्हणजे 'पूर्ण लोकशाही' असं म्हंटलं जातं. इथे सगळ्या धर्माच्या आणि वंशाच्या लोकांना इथल्या नियमांच्या चौकटीत राहून व्यक्तिस्वातंत्र्य घेण्याची मुभा आहे. कॅनडाची राजधानी आहे 'ओटावा'. इतर प्रमुख शहरांमध्ये टोरोंटो, व्हॅन्कुव्हर, मोन्ट्रीयाल, कॅलगरी यांचा समावेश होतो. व्हॅन्कुव्हर हे पर्यटक आणि रहिवाशांना आकर्षित करणारं एक प्रगत, समृद्ध आणि राहण्यासाठी उत्कृष्ट शहर आहे. मुलगा-सून व्हॅन्कुव्हरला असल्याने आमचा मुक्काम इथे होता.

व्हॅन्कुव्हर कॅनडाच्या ब्रिटिश कोलंबिया प्रांतातील एक प्रमुख शहर आणि एक मोठे व्यापारी बंदर आहे. पश्चिमेला प्रशांत महासागर आणि पूर्वेला रॉकी पर्वतश्रेणी आहे. आजूबाजूला समुद्र, अनेक छोटी मोठी बेटं, मोठाले तलाव, पर्वत, सूचिपर्ण आणि मेपल वृक्षांनी वेढलेलं हे शहर नितांत रमणीय आहे. हवामान समशीतोष्ण, त्यामुळे पर्यटकांची वर्षभर गर्दी असते. उन्हाळ्यातला दिवस मोठा- पहाटे पाच ते रात्री साडेनऊ! तर हिवाळ्यात सकाळी आठ वाजता उजाडून संध्याकाळी चार वाजता सूर्यास्त होतो. इथले मोठमोठ्या पर्वतांच्या पायथ्याशी असलेले निळेशार मनमोहक विशाल तलाव तसेच पॅसीफिकमध्ये असलेली बेटं बघून थक्क व्हायला होतं. इथल्या निसर्गाचा प्रत्येक नजारा डोळ्यात न मावणारा. गडद हिरवा आणि निळ्याशार रंगात रंगवलेला. त्यात पायथ्याशी अनेक प्रकारची रंगीबेरंगी फुले आणि तुरे. 'जणू निसर्गकविता'!! सूर्योदय आणि सूर्यास्त तर अनोखा, अप्रतिम. क्षितिजावर अनेक रंगाची उधळण बघून वेगळीच अनुभूती येते. विशेषतः नारिंगी आणि गुलाबीच्या अनेक छटा. चंद्राची उभी कोर बघून, आपण एका वेगळ्याच जगात आहोत असं वाटतं. पौर्णिमेचा चंद्र तर फार सुंदर दिसतो. भलामोठा आणि तेजस्वी. इथला पाऊसही शांत. गडगडाट नाही, वादळ नाही, आवाज नाही. अगणित फुललेल्या फुलांसाठी बापाच्या मायेने संयमी, छान भुरूभुरू पडत राहतो.

व्हॅन्कुव्हर मोठमोठ्या पर्वतराजीने वेढलेलं आहे. तळाशी फ्रेझर नदी वाहते. ही ब्रिटिश कोलंबीयातील सर्वात लांब नदी जी 'रॉकी' पर्वतामधील 'फ्रेझर पास' इथून उगम पावते आणि जॉर्जीयाच्या सामुद्रधुनीला मिळते. फ्रेझर नदीवर अनेक सस्पेन्शन ब्रिज आहेत. काही नवीन पुलांचे काम चालू आहे. इथली सगळी घरं डोंगरउतारावर आणि झाडीने वेढलेली. हे शहर जंगलात आहे की जंगल शहरात आलंय तेच कळत नाही! बरीचशी घरे लाकडात बांधलेली स्वतंत्र मोठाले बंगले आणि कौलारु. उंच इमारती

त्यामानाने कमी दिसतात. घरांचा रंग काळा, पांढरा किंवा करडा. कदाचित इतर रंगांचं इथे वावडे असावे!

जवळपास अनेक बेटं आहेत. फेरी बोटीच्या उत्कृष्ट सेवेमुळे तुम्ही कोणत्याही बेटावर कमी वेळात, कमी पैशात पोहोचू शकता. सार्वजनिक वाहतूकीसाठी बस, मेट्रो व सी-बस उपलब्ध आहे. संस्कृती आणि सामाजिकदृष्ट्या वॅन्कुव्हर वैविध्यपूर्ण शहर आहे. येथे विविध भाषा, वंश, संस्कृती आणि धर्मांचे लोक एकत्र राहत असल्याने सगळ्या प्रकारचे आणि सगळ्या देशांचे खाद्यपदार्थ मिळतात. अनेक इंडियन, चायनीज, जपानीज, आफ्रिकन स्टोअर्स आहेत. मंदिर, गुरुद्वारा, चर्च आहेत. कॅनडासारख्या प्रगत देशात राहून विविध लोक आपली संस्कृती जोपसतात.

'सरी' हे इथले उपनगर, मुख्यत: भारतीय लोकवस्तीचे. इथे 'पायल बिझनेस सेंटर' हे भारतीय मार्केट आहे, जिथे पूजेच्या सामनापासून ते भारतीय कपड्यांपर्यंत सगळं मिळतं. तसेच इथे पाट्यासुद्धा पंजाबीत लिहिलेल्या. इथले लोकं 'फिटनेस' प्रेमी - चालत असतात, पळत असतात, जिमला जातात, हायकिंग / बायकिंग / कयाकिंग करत असतात. अनेक तलाव तसेच बिचेस आहेत ज्याच्या काठावर मोठाली पार्क्स आहेत. सुट्टीचा दिवस ते कोणत्यातरी पार्कमध्ये घालवणे पसंत करतात. पार्कमध्ये बारबेक्यू, स्विमिंग किंवा इतर खेळ खेळत असतात. टॅन होण्यासाठी तलावांच्या काठावर उन्हात उघडे पहूडतात. अनेक लोक ट्रेकिंग करणे पसंत करतात. 'आइस हॉकी' हा इथला लोकप्रिय खेळ.

आम्ही इथे आलो तो इथला उन्हाळा सुरू झालेला. रात्री नऊपर्यंत चकचकीत उजेड. आम्ही रोज संध्याकाळी वॉकला जायचो. रस्त्याच्या कडेने रंगींबिरंगी फुलं, रानफुलं, अनेक रंगांचे तुरे फुललेले. त्यांचे इतके विविध प्रकार आणि रंग बघून आश्चर्य वाटत होतं. हाताच्या ओंजळीत न मावणारे असंख्य रंगांचे मोठाले गुलाब बघून मन प्रसन्न होतं. सगळीकडे हिरवगार झालेलं. इथल्या घरांच्या पुढे आणि मागे मोठाली झाडं आणि सुबक फुलझाडं लावलेली. त्यांचेही असंख्य प्रकार. त्यात 'मॅपेल ट्री' तर जागोजागी. इथला कल्पवृक्ष!

'मॅपल ट्री' कॅनडाचा राष्ट्रीय वृक्ष जो कॅनडाच्या ध्वजावर विराजमान आहे, तसेच लष्करी रँक चिन्ह म्हणून मॅपल लीफ वापरले जाते जे 'सामर्थ्य आणि सहनशक्तीचे' प्रतीक मानलं जातं. या झाडाच्या सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे त्याच्या पानांचा बदलणारा रंग. शरद ऋतूत, पानं चमकदार लाल होतात, ज्यामुळे ते अतिशय सुंदर दिसते. मॅपलचा रस 'सिरप' तयार करण्यासाठी वापरला जातो. उद्याने, सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या कडेला मॅपलची लागवड केलेली त्यामुळे रस्त्याच्या सौंदर्यात कमालीची भर पडते.

व्हॅन्कुव्हरमध्ये युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया (UBC) आणि सायमन फ्रेझर युनिव्हर्सिटी (SFU) ही दोन प्रमुख विद्यापीठे आहेत. आम्ही एका शनिवारी UBC ला गेलो. खूप मोठी आणि निसर्गरम्य. थोडी उंचीवर वसलेली. तिथून समुद्राचा सुंदर नजारा दिसत होता. वॅन्कुव्हरमध्ये आणि जवळपास बघण्यासारखी अनेक ठिकाणं आहेत. स्टॅन्ली पार्क, व्हाईट रॉक पिअर, ब्रिटिश बे, ग्रॅनव्हिल आयलंड या ठिकाणांबरोबरच व्हिक्टोरिया, व्हिसलर, ब्रायडल फॉल आणि कल्टस, अलौएट लेकला आम्ही गेलो.

घरापासून अर्ध्या तासावर असलेल्या 'व्हाईट रॉकला पिअर'ला आम्ही संध्याकाळी पोहोचलो. तिथे समुद्राच्या काठाने सुंदर रस्ता बांधलेला. तिथून चालत पिअरला जायचं. हवेत सुखद गारवा होता. पिअरवरून समुद्राचा नजारा अतिशय सुरेख, डोळ्यात न मावणारा. निळ्याशार समुद्राच्या क्षितिजटोकाला भलेमोठे निळे डोंगर, एका बाजूला दूर बर्फाच्छदित माऊंट बेकर दिसत होता. 'बेकर' ध्यानस्त विरक्त योग्याप्रमाणे भासणारा. प्रवास करताना अनेकवेळा तो दर्शन द्यायचा, सोबत करायचा.

स्टॅनले पार्क हे इंग्लिश बेच्या किनाऱ्यावर व्हॅंकुव्हर शहराच्या मधोमध स्थित, एक भलेमोठे पार्क आहे. इथल्या प्रसिद्ध सीवॉलच्या बाजूने निळाशार समुद्र, मोठाले पर्वत, आकाश आणि झाडांचा निसर्गरम्य देखावा दिसतो. समुद्राच्या बाजूने काढलेली सुंदर नागमोडी पायवाट मनाला भुरळ घालते. इथे मोठं मत्स्यालय आहे. तसेच उंच उंच 'टोटेम पोल' बघायला मिळाले. टोटेमचा अर्थ 'गट किंवा कुटुंब.' हे स्थानिक लोकांच्या सांस्कृतिक वारसा, वंश, इतिहास, दंतकथा, व्यक्ती किंवा घटनांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि त्यांचे स्मरण करण्यासाठी तयार केलेलं स्मारक आहे. हे उंच खांब देवदार/लाल देवदार खोडापासून बनवतात. वेगवेगळ्या टोटेम पोल शैली आणि डिझाईन्स त्या त्या प्रांताच्या इतिहास, समृद्ध संस्कृतींच्या विविधततेची साक्ष देतात.

एका संध्याकाळी ग्रॅनव्हिल आयलंडला गेलो. ते पर्यटकांनी आणि फुलांनी फुललेलं. इथे मोठं मार्केट आहे. लोक खात, पीत, खरेदी करत इथल्या वातावरणाचा आनंद लुटत होते. इथून समुद्राचा छोटा भाग दिसत होता. आम्ही एका बोटीने इंग्लिश बेला गेलो. इथेही सुंदर नजारा. सूर्य अनेक रंग पसरवत क्षितिजावर टेकायला आलेला, डोंगराच्या पायथ्याशी निळेशार पाणी, कडेने जाणारा वळणाचा रस्ता आणि सुंदर हवा.

ब्रायडल व्हेल फॉल आणि कल्टस लेक - व्हॅन्कुव्हर

जवळच साधारण दिड तासाच्या अंतरावर फ्रेजर व्हॅलीमधला हा धबधबा आहे. हा वधूच्या बुरख्याप्रमाणे दिसतो त्यामुळे त्याचं नाव ब्रायडल व्हेल फॉल. अर्ध्या तासाचा ट्रेक करून आम्ही वर गेलो. उंचावरून पातळ पांढरा पडदा पडल्यासारखा हा धबधबा फारच सुंदर दिसत होता. त्यानंतर आम्ही कल्टस लेकला गेलो. हे लेकही निळाशार आणि डोंगरांनी वेढलेले. त्याच्या किनाऱ्यावर भली मोठी पार्क. तिथे लोकं सुट्टीचा आनंद मनमुराद लुटत होते. बार्बेक्यू, खाणं, पिणं, लोळणं, खेळणं, पोहोणं असे अनेक प्रकार उन्मुक्तपणे चालू होते.

विक्टोरिया- व्हिक्टोरिया हे आर्क्टिक द्वीपसमूहातील व्हॅन्कुव्हर बेटावरील एक शहर जी ब्रिटिश कोलंबीयांची राजधानी आहे. तीन साडेतीन तासाच्या अंतरावर आहे. आम्ही एक तास कारने प्रवास करून फेरी बोट घेतली. ही बोट प्रचंड मोठी. खालच्या मजल्यावर पार्किंग जिथे साडेतीनशे गाड्या सहज मावतात. कार पार्क करून वरच्या मजल्यावर गेलो. इथे बसायची, खायची प्यायची व्यवस्थित सोय. त्यावरती उघडा डेक. दीड तासाचा हा समुद्रातला प्रवास फार सुंदर!! डेकवरून निळाशार समुद्र, त्यामध्ये असलेली बेटं याचा अतिशय नयनरम्य देखावा दिसत होता. इथे पार्लमेंटची ब्रिटिश पद्धतीने बांधलेली अतिशय सुंदर आणि भव्य इमारत आहे.

बोटीतून उतरल्यावर परत कारने अर्ध्या तासाच्या अंतरावर असलेल्या 'मलाहात स्काय वॉक' गेलो. ६०० मिटर स्पायरल रॅम्प असलेला हा वॉक चढून गेल्यावर दूरपर्यंत समुद्र, माउंट बेकर, सॅनिच पेनीनसुला यांचा अतिशय मोहक देखावा दिसत होता. इथे गरुड उडताना दिसत होते. तिथून बुचार्ट गार्डनला आलो.

ही व्हिक्टोरियावरची ५५ एकर मध्ये लावलेली अतिशय सुंदर फुलांची आणि झाडांची प्रेक्षणीय बाग आहे. असंख्य प्रकारची फुलं, रानफुलं, मोठाले वृक्ष, शोभवंत पानांची झूडूपं, हँगिंग फुलं इत्यादी. अतिशय कलात्मकतेने लावली आहेत. जपानी, इटालियन, मेडिटेरिअन प्रकारच्या बागा आहेत. जपानीज गार्डन तर फार सुंदर. तसेच एक भली मोठी 'रोज गार्डन' आहे जिथे २५० प्रकारचे गुलाब लावलेले आहेत. या सगळ्याबरोबर अनेक लाकडी पूल, कृत्रिम तलाव, वॉटरफॉल, पुतळे, आणि म्युरल्सने अप्रतिम सजवलेली आहे. इतक्या प्रकारची फुलं आणि झाडं बघून थक्क व्हायला होतं. इथे जून ते सप्टेंबर उन्हाळा असतो. त्यामुळे इवली इवली रानफुलं आणि कितीतरी रंगांचे तुरे आपोआप उगवतात. त्याचे इतके प्रकार बघून खरंच डोळ्याचं पारणं फिटतं. बघायला चार-पाच तास सुद्धा कमी पडतात.

व्हिसलर हे ब्रिटिश कोलंबियामधील एक शहर आहे. इथे २०१० साली हिवाळी ऑलिंपिक झालं होतं. इथेच ब्लॅककॉम्ब आणि व्हिसलर हे दोन पर्वत आहेत. या पर्वतांच्या अल्पाइन भागात राहणाऱ्या मार्मोट्सच्या शिट्टी मारल्यासारख्या आवाजावरून या शहराला 'व्हिसलर माउंटन' हे नाव पडलं. हिवाळ्यात हे पर्वत पूर्णपणे बर्फाच्छदित असतात त्यामुळे स्किइंगसाठी हे ठिकाण अतिशय प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. तसेच उन्हाळ्यात हायकिंग, माउंटन बायकिंग आणि इतर साहसी क्रीडा प्रकारांसाठी प्रसिद्ध. ब्लॅककॉम्ब आणि व्हिसलर हे दोन पर्वत जरी एकमेकांपासून दूर असले तरी गोंडोलामुळे आपण त्याची शिखरे एका दिवसात लिलया पादाक्रांत करू शकतो. हा सगळा प्रदेश अनेक बेटांनी बनलेला आहे. प्रशांत महासागर आणि त्यात दुरून दिसणारी ही बेटं या पूर्ण रस्त्याने आपण बघू शकतो. निसर्गाने नटलेला हा रुद्रभव्य प्रदेश बघताना क्षणोक्षणी चकित व्हायला होतं.

व्हिसलर गावातून थोडं अंतर चालल्यावर पहिला गोंडोला आला. साधारण २० मिनिटांच्या प्रवासानंतर प्रथम 'ब्लॅककॉम्ब' पर्वताच्या शिखरावर पोहोचलो. गोंडोल्यातून वर चढत असताना खालचे अतिशय विलोभनीय दृष्य दिसत होतं. व्हिसलर शहर, दोन मोठे लेक (एक पूर्ण निळाशार आणि एक पाचू ग्रीन), आजूबाजूला असलेले मोठाले वृक्ष, जंगल, हिरवाईने नाटलेली कुरणं, आणि अगणित फुललेली इवली इवली रानफुलं. शिखरावर पोहोचल्यावर तर ३६० डिग्रीमध्ये दिसणाऱ्या सलग मोठाल्या, एका पाठोपाठ असलेल्या भव्योत्तुन्ग डोंगररांगा आणि त्याच्या टोकावर असलेलं बर्फ!! आपल्या डोळ्यात आणि कॅमेऱ्यात न मावणारं दृश्य माणसाच्या थिटेपणाची जाणीव करून देतं. इथला आल्हादायक थंडावा मन प्रसन्न करतो.

दुसरा गोंडोला 'पीक टू पीक' जातो. म्हणजे ब्लॅककॉम्ब पर्वताचे शिखर ते व्हिसलर पर्वाताचे शिखर(७१५६ फूट). दोन शिखराच्यामध्ये जंगलाने व्यापलेली खूप मोठी खोल दरी आहे. हा नजारा तर फारच चित्तथरारक ! असं वाटत होतं 'झुले उंच उंच माझा झोका.' दोन्ही डोंगरावर सगळीकडे उंच-उंच सूचिपर्णी वृक्ष, त्यांच्या पायथ्याच्यामधून वाहणारी शुभ्र हिमनदी, आजूबाजूला नजर जाईल तिकडे बर्फाने झाकलेल्या उंच पर्वत रांगा. गोंडोलातून दिसणारा हा नजारा चकित करत डोळ्याचं पारणं फेडतो ! व्हिसलरवर पोहोचल्यावर तर आजूबाजूला सगळा बर्फ आणि बर्फाच्छदित डोंगररांगा हे मन मोहवून टाकतात. सध्या उन्हाळा चालू असल्याने बर्फ वितळून पाणी वाहत होते. या वाहणाऱ्या पाण्याने एक सुंदर तळं निर्माण झालं आहे जे पूर्णपणे गडद निळं दिसत होतं. सगळंच

अद्भुत. उतरतांनाचा नजाराही तितकाच सुंदर! खालच्या कुरणावर अस्वलं चरताना दिसत होती.

गोल्डन इयर्स पर्वतांच्या पायथ्याशी 'अलौएट लेक' आहे जो एक अप्रतिम निसर्गचित्र बहाल करतो. इथली अवर्णनीय स्तब्धता आपल्याला स्तब्ध, अंतर्मुख करून जाते. हा लेक स्विमिंग, विंडसर्फिंग, बोटिंगसाठी लोकप्रिय आहे. इथून तीन चार किलोमीटर्सवर एक छोटी ट्रेल होती ती आम्ही केली. उंच उंच दाट जंगलातून जाणारी छोटी पायवाट. बाजूने खळखळत वाहणारी छोटी नदी. जंगलाच्या निरव शांततेत पाण्याचा मंजुळ आवाज आणि सुखद गारवा. ट्रेलच्या शेवटी एक छोटा धबधबा. सगळं फारच सुंदर.

व्हॅन्कुव्हर आणि आजूबाजूचा सगळा प्रदेश, आणि अख्खा ब्रिटिश कोलंबीयाच अगणित फुलं, रानफुलं, रंगीबेरंगी तुरे, गुलाब, अनेक जातींचे वृक्ष, फळं, भाज्या याने समृद्ध. इथे उणीव फक्त वासाच्या फुलांची. जाई, जुई, मोगरा, चाफ्याची. सफरचंद, केळी या फळांरोबर पीच, प्लम्स, ब्लू बेरीज, ब्लॅक बेरीज, स्ट्रॉबेरी फार छान मिळतात. दोन महिन्याच्या मुक्कामात नाईट मार्केट, डाऊन टाऊन, अनेक मॉल्स फिरलो. प्रशांत महासागर, निळेभोर स्तब्ध तलाव, विशाल डोंगररांगा, अभूतपूर्व हिरवाई, अनोखी रंगीबिरंगी फुलं, पार्क्स, गोजिरवाण्या जंगलवाटा!! बालकवी (औदुंबर, श्रावण मासी..), भा. रा. तांबे (पिवळे तांबूस ऊन कोवळे) यांच्या निसर्गकवितांची पदोपदी आठवण येत होती. त्यांनी कल्पिलेला निसर्ग प्रत्यक्ष अनुभवला. मनात आणि डोळ्यात जेव्हढं साठवता येईल तेव्हढं साठवून तृप्त मनाने पुण्याला परतलो.

# मंडळाविषयी बोलू काही - २००५ ते २०१४

- जून २००५ - संस्थेचे सभासद श्री. महेश साठे ह्यांनी सोसायटीचा 'याहू ग्रुप' सुरू केला.
- ऑगस्ट २००५ - संस्थेचे नाव 'The Marathi Society of B.C.' असे बदलण्यात आले.
- मार्च २००६ - श्रीमती सीमा चासकर ह्यांच्या प्रयत्नांना यश येऊन संस्थेला 'Charitable trust' चा दर्जा मिळाला.
- सप्टेंबर २००७ - इथे वाढणाऱ्या आपल्या पुढच्या पिढीला मराठी भाषेची गोडी लागावी म्हणून 'किलबिल' मराठी शाळेची सुरूवात झाली. श्रीमती वैशाली भिडे ह्यांनी मराठी शाळेच्या प्रमुखपदाची जबाबदारी स्विकारली.
- डिसेंबर २००९ - दिवाळी आणि ख्रिसमस पार्टी ह्या कार्यक्रमांना प्रथमच सव्वाशेपेक्षा जास्त मंडळींनी उपस्थिती लावली.
- मार्च २०१० - गुढीपाडव्याच्या निमित्ताने पहिल्यांदाच 'फन फेअर' आयोजित केले गेले. हा कार्यक्रम पुढे अतिशय लोकप्रिय झाला आणि सातत्याने सुरू आहे.
- मार्च २०१३ - संस्थेच्या सभासदांना ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे ह्यांना भेटण्याची संधी मिळाली.
- एप्रिल २०१४ - एमएसबीसीची द्विदशकपूर्ती साजरी करण्यात आली.

# माझा कॅम्पिंगचा अनुभव



• अदिती काळुस्कर •

ब्रिटिश कोलंबियामध्ये कॅम्पिंग ही गोष्ट उन्हाळ्यात लोकप्रिय आहे. मी आणि माझे आई बाबा दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत कॅम्पिंगला जातो. तंबू उभारण्यापासून, कॅम्पफायरभोवती जमणे आणि आकाशातील तारे पाहण्यासाठी उशिरापर्यंत जागणं, हे सर्व एक मजेदार आणि अविश्वसनीय अनुभव देतं.

गेल्या महिन्यात मी कल्टस लेकला कॅम्पिंग करायला गेले होते. आम्ही तंबू, झोपण्याच्या पिशव्या, अन्न आणि इतर गोष्टी पॅक आणि तयार केल्या. हे सर्व करणे खरोखरच खूप कंटाळवाणे आहे, परंतु यामुळे उत्साह वाढतो. सर्व सामान गाडीत टाकून आम्ही कॅम्पग्राउंडकडे निघालो.

कॅम्पग्राउंडमध्ये अनेक, अनेक कॅम्पसाइट्स होत्या. आम्ही आमच्या साइटवर पोहोचलो, जी दाट, उंच झाडे आणि भरपूर वनस्पतींनी वेढलेली होती. वेळ न घालवता लगेच मी आणि माझ्या बाबांनी तंबू लावायला सुरुवात केली. यासाठी आम्हाला थोडा वेळ लागला. तंबू हलू नये किंवा उडू नये म्हणून आम्हाला दांडी ठोकावी लागली आणि पावसापासून सुरक्षा व्हावी म्हणून रेन फ्लायर तंबूच्यावर ठेवलं. आम्ही ते पूर्ण केलं. त्यानंतर आम्ही गाद्य फुगवून व स्लीपिंग बॅग आणून तंबूच्या आत ठेवल्या.

थोड्या वेळाने संपूर्ण तंबू तयार झाला, आणि मग आम्ही नाश्ता केला. आम्ही गरम गरम मसाला चहा, बाकरवडी आणि बिस्किटांसह घेतला. तो स्वादिष्ट होता! कॅम्प ग्राउंड एक्सप्लोर करण्यासाठी तयार झाल्यानंतर आम्ही थोडा वेळ विश्रांती घेतली आणि तलावाकडे निघालो. कल्टस लेक आमच्या कॅम्प ग्राउंडला स्पर्श करत होता, म्हणून आम्ही तिथे जायचं ठरवलं. पाणी साहजिकच थंड होतं, पण आम्ही काही फोटो काढले.

कॅम्प ग्राउंड एक्सप्लोर केल्यानंतर, आणि तलाव तपासल्यानंतर, आम्ही परत आलो.रात्रीचे जेवण तयार करण्यास सुरुवात केली कारण आम्हा सर्वांना खूप भूक लागली होती. रात्रीचे जेवण झाल्यावर आम्ही साफसफाई केली. इथं उंदरांचा उपद्रव असल्यामुळे,बाहेर खाण्यापिण्याच्या वस्तू ठेवायच्या नसतात. मी माझ्या आईला काही भांडी धुण्यास मदत केली. शेवटी आम्ही सर्व सामान गाडीत ठेवलं आणि तोपर्यंत अंधार झाला होता. आम्ही कॅम्प फायर करण्याचे ठरवले. माझ्यासाठी कॅम्पफायर हा एक कॅम्पिंगचा रोचक भाग आहे. कॅम्पफायर करण्यासाठी, आम्ही काठ्या आणि कोरड्या फांद्या गोळा केल्या. आम्ही त्यांना कॅम्पफायर पिटमध्ये ठेवले आणि आग लावण्यासाठी लायटर वापरला. काही प्रयत्न केले, पण शेवटी काम झाले. आग पेटू लागली आणि सर्वत्र उष्णता निर्माण झाली. कॅम्पफायरमधे आम्ही स्मोर्स भाजले व त्यांचा आस्वाद घेतला. मार्शमॅलो शिजवताना आम्हाला खूप मजा आली. त्यानंतर कॅम्पफायरभोवती आम्ही गेम्स खेळले व गाणी

गायली. शेवटी आम्ही आग विझवली, आणि मग आमच्या आरामदायी तंबूत झोपायला गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी उठले आणि पक्ष्यांचे विविध आवाज ऐकू आले. खूप सुखद वाटले. आज लिंडेमन लेकची हाईक करायची होती. आमच्या कॅम्पसाइटपासून ५ किलोमीटरची हाईक होती. सकाळी साडेनऊच्या सुमारास आम्ही आमची हाईक सुरू केली. सूर्यप्रकाश आणि निळ्या आकाशाने दिवस छान होता. आम्ही हाईक सुरू केली आणि अचानक आम्हाला टाळ्यांचा आवाज ऐकू आला. आम्हाला वाटले कोणीतरी अस्वल पाहिले असावे. पण सुदैवाने तेथे अस्वल नव्हते. या भागात अस्वलांची वस्ती आहे आणि लोकांना इथे सहसा अस्वल दिसते. आम्ही खूप लवकर लेकला पोहोचलो. लेकच्या सौंदर्याने आम्हाला मंत्रमुग्ध केलं. लेकचा रंग निळा होता आणि पाणी इतकं स्वच्छ होत की आम्ही झाडे आणि पर्वतांचे प्रतिबिंब पाहू शकलो. खरंच ते एक सुंदर दृश्य होतं. काही छान फोटो काढून आम्ही तिथे थोडा वेळ घालवला. मग आम्ही कॅम्पसाइट्ला परतलो.

दुपारचे जेवण उरकून आम्ही काही वेळ विश्रांती घेतली. मग आम्ही आमच्या कॅम्पग्राउंडजवळ असलेल्या लेकवर जाण्याचं ठरवलं. आम्ही तिथे थोडा वेळ घालवला, पाण्यात खेळलो आणि मजा केली. आम्ही सगळे दमलो होतो. आम्ही रात्रीचं जेवण बनवलं आणि ते लवकर जेवलो आणि मग आम्ही सगळे झोपायला गेलो.

तिसऱ्या दिवशी सकाळी पावसाला सुरुवात झाली. पावसाच्या आवाजाने मी जागी झाले. टीप टीप टीप असा थेंबांचा आवाज ऐकू येत होता. त्याने मला संपूर्ण वेळ जागं ठेवलं. पावसामुळे आम्ही ९ पर्यंत तंबूत होतो. पाऊस हळूहळू थांबला आणि आम्ही आमच्या तंबूतून बाहेर पडलो. तंबूतून बाहेर पडताच सर्वत्र पाणीच पाणी होते. आम्ही सर्वांनी पावसाळी जॅकेट घातली. आम्ही गरमागरम चहा आणि पोहे केले. कव्हर घेतले आणि कडक चहासोबत मस्त गरम पोहे खाल्ले. पावसात गरमागरम पदार्थ खायला खूप छान वाटत होतं. आज आम्ही घरी जात असल्याने आम्हाला पॅक अप करावे लागले. तंबू पावसाच्या पाण्याने आच्छादलेला होता आणि त्यावर थोडा चिखल असल्याने तो साफ करणं खूप अवघड होतं. कसा तरी, आम्ही संपूर्ण तंबू बांधल्यावर घरी निघालो.

कॅम्पिंगचा एकंदरीत अनुभव अविस्मरणीय होता. पक्ष्यांच्या आणि निसर्गाच्या आवाजाने जागे होणे, पाण्यात वेळ घालवणे, हाईक करणे, आणि पावसात कॅम्पिंगचा आनंद अनुभवणे, हे खरोखर रोचक होते. मी पुढील वर्षी कॅम्पिंगसाठी उत्सुक आहे.

# हास्यकट्टा

१) एकदा धर्मेंद्रच्या घरी चोर शिरतात. तो ओरडतो,
कुत्ते-कमीने ! मग ते कमी नेतात.

२) एक गरोदर बाई डॉक्टरकडे जाते, डॉक्टर तिला विचारतात,
कितवा महिना ?? बाई म्हणते आठवा
डॉक्टर म्हणतात , मी कसा आठवू तुम्हीच सांगा.

३) एकदा एक स्पॅनिश माणूस डोंबिवलीत येतो.
स्पॅनिश माणूस : ''होला!''
डोंबिवलीकर : ''बोला!''

४) एकदा राजा राणी पत्ते खेळत बसलेले असतात, राणीला तहान लागते, राजा सेवकाला हाक देतो'
''कोण रे तिकडे, पाणी आण''
सेवक : ''मी! महाराज.''
राजा : ''तू महाराज तर मी कोण''
सेवक : (घाबरत) ''हे घ्या''
राणीला थोड्या वेळात भूक लागते.
राजा : ''कोण रे तिकडे''
सेवक : (मागच्या अनुभवानंतर) ''काय हुकूम आहे महाराज?''
राजा : ''अमम्.. किल्वर!


५) एक कुत्रा मांजरीच्या प्रेमात पडला. पण
कुत्र्याच्या घरच्यांनी नकार दिला. कुत्र्याने कारण
विचारले तर म्हणाले कि, ''मुलीला मिश्या आहेत..''

६) दम बिर्याणी म्हणजे काय ??
रात्रीच्या शिळ्या भाताला सकाळी फोडणी देऊन
दम देत नवऱ्याला खायला लावणे म्हणजे ''दम बिर्याणी''

७) देव - मी तुझ्यावर प्रसन्न आहे. काय पाहिजे?
गण्या - पैशांनी भरलेली इरस, नोकरी आणि
एक मोठ्ठी गाडी ज्यामध्ये खूप सुंदर मुली असतील.
देव - तथास्तु
(गण्या आता कंडक्टर आहे)

# माणसं वाचताना


• मंगला धुमे •



मी हल्ली पुस्तकं नाही माणसच वाचते.
पुस्तकं झालीयेत महाग आणि माणसं झालीयेत स्वस्त.
शिवाय सगळीकडे काय उपलब्ध असतातच माणसं.
बरीचशी चटकन वाचून होतात.
कधी कधी मात्र खूप वेळ लागतो.
काही तर आयुष्यभर कळत नाहीत.

सगळ्या विषयांची, सगळ्या साइजची माणसं.
छोटी माणसं, दुसरी माणसं,
दूर गेलेली माणसं, जवळची माणसं,
कोरडी माणसं, भावूक माणसं,
बोलकी बडबडी, बोलघेवडी माणसं,
निमग्न, तिरसट, फटकळ, मुडी माणसं,

पाठीवर थाप मारणारी, हातावर टाळ्या देणारी,
थरथरत्या हाताने घट्ट धरून ठेवणारी माणसं,
मोजकं बोलणारी, कविता जगणारी माणसं,
डोळ्यांनी खूप काही बोलणारी माणसं,
काहींच्या वेष्टनात मजकूर नसतो,
काहींच्या मजकुरात विषय नसतो.



वर्षामागे वर्ष पानं जातात गळत,
काहींची प्रस्तावनाच नाही संपत.
पुस्तकांच एक बरं असतं,
कितीही काळ गेला तरी मजकूर कधी बदलत नाही.



# पत्र

• मूळ कथा •
Letter From Elaine
(लेखक: पुष्पक कर्णिक)

• मराठी रूपांतर •
निलेश अग्निहोत्री

दाराजवळ जराशी खुडबूड झाली आणि हात पाठीमागे बांधून खिडकीतून बाहेर बघत असलेल्या नानांची तंद्री भंगली. नकळत त्यांची नजर भिंतीवरच्या घड्याळाकडे गेली. सव्वाअकरा वाजले होते. नानांनी अधीरतेने दाराकडे पाहिलं. पण दारात कुणीच उभं नव्हतं. चाळीतल्या चार घरं पलिकडच्या बिऱ्हाडातलं मांजर खुडबूड करत होतं.

''आजही कसा आला नाही सकपाळ? खरंतर सोमवारी अकराच्या ठोक्याला, 'नाना, तुमचं पत्र!' असा आवाज कानावर पडतो त्याचा'' असा विचार त्यांच्या मनाला चाटून गेला आणि त्यांना एकदम खिन्न वाटू लागलं.

सकपाळ पोस्टमनचा वक्तशीरपणा हा त्याच्या स्वतःपेक्षाही जास्त त्या चाळीच्या अभिमानाचा विषय होता. म्हणूनच त्याला चोवीस तासांपेक्षा अधिक उशीर व्हावा याची नानांना खंत वाटत होती. पण त्यापेक्षाही ते अधिक अस्वस्थ झाले होते ते दर सोमवारी नियमितपणे हातात पडणारं पत्र अजूनही न मिळाल्यामुळे. दर सोमवारी आणि गुरुवारी येणारी पत्रं, हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला होता. पण या आठवड्यात काही वेगळंच घडलं. त्यामुळे अद्याप सोमवार उजाडलाच नाही असं त्यांना वाटत होतं.

गिरगावातल्या या जुन्या चाळीत नानांनी आपल्या आयुष्याची तब्बल पन्नास वर्षे काढली होती. ते निवृत्त होऊनच आता पंधरा वर्षांहून जास्त काळ लोटला होता. चाळीत तिसऱ्या मजल्यावर कोपऱ्यातलं घर नानांचं. दोनच खोल्या. बाहेरच्या खोलीला असलेल्या खिडकीसमोर त्यांचं आवडतं टेबल होतं. चाळीतलं कोणी त्यांच्या घरात डोकावलं तर नाना टेबलापाशी बसूनच काहीतरी वाचत किंवा लिहित बसलेले किंवा उभ्याने खिडकीतून बाहेर पाहताना दिसत. रोजच्या जेवणाचा डबा तळमजल्यावरच्या निमकरांकडून येत असे. संध्याकाळचा थोडा वेळ ते जवळच्या एका बागेत फेरफटका मारून येत. त्यामुळे तसं म्हटलं तर त्यांच्या एकसुरी आयुष्यात पत्र हाच काय तो एक विरंगुळा होता.

पण काल पत्र आलंच नाही. त्यामुळे नानांना एक दिवस वाया गेल्याची एक अनोळखी जाणीव होत होती. सकपाळ पोस्टमन खरंतर वरच्या मजल्यावरच्या सर्वांची पत्रं तळमजल्यावरच्या प्रधानांकडे देत असे. नाना मात्र याला अपवाद होते. तीन मजले चढून सकपाळ स्वतः नानांचं पत्र खुद्द त्यांच्या हातात देत असे. कदाचित काल सकपाळ गडबडीत असेल आणि आपलं पत्रसुद्धा त्याने प्रधानांकडेच ठेवलं असेल असं त्यांना वाटलं. त्यांनी प्रधानांकडे तशी चौकशीसुद्धा केली. पण काल सकपाळची फेरीच झाली नव्हती असं नानांना कळलं. कशाचीतरी वाट बघण्याची त्यांना आता सवयच राहिली नव्हती.

****

दुपारी तीन वाजता दारावर थाप पडली. सकपाळ दारात उभा होता.

''नाना!'' सकपाळ म्हणाला. ''हे तुमचं पत्र.''

नानांनी पाकीट हातात घेतलं. त्यांची नजर त्या पाकिटावर खिळली असतानाच सकपाळचे शब्द त्यांच्या कानावर आले.

''अहो नाना, काल आमच्या पोस्टात नवीन साहेब आला. त्याने सगळा घोळ झाला आणि कालची डिलिवरी आजवर पडली.''

नानांचा काहीच प्रतिसाद आला नाही. ते एकाग्रतेने हातातल्या पत्राकडेच बघत होते. नानांनी नजर वर केली तेव्हा त्यांना आपली झोळी सावरत जाणारा पाठमोरा सकपाळ दिसला. त्यांनी हलकेच दार ओढून घेतलं आणि ते टेबलापाशी खुर्ची सरकवून बसले. हळुवारपणे त्यांनी पाकिटावरून हात फिरवला. त्या पिवळ्या पाकिटावरचा त्यांचा पत्ता, डकवलेलं पोस्टाचं तिकिट, पोस्टाचा शिक्का हे सगळं नेहमीचच होतं. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं. नानांनी डोळे मिटले आणि एक दीर्घ श्वास घेतला. त्या पाकिटाचा एक अनामिक गंध त्यांना प्रफुल्लित करून गेला. अलगदपणे त्यांनी पाकीट फोडलं. आतली कागदाची घडी बाहेर काढून त्यांनी ती उलगडली. नेहमीसारखाच पांढराशुभ्र कागद. त्याची डावी बाजू दुमडूनच समास तयार केलेला. ते बघून नानांना वाटलं, काही गोष्टी कधीच बदलत नाहीत....बदलूही नयेत!

****

*प्रिय वसंत,*

*नानांनी उजव्या हाताच्या बोटाने नाकावर घसरलेला चष्मा वर सरकवला आणि पुढे वाचायला सुरुवात केली.*

*डोळ्यात प्राण आणून मी तुमच्या पत्राची वाट पाहत असते. तुमचं पत्र हातात पडल्यावर आणि ते वाचल्यावर होणारा आनंद वर्णन करायला दर वेळी नवे शब्द आणू तरी कुठून?*

*दुसऱ्या मजल्यावरच्या जोशींच्या सवितेचं लग्न दोन दिवसांपूर्वीच झालं असेल नाही? चाळीत नुसती धावपळ उडाली असेल. प्रत्येकाला स्वतःच्या घरच्या कार्यासारखीच पर्वणी ती! मला इथे मुळीच चैन पडत नव्हतं. मी येणारही होते. पण सूनबाईची प्रकृती बिघडली. अंगात चांगला दोनपर्यंत ताप होता. शिवाय अशक्तपणाही. अशात तिला आणि दोन नातवंडांना सोडून कशी येऊ? त्यातच स्वयंपाकीणबाईंनी रजा घेतली. माझी धावपळ काही विचारू नका.*

*आपल्या प्रमोद काणेकरने आता शेजारच्याच इमारतीत जागा घेतली आहे. चाळीत तो आणि विजय एकत्र खेळले आणि आता त्या दोघांची मुलं एकत्र खेळताना बघून ऊर भरून येतो. लहानपणी हा प्रमोद नुसता दंगा करायचा. त्याची आई बिचारी रोज याने केलेले उपद्व्याप निस्तरत असायची. हा मुलगा कधी अभ्यास करून डॉक्टर होईल असं तेव्हा कोणी भविष्य सांगितलं असतं तर विश्वास बसला असता का? पण आता एक बरं झालं, घरचाच डॉक्टर जवळच्या जवळ आहे. परवा मला तपासून गेला. म्हटलं ''अरे, मला कशाला तपासतोस? आता या जुन्या यंत्रात काही बिघाड झाला तरी दुरुस्त करून काय उपयोग?'' तशी म्हणाला, ''अहो माई, तुम्हाला धडधाकट राहिलंच पाहिजे. तुमच्या हातच्या पुरणपोळ्या कायम खायला मिळाव्यात म्हणून करतो आहे मी हे सगळं!'' आता काय बोलायचं त्याला?*

*काल आम्ही सगळे समुद्रावर गेलो होतो. तिथे वागळेअण्णा आणि ताई भेटल्या. खूप दिवसांनी भेट झाली. मग काय? चाळीतल्या जुन्या दिवसांच्या आठवणी रंगवण्यात वेळ कसा गेला ते कळलंच नाही. चाळीतल्या गॅलरीत रंगणारे पत्त्याचे डाव, हळदीकुंकु, युद्धाच्या काळात ब्लॅक-आऊट असताना कोणाच्यातरी घरात गुपचूप ऐकलेला रेडिओ, नेहमीची भांडणं...एक ना अनेक. आम्हाला किती बोलू आणि किती नको असं झालं होतं. वागळेअण्णा तुमची चौकशी करत होते. तुम्ही असता तर...असो.*

*आपल्या खिडकीतून दिसणारा गुलमोहर हळूहळू बहरायला लागला हे वाचून कसं प्रसन्न वाटलं. इथे खिडकीतून असं काही दिसत नाही. दिसतात त्या नुसत्या इमारती. असो.*

*तुम्ही स्वतःची काळजी घ्या. प्रमोदने तुम्हाला लिहून दिलेल्या गोळ्या वेळच्या वेळी घेत जा. तुम्हाला गोळ्याऔषधांचं वावडं आहे हे मला ठाऊक आहे. पण आता हट्टीपणा करण्याचं आपलं वय राहिलेलं नाही. तेव्हा प्रकृतीला जपा.*

*तुमचीच,*
*वसुधा*

****

समोर धरलेल्या कागदावरची अक्षरं धूसर दिसायला लागली आणि नानांनी चष्मा काढून डोळे टिपले. पत्राची व्यवस्थित घडी

घालून ते पत्र पुन्हा पाकिटात ठेवून त्यांनी ते टेबलाच्या डावीकडच्या खणात जपून ठेवलं. माईंच्या, त्यांच्या वसुधेच्या आठवणीनं नानांना गहिवरुन आलं. आयुष्यात अनेक कडूगोड प्रसंगात माई त्यांच्या भागीदार होत्या. मुळातच हट्टी आणि बंडखोर असलेले नाना गावाकडच्या एकत्र कुटुंबातून बाहेर पडून नोकरीसाठी मुंबईला आले तेव्हा त्या दोघांना एकमेकांचाच आधार होता. त्यांचा संसार चाळीतल्या दोन खोल्यांमध्येही माईंनी हौसेने सजवला होता. माईंशिवाय नानांचं अजिबात पान हलत नसे आणि त्या जवळ नसल्यामुळे नानांना असहाय, अपूर्ण असल्यासरखं वाटायला लागलं. थोडा वेळ ते आपल्याच तंद्रीत खिडकीबाहेर गुलमोहराकडे पाहत राहिले. मग त्यांना अचानक जाणीव झाली, आज मंगळवार. म्हणजे लगेच पत्र लिहून पोस्टात टाकलं पाहिजे तरच आपलं पत्र वेळेवर पोहोचेल. नानांनी डोळ्यावर चष्मा चढवला. त्यांनी टेबलाचा उजवीकडचा खण उघडला. त्यातून त्यांनी एक पोस्टकार्ड बाहेर काढलं. घड्याळाकडे सहज नजर टाकत ते घाईघाईने लिहू लागले.

*प्रिय वसुधा,*

*काल कितीतरी वेळ मी बहरलेला गुलमोहर बघत खिडकीत बसलो होतो. तू बरोबर असताना हाच गुलमोहर केवढा वेगळा दिसतो. तुला आठवतं, आपण जेव्हा या चाळीत रहायला आलो तेव्हा हा गुलमोहरही तारुण्यातच होता, आत्ताएवढा डेरेदार झाला नव्हता. या झाडावर दिवसभर पक्षांचा नुसता किलबिलाट चालायचा. क्वचित कधी कोकिळासुद्धा येऊन बसायची. फांद्यांवर कावळ्याची घरटी असायची. त्यात इवलीशी पिल्लं बघताना किती छान वाटायचं. आपल्या खिडकीवर चिमण्या तर हक्काने येऊन बसायच्या आणि त्यांच्या चिवचिवटाने नुसतं डोकं उठायचं. तुला आठवत असेल,मी गमतीने म्हणायचो, तुम्हा बायकांची भिशीच काय ती या आवाजाशी स्पर्धा करू शकेल!*

*पण गेली अनेक वर्षे गुलमोहरावर फारसे पक्षी येत नाहीत. कावळ्यांची घरटी दिसत नाहीत आणि खिडक्यांवर चिमण्यासुद्धा येत नाहीत. सगळं कसं शांत शांत असतं. कुठे गेले असतील ते सगळे पक्षी?*

*तुला सांगतो, गुलमोहरदेखील बहरतो खरा,पण तो बहरसुद्धा उदास वाटतो. केवळ निसर्गाचा एक नियम म्हणून आलेला, आतून उर्मी आली म्हणून नव्हे. मग मी स्वतःची समजूत काढतो. आपला हा विरह संपला की गुलमोहर मनापासून बहरेल. कदाचित आपला विरह त्यालाही सहन होत नसावा.*

*वसुधा, मी तुझी वाट पाहत आहे.*

*तुझाच,*
*वसंत*

नानांनी शर्टाच्या खिशात कार्ड ठेवलं. दाराबाहेर येऊन त्यांनी खोलीला कुलुप लावलं. ते हळूहळू जिना उतरू लागले.

****

गुरुवारची दुपार. नाना आपल्या खोलीत अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होते. आजदेखील सकपाळ पोस्टमनला उशीर झाला होता. या आठवड्यात हे काय चाललं आहे तेच त्यांना समजेना. त्यांची अस्वस्थता क्षणाक्षणाला वाढत होती. तेवढ्यात दारावर थाप पडली. घामाघूम झालेला सकपाळ दारात उभा होता. त्याला धाप लागली होती. नाना पत्राची किती आतुरतेने वाट बघत असतात हे सकपाळला माहित होतं. त्यांचं पत्र द्यायला उशीर झाल्याची त्याला जाणीव होती म्हणून तो इतर ठिकाणची पत्रं टाकून जवळजवळ धावतच नानांकडे आला होता. या चाळीत क्वचितच इतर कोणाला एका आठवड्यात दोन पत्रं येत. पण नानांची मात्र दर आठवड्याला दोन पत्रं असत, सोमवारी आणि गुरुवारी. ही पत्रं नानांइतकीच सकपाळच्यासुद्धा अंगवळणी पडली होती.

तसं बघायला गेलं तर नानांच्या मुलाचा बोरिवलीला चांगला मोठा ब्लॉक होता. काही वर्षांपूर्वी जेव्हा त्याने ही जागा घेतली तेव्हाच तो आणि सूनबाई नाना आणि माईंच्या मागे लागले होते की तुम्ही पण तिकडे चला, चांगली मोठी जागा आहे, सगळे एकत्र राहू. पण नानांना त्यांचे चाळीशी आणि चाळकऱ्यांशी असलेले ऋणानुबंध तोडणं मान्य नव्हतं. बापलेकांमध्ये क्षुल्लक कारणांवरून वादविवाद झाले. हट्टी स्वभावाच्या नानांनी चाळीतल्या त्यांच्या खोलीतच राहण्याचा निर्णय घेतला. कौतुक म्हणूनसुद्धा कधी मुलाकडे बोरिवलीला ते गेले नाहीत. पण माईंची स्थिती मात्र विचित्र झाली. कधी सुनेच्या बाळंतपणाचं तर कधी नातवंडांच्या आजारपणाचं निमित्त करत त्या मुलाच्या संसारात गुंतत राहिल्या. नाना गेले नाहीत तरी माई महिना-पंधरा दिवस मुलाकडे जाऊन येत.

आणि असंच एकदा त्या मुलाकडे असताना किरकोळ आजाराचं निमित्त झालं आणि नानांना एकटं ठेवून माईंनी जगाचा निरोप घेतला. नाना त्या धक्क्याने पार खचले. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी धीर देण्याचा प्रयत्न केला पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. माईंच्या विरहात त्यांनी स्वतःला अधिकच एकाकी करून घेतलं.

सकपाळला हे तपशील माहीत होते की नाही कोण जाणे पण नानांचा एकलकोंडा स्वभाव त्याला माहीत असावा. नाना त्याच्याशी गप्पा मारत किंवा त्याच्याबद्दल खास आपुलकी दाखवत असंही काही नव्हतं, तरीही सकपाळ खास त्यांची पत्र द्यायला तो तीन मजले चढून वर येत असे.

''नाना! तुमचं पत्र.''

सकपाळने दिलेलं पोस्टकार्ड नानांनी हातात घेतलं. एकही शब्द न बोलता घाम टिपत सकपाळ निघून गेला. नाना टेबलापाशी आले. परिचयाचेच असलेले शब्द नानांनी पुन्हा वाचले.

*प्रिय वसुधा,*

*काल कितीतरी वेळ मी बहरलेला गुलमोहर बघत खिडकीत बसलो होतो. तू बरोबर असताना ..............................................*

*वसुधा, मी तुझी वाट पाहत आहे.*

*तुझाच,*
*वसंत*

नानांनी चष्मा काढून डोळे चोळले. एक दीर्घ निःश्वास सोडला. हातातलं पोस्टकार्ड टेबलाच्या उजवीकडच्या खणामध्ये तळाशी नीट ठेवलं. त्यांनी डावीकडचा खण उघडला. त्यातून एक रिकामं पिवळं पाकीट आणि पांढराशुभ्र कागद बाहेर काढला. कागद आडवा केला आणि त्याची डावी बाजू दुमडून समास तयार केला.

प्रिय वसंत,......

नव्या उत्साहाने नानांनी पत्र लिहायला घेतलं.

तेव्हा खिडकीतून दिसणारा गुलमोहर वाऱ्यावर डोलत होता.

# मंडळाविषयी बोलू काही - २०१५ ते २०२४

- सप्टेंबर २०१६ – संस्थेने 'नमस्ते कॅनडा' ह्या भारतीय उच्चायुक्तांतर्फे आयोजित कार्यक्रमात भाग घेतला.
- मे २०१९ – स्थानिक गायक-गायिकांच्या सहभागातून 'स्वरसंध्या' ह्या गाण्यांच्या कार्यक्रमाचा पहिला भाग महाराष्ट्रदिनानिमित्त सादर करण्यात आला.
- मार्च २०२० – श्रीमती मीना फडकर ह्यांनी संस्थेचे नवीन बोधचिन्ह तयार केले.
- मार्च २०२० ते जून २०२१ – कोव्हिड लॉकडाऊनच्या काळात संस्थेतर्फे अनेक कार्यक्रम ऑनलाईन रूपात सातत्याने सुरू राहिले. गणेशचतुर्थीची पूजा, दिवाळीचे विविधगुणदर्शन तसेच इतरही अनेक कार्यक्रम ह्या काळात आयोजित केले गेले.
- नोव्हेंबर २०२१ – संस्थेतर्फे पहिल्यांदाच मराठी चित्रपटाचा खेळ व्हँकुअर परिसरात आयोजित केला गेला. लॉकडाऊनचे प्रतिबंध उठल्यानंतर 'झिम्मा' ह्या चित्रपटाच्या खेळाला सभासदांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला.
- डिसेंबर २०२१ – संस्थेतर्फे पहिल्यांदाच बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
- फेब्रुवारी २०२२ – जागतिक महिला दिनानिमित्त 'ती'ची गोष्ट हा कार्यक्रम ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आला.
- जुलै २०२२ – महाराष्ट्रातल्या पंढरीच्या वारीची परंपरा आपल्यापरीने सुरू ठेवण्यासाठी 'मेपलची वारी' हा उपक्रम संस्थेतर्फे सुरू करण्यात आला. ह्या उपक्रमात भाग घेणार्यांची संख्या दरवर्षी वाढतेच आहे.
- सप्टेंबर २०२२ – एमएसबीसीतर्फे ढोल-ताशा पथक सुरू करण्यात आले. गणेशोत्सवात ढोल ताशा पथकाचे दणक्यात सादरीकरण झाले. प्रायोजकांच्या तसेच सभासदांच्या उत्स्फूर्त देणग्यांमुळे हे शक्य झालं.
- ऑक्टोबर २०२२– कोव्हिड लॉकडाऊन मुळे लांबणीवर पडलेला एमएसबीसी रौप्य महोत्सव वर्षाचा कार्यक्रम धडाक्यात पार पडला. माजी अध्यक्ष तसेच स्वयंसेवकांचे सत्कार, प्रसिद्ध गायक श्री. महेश काळे ह्यांच्या गायनाची मैफिल आणि भोजन अशी रूपरेषा असणार्या ह्या कार्यक्रमाला ५०० पेक्षा जास्त मंडळींनी उपस्थिती लावली!
- नोव्हेंबर २०२२ – एमएसबीसीचा 'व्हॉट्स ॲप' ग्रुप सुरू करण्यात आला. आज ह्या ग्रुपवर ६०० पेक्षा जास्त सदस्य आहेत.
- फेब्रुवारी २०२३ – एमएसबीसीच्या मंचावर स्थानिक कलाकारांना घेऊन पहिल्यांदाच दोन अंकी नाटक सादर करण्यात आलं. पुढे स्थानिक कलाकारांसाठी 'नाट्यसंध्या' ह्या एकांकिकांच्या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.
- ऑक्टोबर२०२३ – एमएसबीसी तर्फे व्यावसायिक नाटकांच्या नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. वंदना गुप्ते, प्रतिक्षा लोणकर, अतुल परचुरे, आनंद इंगळे, मुग्धा गोडबोले यांसारख्या प्रसिद्ध कलाकारांचे सादरीकरण ह्या निमित्ताने सभासदांना बघायला मिळाले.
- मार्च २०२४ – संस्थेतर्फे स्थानिक कलाकारांना घेऊन दोन अंकी संगीत नाटक सादर करण्यात आले.

# नवशिक्यापासून चॅम्पियनपर्यंत : राष्ट्रीय आणि जागतिक कराटे स्पर्धेतील यशाचा माझा प्रवास

**• निहारिका बाऊस्कर •**



**परिचय :**

कराटे हे फक्त एक मार्शल आर्ट नाही तर आत्म-शोध, शिस्त आणि चिकाटीचा प्रवास आहे. नवशिक्यापासून आंतरराष्ट्रीय स्पर्धकापर्यंतचा माझा प्रवास आव्हाने, विकास आणि अविस्मरणीय अनुभवांनी भरलेला आहे. हा लेख माझा वैयक्तिक कराटे प्रवास, वाटेत मी शिकलेले धडे आणि मला पुढे नेणारी उत्कटता यांचे वर्णन करतो.

**सुरुवात : कराटेमधील माझी पहिली पायरी**

जेव्हा माझे पालक TELUS कार्यालयात काम करायचे, तेव्हा त्यांनी अनेकदा मुलांना मार्शल आर्ट्सच्या वर्गात जाताना पाहिले. त्यांना जवळच डोजो असल्याचे आढळले. मी धाडसी मुलगी नाही हे जाणून, त्यांना वाटले की बचावात्मक खेळ शिकल्याने माझ्यातली भीती कमी होईल. आणि अशा रीतीने माझी कराटेशी ओळख झाली आणि तिथून माझा प्रवास सुरू झाला.

माझ्या कराटे प्रवासाचे सुरुवातीचे दिवस आव्हानांनी भरलेले होते. एक नवशिक्या म्हणून, मूलभूत भूमिका आणि तंत्रांमध्ये प्रभुत्व मिळवणे हे लढाईसारखे वाटले. सुरुवातीला माझे हात पाय दुखू लागले. माझ्या हालचालींचे समन्वय साधणे अवघड वाटले. मी अधिक अनुभवी विद्यार्थ्यांच्या गतीनुसार राहण्यासाठी प्रयत्न केले. प्रत्येक वर्गात, मी हळूहळू शक्ती, आत्मविश्वास आणि कलेचे आकलन वाढवू लागले.

**पहिले टप्पे : माझा पहिला बेल्ट मिळवण्याचा उत्साह आणि त्यातून मिळालेल्या यशाची भावना.**

माझा पहिला बेल्ट मिळवणे हा माझ्यासाठी विशेष अभिमानाचा क्षण होता. अनेक महिन्यांच्या कठोर परिश्रमानंतर, समर्पण आणि असंख्य आव्हानांवर मात केल्यानंतर, शेवटी माझ्या कमरेला तो पट्टा बांधणे ही एक महत्त्वाची कामगिरी आहे. तो फक्त कापडाचा तुकडा नव्हता – ते माझ्या प्रगतीचे, वाढीचे आणि कराटेमधील प्रवासाच्या सुरुवातीचे प्रतीक होते. माझ्या साध्या पांढऱ्या गणवेशाच्या विरुद्ध चमकदार केशरी पट्टा पाहून मला खूप अभिमान वाटल्याचे आठवते.

जसजसे मी माझे कराटे प्रशिक्षण चालू ठेवलं, तसतसं मला हे जाणवू लागलं की तो छंदापेक्षा अधिक महत्त्वाचा बनत चालला आहे. मला समजू लागलं की, प्रत्येक हालचालींमध्ये शारीरिक शक्तीच्या पलीकडे एक उद्देश असतो, मला त्याचं महत्त्व शिकवलं जातं. कराटे आता फक्त स्वतःचा बचाव कसा करायचा हे शिकण्यापुरते नव्हते; ते शरीर आणि मन दोन्हीमध्ये संतुलन शोधण्याबद्दल होते.

जसजशी माझी कराटेशी बांधिलकी वाढत गेली, तसतशी माझ्या प्रशिक्षणाची तीव्रता वाढत गेली. मी स्वतःला आणखी प्रोत्साहित केलं, माझं तंत्र परिपूर्ण करण्यासाठी आणि माझी सहनशक्ती सुधारण्यासाठी अधिक तास समर्पित केले. डोजो येथे आठवड्याचे चार दिवस नित्याचे बनले आणि माझ्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मला काही गोष्टींचा त्याग करावा लागला. जसं की सामाजिक कार्यक्रमांना न जाणे, इतर छंदांना कमी महत्त्व देणे. माझ्या घामाचा प्रत्येक थेंब आणि प्रत्येक दुखत असलेला स्नायू हे मी मार्शल आर्टिस्ट बनण्याच्या दिशेनी एक पाऊल होतं.

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा माझा प्रवास**

माझी पहिली कराटे स्पर्धा हा एक उत्साहवर्धक अनुभव

होता. जोशपूर्ण वातावरण, गर्दीचा आवाज आणि पहिल्यांदाच प्रतिस्पर्ध्याला तोंड देण्याची धास्ती, यामुळे माझ्या माझ्या हृदयाचे ठोके वाढले. सुरुवातीची काही वर्ष मला स्पर्धांमध्ये यश मिळाले नाही. पण पराभवातच मी माझे सर्वात मौल्यवान धडे शिकले. जसं की अडथळे कसे हाताळायचे, चुकांचे विश्लेषण कसं करायचं आणि परत जिद्दीने कसा स्पर्धेत भाग घ्यावा. विजय आणि पराभव या दोन्ही गोष्टींनी मला शिकवले की कराटे म्हणजे केवळ पदक जिंकणे नव्हे, तर प्रत्येक आव्हानासोबत वाढणं.

काही वर्षांनंतर मला स्पर्धांमध्ये यश मिळत गेलं आणि आमच्या घराची शोकेस मेडल्सने भरायला लागली. २०२३ मध्ये मला जुनिअर ब्लॅक बेल्ट मिळाला आणि २०२४ मध्ये मला सिनियर ब्लॅक बेल्ट मिळाला. २०२३ मध्ये मी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले. माझ्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा होता. देशभरातील सर्वोत्कृष्ट स्पर्धकांना सामोरे जाण्याचा विचार उत्साहवर्धक आणि चिंताजनक दोन्ही होता. आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र होण्यासाठी मला पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवायचे आहे हे मला माहीत होतं. अनेक महिन्यांच्या तीव्र तयारीनंतर, मी माझे ध्येय साध्य केलं, पॉइंट फाइटिंगमध्ये सुवर्ण पदक आणि काटामध्ये चवथा क्रमांक पटकावला. आंतरराष्ट्रीय स्तरावर पात्र ठरल्याचा मला अभिमान वाटला.

राष्ट्रीय स्पर्धेमध्ये आलेला एक अविस्मरणीय अनुभव म्हणजे सतत लढाईच्या (Continuous Fighting) सामन्यासाठी त्यांना माझ्या वयाच्या मुलीची गरज असल्याची घोषणा करण्यात आली. जरी मी अशा सामन्यासाठी कधीच सराव केला नव्हता किंवा त्यात भाग घेतला नव्हता, तरीही मी आव्हान स्वीकारण्याचा निर्णय घेतला. जवळजवळ लगेचच, माझ्या प्रतिस्पर्ध्याने माझ्या पोटात जोरदार लाथ मारली आणि मला खूप दुखापत झाली तेव्हा क्षणभर मला माझ्या निर्णयाबद्दल शंका वाटली . मात्र, यशस्वी होण्याच्या माझ्या जिद्दीने मला प्रेरित केलं. प्रतिकूल परिस्थितीतही, मी चांगली लढत दिली आणि मी यापूर्वी कधीही न केलेल्या गोष्टीत सुवर्ण पदक जिंकलं!

कराटेमध्ये राष्ट्रीय स्तरावर पोहोचणे हे मी गेल्या अनेक वर्षांपासून केलेल्या मेहनतीचा आणि समर्पणाचा पुरावा होता. कठोर प्रशिक्षण, अगणित तासांचा सराव आणि त्याग या सर्व गोष्टींचा हा एक मैलाचा दगड ठरला. एवढ्या उच्च स्तरावर स्पर्धा करणे हा एक सन्मान आणि आव्हान दोन्हीही होतं, परंतु राष्ट्रीय मंचावर माझ्या डोजोचे आणि माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा मला प्रचंड अभिमान वाटला. प्रत्येक सामना हा केवळ माझ्या वैयक्तिक वाढीचाच नव्हे तर माझ्या प्रशिक्षक आणि संघसहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतिबिंब होता, ज्यामुळे यश आणखी अर्थपूर्ण होतं.

त्यानंतर २०२३ ऑक्टोबरमध्ये मी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कॅनडाचे प्रतिनिधित्व केलं. ५३ वेगवेगळ्या देशांतील खेळाडूंसोबत मैदानात फिरणं प्रोत्साहन देणारं होतं. प्रत्येकाने अभिमानाने आपला राष्ट्रीय गणवेश परिधान केला होता आणि रिंगणातील ऊर्जा अदभूत होती. जेव्हा मैदानात प्रवेश करण्याची वेळ होती, तेव्हा आम्ही आमच्या देशाचा सर्व शक्तीनिशी जयजयकार करत गेलो.

ही स्पर्धा सहा दिवस चालली. क्रीडापटू आणि प्रेक्षकांनी त्यांच्या देशांसाठी उत्कटतेने जल्लोष केल्याने वातावरण उत्साहाने भरलेलं राहिलं. चौथ्या दिवशी, मी पॉइंट फायटिंगमध्ये भाग घेतला आणि तिसरे स्थान मिळवलं. कॅनडाचा ध्वज माझ्या खांद्यावर लपेटून व्यासपीठावर उभी राहून कांस्य पदक मिळवणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता.

**भविष्य: प्रवास चालू ठेवणे**

मी भविष्याकडे पाहत असताना, माझ्या आकांक्षा नवीन स्पर्धा आणि वैयक्तिक टप्पे या दोन्हींवर केंद्रित आहेत. २०२४ म्हणजे या वर्षी पण मला काटा मध्ये सुवर्ण पदक मिळालं आणि मी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पात्र आहे. मी आगामी स्पर्धांसाठी महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे आखण्यास उत्सुक आहे, माझी कौशल्ये सुधारणे आणि यशाचे नवीन स्तर गाठणे. स्पर्धात्मक क्षेत्राच्या पलीकडे, मी वैयक्तिक वाढीसाठी देखील वचनबद्ध आहे–मग ते नवीन तंत्रात प्रभुत्व मिळवणे असो, किंवा इतरांना मार्गदर्शन करून कराटे समुदायासाठी योगदान देणं असो. प्रत्येक ध्येय माझ्या प्रवासातील एक पाऊल पुढे दाखवते, जे मला या खेळात पुढे जाण्यासाठी प्रवृत्त करते.

पुढच्या पिढीला प्रेरणा आणि मार्गदर्शन करायची माझी उत्कट इच्छा आहे. माझ्या संपूर्ण प्रवासात मला मिळालेले ज्ञान आणि अनुभव शेअर करणे हा या कलेचा सन्मान करण्याचा एक मार्ग आहे. तरुण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, आणि त्यांना त्यांच्या स्वतःच्या कराटे प्रवासात मदत करून मी त्यांच्या वाढीसाठी आणि यशात योगदान देण्याची आशा करते. मी माझ्या डोजोमध्ये मागच्या वर्षापासून स्वेच्छेने शिकवायला सुरुवात पण केली आहे आणि या वर्षी पण मी शिकवणार आहे.

कराटेमधील एक ‘नवशिक्या ते आंतरराष्ट्रीय स्पर्धक’ असा माझा प्रवास बदलणारा आहे. केवळ माझ्या शारीरिक क्षमतांनाच नव्हे तर माझे चारित्र्य आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही यातून बदलला आहे. कराटेने मला चिकाटी, शिस्त आणि नम्रतेचे मूल्य शिकवले आहे आणि मला मिळालेला अनुभव आणि संधी याबद्दल मी कृतज्ञ आहे.


# प्रवाह प्रपंच



• सुहास कुलकर्णी •

हसावं हसवावं फुलांनी फुलवावं,
दव स्पर्शाने पाकळ्यांनी उमलावं.
आसक्तीच्या आवरणाने घडावं, घडवावं,
जपत जगत क्षणांचं दीप प्रज्वलित व्हावं.

काही घडतंय तर सामावून घे,
नाही बिघडलं तर संभाळून घे,
घडणं - बिघडणं जन्माची; जगाची री
आशा अन् विश्वासाची तीच खरी मित



तन असावे तात्त्विक,
मन दिसावे मार्मिक,
धन असावे धार्मिक,
नतमस्तकी सार्थकी सात्त्विक.

सत्य न उरले तत्त्वही विरले,
वाऱ्यासंगे सत्व निमाले,
ना देही राम ना मुखी नाम,
विश्वास नाही आधार कोण देणार,
पाऊल पदरी सावली ना उरणार.

आयुष्याला गोल हवा; गोलासाठी तोल हवा,
मोल देऊनी तेल शोधता; तुपाचाही ध्यास हवा.
सारे कळते कळून चुकते; तरी वाट ही वळणाची,
दर्द दर्प अन् द्वंदापुरती, वृत्ती न शोभे पळण्याची.

सरणावर संपावं की मरणावर,
मरणासन्न आयुष्यावर कां मृत्युमय ज
चंदनासव रहावं, झिजावं, कामी यावं
टिकावू असून टाकावूच रूप घ्यावं.
विकावूंच्या पंगतीत आत्म उरकावा,
जळावूंच्या उष्णतेत सन्मान दिसावा.



# गगन सदन तेजोमय

**• शैलेश भाटे •**

दिसे अंधारात तारे ऽऽऽऽ
जर मोकळे आकाश
घरी राहूनच पाहे ऽऽऽऽ
अवघे अवकाश सावकाश !

परवाच्या दिवशी एका मित्राने माझे Aurora चे फोटो बघितले आणि माझी औपचारिक वाह वाह करून झाल्यावर म्हणाला की, तुझ्याकडे असले फोटो असणं स्वाभाविकच आहे, कारण तुझ्याकडे तो मोठ्ठा टेलिस्कोप आहे ना! मला चटकन समजलं की ह्या पठ्ठ्याने फक्त 'नाही म्हटलं तर वाईट दिसेल' ह्या विचाराने माझ्या फोटोंचं कौतुक केलं. मी विचारलं की ह्यात टेलिस्कोपचा काय संबंध? हे ऐकून तो मित्र तीन ताड नाही तरी दिड-एक ताड तरी उडालाच. ''म्हणजे टेलिस्कोप लागत नाही अशा फोटोना?'' जगातलं आठवं आश्चर्य असल्याचा भाव त्याच्या डोळ्यात स्पष्ट दिसत होता.

''नाही!''.

''बरं मग तू रात्री तारे बघायला जातोस तिकडे, पण तुझा टेलिस्कोप नेहमीच लागत असेल ना?''

आता मला रहावेना! मी विचारलं ''तुला टेलिस्कोप शिवाय आपल्याला आकाशातल्या काहीच गमती जमती दिसत नाहीत असं वाटतंय का?'' त्याचा चेहरा असा काही झाला होता, की आपण फिजिक्सचा पेपर सोडवून बाहेर पडावं आणि आपले मित्र उत्तर ५००kg होतं की ४९८ kg ह्यावर भांडत आहेत, पण आपलं उत्तर मग १३ ग्रॅम कसं काय आलं?

मला अनेकदा असेच अनुभव आल्यामुळे मी ठरवलं की Astronomy किंवा खगोलशास्त्राबद्दल ज्या सामान्य लोकांना कुतूहल व जिज्ञासा आहे, पण उपकरणे नाहीत अशांसाठी एक यादी बनवायची. त्यात सर्वात महत्त्वाचे आणि एका दृष्टीने सर्वात महाग काही असेल तर ते म्हणजे तुमच्याकडील वेळ, कुतूहल, विना आळस विचार करण्याची तयारी आणि नवीन माहिती जाणून घेण्याची चिकाटी. बस्स! तुमचा मेंदू आणि डोळे हीच सर्वात मोलाची उपकरणे. चला तर, पाहूया की 'घर बसल्या खगोलशास्त्र' ह्या उपक्रमात आपण आपल्या आकाशातील काय काय गोष्टींचे निरीक्षण करू शकतो, अभ्यासू शकतो आणि आपलं आकाशविषयक ज्ञान कसं वाढवू शकतो.

रोज आपल्या दिवसाची सुरुवात कश्याने होते? तर सूर्य उगवल्याने! म्हणून सर्व प्रथम सूर्य. सूर्य कुठल्या दिशेला उगवतो माहित्ये? पूर्वेला म्हणालात? हे पुस्तकी उत्तर नका सांगू, आपण कधी स्वतः तपासून पाहिलंय? नसेल तर दर आठवड्या दोन आठवड्यांमधील अंतराने उगवता सूर्य पाहत जा. जसे ऋतूंप्रमाणे सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळा बदलत जातात तसेच सूर्योदयाच्या आणि सूर्यास्ताच्या दिशासुद्धा बदलत राहतात. आपण सर्व Equator म्हणजेच विषुववृत्तापासून ४९ अक्षांशावर राहतो, त्यामुळे हे अजूनच स्पष्टपणे लक्षात येतं. हिवाळ्यात सूर्य कुठल्या झाडाच्या, इमारतीच्या

किंवा डोंगराच्या बाजूने उगवतो ते पहा आणि जसजसा उन्हाळा येतो तसतसा सूर्य उगवण्याची जागा बदलत कसा जातो ते पहा. सहा महिन्यांत तुम्हाला लक्षात येईल की  सूर्योदयाच्या (किंवा सूर्यास्ताच्या) दिशा रोजच बदलतात! ढोबळ मानाने पूर्व आणि पश्चिम योग्य असलं तरी रोजच्या जागेतला होणारा इतका बदल पाहून मन थक्क होऊन जातं! तुमच्याकडे एखादा जुना छोटा कॅमेरा व ट्रायपॉड असेल तर तो तुमच्या अंगणात मध्ये लावून ठेवा. वर्षभर एकाच वेळेस सूर्योदयाचे किंवा सूर्यास्ताचे फोटो काढून ठेवा आणि मग तपासून पहा - थक्क व्हाल!

आता आपला दिवस मावळला की सहसा आकाशात कोण असतं?  तर तो म्हणजे  चंद्र - जी सूर्याची गत, तीच चंद्राचीसुद्धा, पण अजूनच पटापट. चंद्र तर रोज दिशा बदलून उगवतो, पण तेवढेच नाही, इथे अजून एक गम्मत आहे! चंद्रोदयाच्या किंवा चंद्रास्ताच्या नुसत्या वेळांवर लक्ष ठेवा. चंद्र रोज आदल्या दिवशीपेक्षा जरासा उशिरा उगवतो / मावळतो. काही दिवस चंद्रास्ताच्या वेळा जवळपास सारख्याच असतात - म्हणजे काल ८:५३ ला मावळा असेल तर आज ९:०२ ला मावळेल वगैरे. पण काहीच दिवसात ह्याच वेळांमध्ये खूप अंतर पडतं! - अगदी एका तासापेक्षाही जास्त! हे सगळं बघताना सुरुवातीला सगळं विस्कळीत वाटतं, पण काही दिवसांनी आपल्याला ह्यात एक विशिष्ट क्रम जाणवायला लागेल. आणि मग हे रोज बघण्याची उत्सुकता आपोआप वाढत जाईल!

इतकं भन्नाट वाटतं की बरेचदा कालनिर्णय न बघता आपण चंद्रोदयाच्या वेळांचे अंदाज वर्तवू लागाल! एखादा अंदाज आपण वर्तवला आणि तो बरोबर आला की अगदी 'अहो आश्चर्यम्'ची अनुभूती होते. बघा एकदा ही मजा अनुभवून!

आता सूर्य, चंद्राशिवाय आकाशात आणखी काय असतं? तर चांदण्या! म्हणजेच इतर अनेक तारे आणि ग्रह. बरेचदा आकाशातले ठळक ग्रह - मुख्यतः शुक्र (Venus), मंगळ (Mars), गुरु (Jupiter) आणि शनी (Saturn) हे आपल्या अगदी खिडकीतून किंवा गच्चीतून दिसू शकतात. हल्ली बरीच मोबाईल ॲप आपल्याला ह्या ग्रहांची अचूक जागा सांगू शकतात. ह्या सगळ्या ग्रहांना त्यांची स्वतःची गती असल्याकारणाने त्यांची आकाशातली जागा दर काही दिवसांनी बदलत राहते. त्यातसुद्धा प्रत्येक ग्रहाचे आपल्यापासून अंतर निरनिराळे असल्यामुळे त्या त्या ग्रहाच्या भासमान गतीमध्ये फरक असतो उदा. : रोहिणीसारख्या अगदी ठळक ताऱ्याच्या जवळ असलेला गुरु किंवा शुक्र ग्रह हळूहळू त्या ताऱ्यापासून लांब सरकत जातो. काही दिवसातच ही गती अगदी सहज जाणवते आपल्याला. कधी कधी तोच ग्रह हूल दिल्यासारखं दार सारून पुन्हा परत उलट चालीने त्या ताऱ्याच्या जवळ येतो हे ही बघता येतं. ह्यालाच 'तो ग्रह वक्री जाणे' म्हणतात. ह्या सगळ्या गमती आपण घर बसल्या, रोज काही मोजके क्षण आकाशाकडे पाहून "the pleasure of finding things out" चा आनंद लुटू शकतो.

आपण रहातो त्या घरातून, ठिकाणाहून आकाश बघायची सवय लावून घेतली की पुढची पायरी म्हणजे आपण दर वर्षी सहलीला कुठे ना कुठे तरी जात असतो. तिकडचं आकाश पहातो. आफिसमधले काही खवचट लोक जसे बाहेर बागेत भेटले, तर ओळख पण दाखवत नाहीत, अगदी तसंच  हे आकाश अनोळखी वाटतं!  रोज उंचावर दिसणारा ध्रुव तारा आपण भारतात जाऊन बघितलात तर अगदीच क्षितिजाजवळ दिसतो - आकाश जणू सांगतंच आपल्याला की, परत माझी ओळख करून घे!

सहलींमधली अजून एक गंमत म्हणजे शहराबाहेरचं अंधारं आकाश पहाणे! आपल्यातील बरेच जण कॅम्पिंगला शहरापासून दूर जात असाल. शहरातील light pollution  सोडून दूर गेलात की ज्या आकाशात  आपल्याला जेम तेम  १५-२० तारे दिसतात त्याच आकाशात हजारो तारे पाहून मन अगदी भारावून जातं! उन्हाळ्याच्या दिवसात आपली आकाशगंगा केवढी अवाढव्य आहे हे लक्षात येतं.

तुम्हाला ठाऊक आहे? आपल्या दीर्घिकेच्या (galaxy च्या) सर्वात जवळची दीर्घिका म्हेणजे देवयानी किंवा Andromeda galaxy आपल्याला साध्या डोळ्यांना दिसते! उद्या कुणी आपल्याला विचारलं की ''धड दिसत नाही का, डोळे आहेत की गोळे?'' - सरळ ठणकावून सांगा - 'माझे डोळे  उत्तम आहेत! २२ लाख प्रकाशवर्ष दूरची दीर्घिका मी ह्याची देही ह्याची डोळा बघितली आहे. दुर्बीण न वापरता!'

आत्तापर्यंत आपण बघितलेल्या गोष्टी होत्या त्या रोजच्या दिनक्रमातल्या. पृथ्वीवर किंवा आपल्या आयुष्यात घडतात तशा आकाशातही बऱ्याच विशेष घडामोडी अधूनमधून घडत असतात! उल्कापात म्हणजेच meteor showers, northern lights किंवा Aurora Borealis, एखादं चंद्र ग्रहण, क्वचित प्रसंगी एखादा धूमकेतू - ही  मंडळी पण आपल्याला भेट देऊन जातात. फक्त शहरापासून दूर काळोख्या ठिकाणी जाऊन ह्यातील बऱ्याच गोष्टींचा आस्वाद आपण घेऊ शकतो - कुठलीही उपकरणं न लागता!

एवढेच नव्हे तर International space station (ISS) सारखे कृत्रिम उपग्रहदेखील आपल्याला बऱ्याचदा एकाच रात्री

२-३ वेळासुद्धा दिसू शकतात. 'Dark sky location' हून एकेका रात्री साध्या डोळ्यांनी शेकडो उपग्रह दिसतात, ISS तर अगदी डाऊन टाऊनमधूनसुद्धा सहज दिसतं! हो, हो शहरातून!

टेलिस्कोप किंवा दुर्बीण घेऊच नका असं मला अजिबात सुचवायचं नाहीये. त्याच्यातून दिसणारी मजा पण अद्भुत आहेच! पण त्याच्या अभावी काहीच करता येत नाही हे वैचारिक अज्ञान किंवा आळस, कदाचित दोनही आणि हे मला दूर करायचे आहेत म्हणून हा लेख. आता हेच बघा ना, आपण कुठल्याही उपकरणांशिवाय अनुभवता येतील अशा जवळ जवळ १० गोष्टींची यादी केली सुद्धा!

आपण अजूनही बऱ्याच बारीकसारीक गोष्टीं, विना उपकरणाच्या अनुभवू शकतो. ह्या सर्व गोष्टी पाहायला, अनुभवायला रोजची काही मिनिटेसुद्धा लागत नाहीत. अनेकदा मी ह्या गोष्टी ऑफिसातून घरी चालत येताना, रात्री शतपावली करताना किंवा फोनवर गप्पा मारताना बघितल्या आहेत. निरीक्षणाचे सातत्य, जिज्ञासा आणि विचार करण्याची तयारी ह्या तीन गोष्टी बाळगल्या की विना उपकरणसुद्धा हा छंद आपल्याला बरंच काही शिकवून जातो.

जाता जाता Wordsworth च्या Daffodils ह्या अजरामर कवितेच्या काही ओळी ज्या मला इथे अगदी योग्य वाटतात त्या लिहितो.

Continuous as the stars that shine
And twinkle on the Milky Way
They stretched in never-ending line
Along the margin of a bay
Ten thousand saw I at a glance
Tossing their heads in sprightly dance

# मंडळाविषयी बोलू काही - ढोल-ताशा पथक

मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियाच्या (MSBC) तर्फे सुरू असलेल्या 'आवर्तन व्हॅन्कुव्हर ढोल ताशा पथका'चा प्रवास खूपच प्रेरणादायी आहे. २०२२च्या उन्हाळ्यात १० सदस्यांनी चार ढोल आणि दोन ताशांच्या साथीने पथक सुरू केलं. श्री. विराज शेट्ये ह्यांनी पथकाचं नेतृत्त्व स्विकारलं. आज हे पथक १२ ढोल, ४ ताशे, ध्वज, झांजा, लेझिम ह्यांनी सुसज्ज आहे आणि पथकाचे ३० नियमित सदस्य आहेत! या प्रवासात अनेक आव्हाने आली, परंतु एमएसबीसी कार्यकारिणींच्या अथक प्रयत्नांमुळे आणि आवर्तन व्हॅन्कुव्हर ढोल ताशा पथकाचे शिक्षक श्री. तेजस नाईक ह्यांच्या शिस्तीमुळे आज वादनासाठी सज्ज असा वादक वर्ग तयार आहे आणि नवीन वादक तयार होत आहे.

आवर्तन व्हॅन्कुव्हरने ढोल ताशाच्या गजरात भारतीय सांस्कृतिक वारसा परदेशात केवळ जिवंत ठेवला नाही, तर एक समुदाय म्हणून सगळ्यांना एकत्र आणण्याचं महत्त्वाचं कार्य केलं आहे. प्रत्येक तालासोबत मराठी संस्कृतीचे सूर कॅनडाच्या भूमीवर घुमत आहेत. कष्ट, मेहनत आणि एकत्रित प्रयत्नांच्या जोरावर हे पथक आज अभिमानाने उभं आहे, आणि त्यांचं भवितव्य नक्कीच उज्ज्वल आहे.

आपण सर्वांनी एकत्रित येऊन हा ढोल ताशाचा गजर अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवायचा आहे. या पथकाने अनेक लोकांना प्रेरणा दिली आहे.

ढोल ताशा म्हणजे फक्त संगीत नाही, तर एक सण, एक उत्सव आहे जो कला आणि आनंद एकत्र गुंफतो. या पथकाने अगदी लहान लेकारांपासून मोठ्या सदस्यांपर्यंत सगळ्यांना सामावून घेतलं आहे. प्रत्येकाचा सहभाग हा सण साजरा करण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे, आणि हे पथक सगळ्यांच्या उत्साह, कलेचं आणि सणाचं प्रतिबिंब बनला आहे. कौतुकाची गोष्ट अशी की इथे वाढणारी आपली पुढची पिढी म्हणजे युवा सदस्य आणि शाळाकरी मुलंही ह्यात उत्साहाने सहभागी होत आहेत!

आम्हाला वाटतं की पुढच्या वर्षी आणखी लोकांनी या पथकाचा भाग व्हावं, आमच्यासोबत मराठी संस्कृतीच्या या प्रवासात सहभागी व्हावं आणि ढोल ताशाच्या गजरात आपल्या सणांचा आनंद घ्यावा. आपली संस्कृती जपण्याचा आणि तिचा भाग होण्याचा अनमोल अनुभव घ्यावा!



# माझं जग

• संजीवनी अभ्यंकर •

''आय वॉन्ट टू सी मा---य वर्ल्ड. धिस इज मा---य वर्ल्ड.'' जॉन पुन्हा पुन्हा सांगत होता. आम्ही मेक्सिकोमध्ये सूर्यास्ताच्या वेळेस बोटीने रिदम ऑफ द नाईट्स बघायला 'लॉस कॅलेसतस' या समुद्रकिनाऱ्याला असणाऱ्या ठिकाणी जात होतो. टूर असल्याने बोटीत इतर प्रवासीपण होते. त्यात जॉन व एलेन यांची भेट झाली. दोघांचं दुसरं लग्न. एलेनने बराच जग प्रवास केला होता. तिच्याशी लग्न झाल्यापासून जॉनचा प्रवास सुरू झाला होता. त्यामुळे त्याच्यात इतर प्रवाशांप्रमाणे नवीन ठिकाण बघण्याची उत्सुकता जाणवत होती. एक वेगळं समाधान चेहऱ्यावर दिसत होत. त्यानं ठासून म्हटलेले 'माय वर्ल्ड,माय वर्ल्ड' ऐकून मी त्याच्या जगात चुकून घुसले की काय असं वाटून मला उगीचच कानकोंडं वाटलं. पण तो माझ्याच जगाविषयी बोलत होता ना!

लोकांची जग प्रवास करण्याची कारणं वेगवेगळी असतात. कोणी निसर्ग सौंदर्यासाठी, काही संस्कृतीसाठी, काही इतिहासासाठी तर कोणी मित्रमैत्रिणीबरोबर स्पर्धा म्हणून, तर काही, वेळ आणि पैसा भरपूर आहे म्हणून प्रवास करतात. काहीना सात खंड बघायचे असतात. मी या वरच्या कुठल्याही कारणासाठी प्रवासास सुरुवात केलेली नाही. वयाच्या १४ ते १८ वर्षांच्या काळात आधी चोरून, मग उघडपणे वाचलेल्या 'मिल्स अँड बून्सची' रोमँटिक पुस्तक यास कारणीभूत आहेत. कथेतील फ्रान्स, इटली, स्पेन, ग्रीस व इंग्लंड यातील नायक खूप छान वाटायचे. त्या देशाचे थोडफार वर्णनही. तेव्हा हे पाच देश बघावयास मिळाले तर नक्की बघायचे असं मी तेव्हाच ठरवून टाकलं होत. लग्न झाल्यावर या पाच देशांवरून उडत मी कॅनडात येऊन पोहचले. पहिली १०, १२ वर्ष दर २, ३ वर्षांनी नातेवाईकांना भेटण्यासाठी भारतात जाण्यात गेली. मग मात्र मोठं घर, मोठी गाडी नसली तरी चालेल, पण जमेल तसं इतर देश (माझ्या पुस्तकातील नायकांचे) बघावयाचे हे मी ठरवलं.

१९८९ पासून माझी प्रवास करावयास सुरुवात झाली. पहिली युरोप ट्रिप धाकटा मुलगा शैलेशसह झाली. पाच देशांची टूर होती. बेल्जियम, हॉलंड म्हणजे आताच नेदरलँड, लुक्सएनबर्ग, वेस्ट जर्मनी व फ्रान्स. ५ देश, तीन भाषा, वेगळी संस्कृती, पूर्णपणे निराळं जेवण. त्या काळी या देशांतून इंग्रजी इतक्या सहजपणे बोलले जात नसे. जर्मनीत 'बॉन' या शहरात त्यांनी आम्हाला मॅकडोनाल्डशी लंचसाठी सोडल. जवळच असलेले क्रिसमस मार्केट बघता यावं म्हणून जास्त वेळ दिला होता. आम्ही लंच करून, गल्ली बोळातून हिंडत छोटी छोटी जर्मन गोष्टींनी भरलेली दुकान बघत मॅकडोनाल्डशी आलो. मग लक्षात आलं की जिथे सोडलं होत ते हे मॅकडोनाल्ड नाही आहे. ना फोन, ना जिपीऐस, भाषेचा प्रॉब्लेम. वेळेत आपण पोहचू ना, बस तर चुकणार नाही ही धाकधूक मनात होती. शेवटी एक इंग्लिश बोलणाऱ्या तरुण बाईने मार्ग दाखवला. पोहचलो तेव्हा हुश्श झालं. आजपर्यंत प्रत्येक प्रवासात मी ज्या ठिकाणी जायचं आहे, त्याचा पत्ता, फोन नंबर, जवळपासचा लँडमार्क वहीत लिहून ठेवते. त्या ट्रीपची अजून आठवण अशी की दोनच आठवडे आधी बर्लिनची भिंत पडावयास सुरुवात झाली होती. ईस्ट जर्मनीसाठी आशादायक, आनंदाची

गोष्ट होती. त्यांच्या आनंदात इतर सहभागी व्हावेत म्हणून ते त्या भिंतीचे छोटे दगड स्मरणिका म्हणून विकत होते. मी पण एक दगड घेऊन आले होते.

त्यानंतर लक्षात आलं की मला प्रवास करावयास आवडतो. मायकल पॅलिनने लिहिल्याप्रमाणे Once the travel bug bites there is no known antidote. माझही बहुधा तसच झालं असावं. त्यानंतर युरोपमध्ये आम्ही मोटर भाड्याने घेत असू. हे (मिस्टर) गाडी चालवत असल्याने कुठल्याही छोट्या खेड्यात कॉफीसाठी, लंचसाठी थांबता येत असे. प्रसिद्ध शहर, गाव ही जास्त करून टुरिस्टी असतात. असेच १९९४ मध्ये इटलीच्या एका गावातून जाताना अमाल्फी कोस्टकडे जाण्यासाठी कुठल्या रस्त्याला वळायचं हे विचारायची गरज पडली. गावात रस्त्यावर एकही माणूस दिसेना. घराघरातून टीव्हीचे मोठे आवाज व लोकांचे उत्साहित ओरडणे ऐकू येत होते. 'वर्ल्ड कप'ची मॅच चालू होती. एक दोन ठिकाणी थांबून अंगणात जमलेल्या लोकांना विचारण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना इंग्लिश येत नव्हत. शेवटी एक कॉलेजियन मुलगा दिसला. गाडीच्या खिडकीची काच खाली करून नकाशातील अमाल्फीवर बोट ठेवत खुणेने कस जायचं विचारलं. त्याला इंग्लिश मध्ये सांगता येईना. "Un minuto" असं म्हणत तो गायब झाला. नंतर मोपेड चालवत आला. त्याच्या खुणेवरून कळलं की आम्हाला त्याच्या मागे जायचं आहे. ५, ६ मिनिट गेल्यावर त्याने डावीकडे वळून सरळ जा असं स्वतःचा डावा हात लांब करून दाखवलं. अशी चांगलीही माणसं प्रवासात भेटतात व नाव माहीत नसताना आठवणीत राहतात. त्या दिवशी इटली मॅच जिकली. त्याचा अभिमान व ख़ुशी प्रकट करण्यासाठी ते फटाके, पिपाण्या व मोटारींच्या हॉर्नस रात्रीपर्यंत वाजवत होते. भारतात क्रिकेट मॅच जिंकल्यावर होत तसच. पण वर्ल्ड कप मात्र ब्राझीलकडे गेला होता.

काही लोक म्हणतात ''जग एवढं मोठ्ठ आहे. कुठे सगळं बघून होणार आहे. आता टेक्नॉलॉजीमुळे डोळ्याला चष्मा लावला की virtually कुठल्याही देशात फिरून येता येत. अगदी त्या ठिकाणी गेल्याचा आनंद घरबसल्या मिळतो. कशाला एवढे पैसे खर्च करायचे. ''डिफरन्ट स्ट्रोक्स फॉर डिफरंट फोल्क्स''. त्यांना मला सांगावस वाटत की जेव्हा तुम्ही माचूपिचू मधील साधारण ८००० फूट उंचीवर असणाऱ्या सूर्याच्या देऊळात उभं राहून तिथलं डोळ्यात न मावणार निसर्गसौदर्य स्वतः अनुभवता तेव्हा लक्षात येत की कितीही इतरांनी काढलेले फोटो पाहिले, तरी वास्तविक सौंदयाला ते न्याय देऊ शकत नाहीत. आपल्या भारतातील हिमालय पर्वताची रांग, कशी फोटोत मावणार.

मीना परांजपे व अरुणा उत्तखेडे दोघीनी वेगवेळ्या वेळेस केलेलं ब्राझीलमधील Iguazu Falls च वर्णन, ''अग तू १०, १२ किंवा जास्तही नायागरा फॉल्स एका पुढे एक ठेवले की Iguazu falls तयार होईल, एवढा मोठ्ठा आहे.'' प्रत्यक्ष पाहिल्यावर लक्षात आलं की मी डोळ्यासमोर उभा केलेला धबधबा फारच लहान होता. जेंव्हा आम्ही तिथे गेलो त्या दिवशी पाण्याचा जोर खूप वाढला होता. बांधलेल्या एका पुलावर आम्ही उभं होतो. एका बाजूने उंचावरून पडणारा धबधबा, त्याचं जोरदार वाहाणार पाणी पुलाच्या खालून फेकलं जात होतं. त्यामुळे दोन धबधब्यामध्ये उभं राहिल्यासारखं वाटत होतं. दगडावर वेगाने पडणाऱ्या पाण्याच्या फवाऱ्याने व सुटलेल्या वाऱ्यामुळे आम्ही रेनकोट असूनही चिंब भिजलो होतो. निसर्गाचं असं बेबंध, भव्य रूप मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. हा अनुभव मला चित्र व व्हिडीओ बघून मिळाला नसता. तसच Antelope Canyon (अमेरिका), हम्पी, बदामी (भारत), पिरॅमिड्स (इजिप्त), पेट्रा (जॉर्डन). निसर्गाने घडवलेले वेगवेगळ्या आकाराचे दगड, विविध रंगाची लँडस्केप, बघावयास अप्रतिम दिसतात. जुन्या काळातील आता उध्वस्त अवस्थेत असणाऱ्या इमारती व त्यांच्यावरील चित्र, कलाकृती बघून त्या काळी माणसाने हे कस साध्य केलं असेल याचं आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही.

प्रवासात सहप्रवाश्यांकडून नवीन ठिकाणं कळतात. न कळत बकेट लिस्टमध्ये ती जमा होतात. त्या लिस्टमधील क्रोवेशिया. तिथे Dubrovnik शहरात फिरत असताना विद्यार्थांनी काढलेला मोर्चा "Save my planet ,Save my world" अजून लक्षात आहे. तेव्हा Malta या देशात फिरताना वाचलेल एक वाक्य मला आठवलं होत "The biggest threat to our planet earth is our belief that someone else will save it." तेव्हा मी तुम्हा सर्वाना विनंती करते की तुम्ही फक्त तुमच्या जगाची काळजी घ्या म्हणजे भविष्यकाळात माझ्या सारखे प्रवासी आपलं जग बघू शकतील.

# ‘लग्नानंतर’ चा ‘व्हॅलेंटाईन डे’

• सोनाली एडके पिंपरकर •

## बायकोची बाजू मांडताना



एकेकाळच्या गोड़ गुलाबी गप्पा आता लोप पावतात.
आठवडाभराच्या कामांची यादी गप्पांची जागा घेतात.
गुलाब, चॉकोलेट, गिफ्ट्समध्ये नावीन्य आता रहात नाही,
‘व्हॅलेंटाईन डे’ ला काय करावं प्रश्नाचं उत्तर काही मिळत नाही.

फुलं नको वाटतात आता, झाडालाच ती शोभून दिसतात.
चोकोलेट्सही नको वाटतात, कारण मुलांचे दात किडतात.
फुगे, सुशोभनाच्या वस्तू एका भिंतीवर घर करून बसतात.
या सगळ्या गोष्टीत एकेकाळी जीव जडला होता, आता मात्र नकोशा वाटतात.

पण तरीही वाटतं नवऱ्याने काहीतरी स्पेशल करावं माझ्यासाठी,
पण नक्की काय करावं याचे गमक ना त्याला माहीत ना मला माहीत

त्याने एखादं प्रेमपत्र लिहावं, नेहमी ते माझ्याजवळ राहील,
माझ्यावर तो जीवापाड प्रेम करतो ही जाणीव मला सतत राहील.
‘पण मला काही जमणार नाही’ असा तो नकळतपणे म्हणतो,
मग माझ्या मनाचा नाजूक कोपरा दुखावला जातो.
तोही रागावलेला असतो की प्रत्येक वेळी बोलून दाखवायची गरजच काय आहे,
आणि प्रेमाचा दिखावा करायची हौस तुला इतकी का आहे.

लग्नानंतर खरोखरच एकेक गोष्ट बदलत जाते,
प्रेम रोमान्स सगळं काही काळाच्या अधीन होते.
निवांतपणे बसून बोलायला वेळही मिळत नाही,
आणि वेळ मिळालाच तर मुलांव्यतिरिक्त इतर काय बोलावे सुचत नाही.

ऑफिस, घर, मुलांमध्ये वर्षानुवर्षे निघून जातात,
नवरा बायको एकमेकांना पुरेपूर जाणू लागतात.
असावा एक विसावा, असावा एक विरंगुळा दोघांसाठी,
फक्त आणि फक्त आणि फक्त एकमेकांसाठी.

आता कदाचित प्रेमाची व्याख्या बदलून जाते,
‘गिफ्ट’ची जागा आता जबाबदारीने घेतलेली असते.
डिशवॉशर लावायला त्याने मदत करणे हेच कदाचित प्रेम,
मुलीला सांभाळण्यात त्याने पुढाकार घेणं हेच कदाचित प्रेम.

आठवणीने भाज्या, ग्रोसरी आणणे हेच कदाचित प्रेम,
मी आजारी असताना घराची जबाबदारी त्याने सांभाळणे हेच कदाचित प्रेम.

शेवटी प्रेम म्हणजे नक्की काय असत,
गुलाबापासून ते मेथी, कोथिंबीर, पडवळपर्यंतचा प्रवास.
'जेवलास का राजा'पासून ते 'आज जेवायला काय करू'पर्यंतचा प्रवास.
लहान मुलीसारखे वागण्यापासून ते आता एका लहान मुलीला सांभाळण्यापर्यंतचा प्रवास.
'तुझ्याशिवाय मी जगूच शकत नाही'पासून ते 'तुझ्यासोबत बोलणंच चुकीचं आहे'प्रर्यंतचा प्रवास.

शेवटी प्रेम हे असंच असतं.
बोलून दाखवावं तेवढं कमीच असतं.

## नवऱ्याची बाजू मांडताना

तुझ्यासोबत राहणं सोप्पं नव्हे प्रिये,
एका क्षणी हसणे, दुसऱ्या क्षणी रडणे काही लॉजिकच नव्हे.

तुला सर्दी झाली की काढा मी लगेच करतो.
रविवारी तुझ्या आवडीचे कांदापोहे करतो.
तू इंडिपेंडंट व्हावीस म्हणून तुला कार चालवायला शिकवतो.
वेळात वेळ काढून तुझ्या ऑफिसमध्ये भेटायला येतो,
बोलून नाही दाखवत म्हणून काय झालं,
तुझ्यावर मी जीवापाड प्रेम केलं.



तुझ्यासारखी सुंदर आणि हट्टी परी घरात आली,
आता तू तिच्यामागे धावण्यात गुंग झाली.
बोलून, चिडून, रडून किमान होतेस तू मोकळी,
पण तू गप्प बसलीस की माझ्या मनात निर्माण होते पोकळी.

माहीत आहे मला तुला चॉकोलेट केक आवडतो
पण घेऊन आलो की, माझं वजन वाढेल म्हणतेस.
आणि नाही आणला तर, मी तुझ्यावर प्रेम करत नाही म्हणतेस.


तुझ्यासारखीच सुंदर परी देऊन तू मला आयुष्यभराचे गिफ्ट दिलं,
आता तुम्हा दोघींच्या हट्टीपणाला सांभाळणं मला मात्र अवघड झालं.
म्हणतो ना मी तुला, तू फार सुंदर दिसतेस,
जशी आहेस तशी मला पूर्णतः आवडतेस.
तुझ्यावर मी खरंच खूप प्रेम करतो,
पण व्यक्त करण्यात मात्र नेहमी फेल होतो.

# एमएसबीसी आणि मी

**१९९४ साली सुरू झालेल्या ‘एमएसबीसी’ला बघता बघता ३० वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने लहान, ज्येष्ठ, नवीन, अनुभवी अश्या सभासदांचे ‘एमएसबीसी’बद्दलचे अनुभव सांगणारा हा खास विभाग!**

**देवश्री इंगळे**
**स्वानंद काळुस्कर**
**शकुंतला रांगणेकर**
**प्रिया आजगावकर**
**अमित वैशंपायन**
**पराग सहस्त्रबुद्धे**
**देवयानी गोखले**
**शैलेश अरोरा**

# मी, MSBC आणि किलबिल शाळा




• देवश्री इंगळे •

माझी मराठीशी ओळख जन्मापासूनचीच. कॅनडात रहात असले तरी आम्ही घरी मराठीतच बोलतो. आमच्याकडे MSBC ची मेंबरशिप आहे आणि मी किलबिल मराठी शाळेतही जाते. मराठी शाळेमध्ये आम्ही खूप साऱ्या गोष्टी, गाणी, कविता म्हणतो. आपल्या संस्कृतीविषयी आणि भारताच्या इतिहासाबद्दल खूप माहिती आम्हाला सांगितली जाते. आम्ही निरनिराळे मराठी खेळ खेळतो. मी घरी आणि मराठी शाळेत मराठी बोलल्यामुळे मला आजी, आजोबा आणि इतर नातेवाईकांबरोबर मराठीतून बोलता येते.

गुढीपाडवा, गणपती, दिवाळी ह्या मराठी सणांसोबतच आम्ही क्रिसमससुद्धा साजरा करतो. आम्ही शाळेत गुढीपाडव्याला गुढी उभारून मराठी नवीन वर्षाचे स्वागत करतो तर क्रिसमसला मराठी सांता येतो आणि छान छान गिफ्ट्स देतो. मराठी मंडळात गुढीपाडव्याला विविध फूड आणि गेम स्टॉल्सही असतात. मी आणि माझ्या मराठी शाळेच्या मैत्रिणीमिळून गेम स्टॉल ठेवतो. आम्हाला एकदम बिझनेस वुमन्स झाल्यासारखच वाटतं. दुसऱ्या स्टॉलवरचे छान छान पदार्थ आणि मस्त गेम्सचा आनंद घेऊ, खूप धम्माल करतो आम्ही.

मंडळाच्या गणपतीत आम्ही मैत्रिणी ढोल ताशांच्या तालावर लेझीम डान्सपण करतो. माझ्या घरी गणपती आणि गौरी असतात. गणपतीची आरास आणि डेकोरेशन करायला खूप मजा येते, पण विसर्जनाच्या दिवशी बाप्पा निघाले म्हणून वाईट वाटतं. मराठी शाळेच्या वार्षिक प्रोग्राममध्ये आम्ही मैत्रिणी काही न काही सादर करीत असतो. गेल्या वर्षी आम्ही मराठी गाण्यांची अंताक्षरी सादर केली होती आणि यावर्षी तर आम्ही प्रोग्रामचं अँकरिंग केलं. मराठी शाळेतला 'पॉईंट्स बाजार' माझा फेवरेट आहे. आता तुम्ही म्हणाल पॉईंट्स बाजार म्हणजे काय? मराठी शाळेचा होमवर्क केल्याचे आम्हाला पॉईंट्स मिळतात. त्या सर्व पॉईंट्सचे पैसे होतात आणि वर्षाच्या शेवटी पॉईंट्स बाजारात असलेली कोणतीही वस्तू आपण विकत घेऊ शकतो. यावेळी मी शाळेने प्रिंट केलेल्या सुंदर नोटा देऊन अकलूजकर आजींच्या बागेतली छोटी झाडं घेतली, मला खूप छान वाटलं.

मला इंग्रजी सोबतच माझी मराठी भाषासुद्धा खूप आवडते. माझ्या घराजवळ अकलूजकर आजींची लायब्ररी आहे, तिथे इंग्रजी मराठी दोन्ही भाषेतली पुस्तकं मला वाचायला मिळतात. सध्या मी माधुरी पुरंदरे यांची यश सिरीजमधील पाहुणी, मुखवटे, कंटाळा ही पुस्तकं वाचत आहे.मराठी बातम्या, सिरियल्स, नाटकं आणि मुव्हीज पण खूप छान असतात. 'बाईपण भारी देवा' व 'नवरा माझा नवसाचा' हे माझे आवडते मराठी चित्रपट आहेत. मी भारतात गेल्यावर एकतरी नाटक पहाते. 'पुन्हा सही रे सही' हे माझं लाडकं नाटक आहे. MSBCमुळे पाहायला मिळणारी मराठी नाटकं खूप छान असतात. वडापाव, मिसळ, थालीपीठ, पुरी बटाटाभाजी, वरण भात तूप........ अशी खूप मोठी लिस्ट आहे माझ्या आवडत्या पदार्थांची, आणि ती वाढतच जातं आहे. मला वाचनाची आवड आहेच पण आता मंडळाच्या दिवाळी अंकासाठी फर्स्ट टाइम मी मराठीतून लेख लिहीतं आहे. Thank you MSBC for this opportunity!

आता माझी मराठी शाळा जरी संपली असली तरी मी volunteer म्हणून काम करण्यासाठी शाळेत नक्की जाणार. 'आफ्टर ऑल आय डोन्ट वॉन्ट टू मिस द फन!'

# एमएसबीसी रौप्य महोत्सव!

• स्वानंद काळुस्कर •

रौप्य महोत्सव हा कोणत्याही संस्थेसाठी अभिमानाचा आणि उत्सवाचा विषय असतो. १९९४ मध्ये २५ सदस्य कुटुंबांसह एक लहानशी सुरुवात केलेली एमएसबीसी, २०१९ पर्यंत १२५ पेक्षा जास्त कुटुंबांचे मंडळ झालं होतं. हा विशेष प्रसंग साजरा करण्यासाठी, एमएसबीसी बोर्डने '२५वा वर्धापनदिन समिती' तयार केली. निधी समिती, भोजन समिती, सजावट समिती, स्मरणिका समिती, कार्यक्रम समिती अशा विविध उपसमित्या निर्माण करण्यात आल्या. २०१९ च्या अखेरीस अनेक उपसमित्यांनी समारंभाची योजना आखली आणि २०२० च्या नवीन वर्षाच्या पार्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर निधीची मोहीम सुरू केली. एमएसबीसीच्या इतिहासात प्रथमच एका दिवसात तब्बल ३० पेक्षा जास्त देणगीदार निधी देण्यासाठी पुढं आले. ४० हून अधिक स्वयंसेवकांनी उपसमित्यांचा भाग होण्यासाठी त्यांची नावं दिली होती, आणि ते पूर्ण उत्साहाने आणि तळमळीने काम करू लागले. सेलिब्रेशनला खास बनवण्यासाठी स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम तयार केले होते. मायकेल जे फॉक्ससारखे सुंदर आणि भव्य थिएटर बुक केलं गेलं आणि १६ मार्च २०२० ही तारीख कार्यक्रमासाठी निश्चित केली गेली.

तयारी जोरात सुरू असताना, कोविड-१९ चा फटका बसला आणि सर्व सार्वजनिक मेळाव्यांवर सरकारतर्फे तत्काळ बंदी घालण्यात आली. या अचानक झालेल्या घोषणेने सर्वांनाच धक्का बसला आणि तारीख पुढं ढकलून सर्व खाद्यपदार्थांच्या ऑर्डर्स रद्द कराव्या लागल्या. कार्यक्रमाच्या फक्त तीन दिवस आधी सार्वजनिक मेळावे अचानक बंद केल्यामुळे संयोजकांना अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं! ठरवलेले कार्यक्रम रद्द झालेच पण खाद्यपदार्थ्यांच्याही गंमती झाल्या. उपस्थित मंडळींना देण्याच्या खास बेताचा एक भाग म्हणून भोजन समितीने वालाची उसळ तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वाल उकळून सोलून ठेवले होते. पण अचानक कार्यक्रम रद्द झाल्यामुळे खराब होऊन वाया जाऊ नयेत म्हणून समितीतली लोकं अनेक सदस्यांच्या घरी जाऊन वालाची छोटी पाकिटे वितरित करत होती!

अखेर अडीच वर्षे संयमाने वाट पाहिल्यानंतर आणि कोविड प्रोटोकॉलच्या अटी शिथिल झाल्यानंतर १६ ऑक्टोबर २०२२ ची नवीन तारीख निश्चित केली गेली. हा कार्यक्रम खास बनवण्यासाठी, आपण राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक श्री. महेश काळे यांना मैफिली सादर करण्यासाठी आमंत्रित केलं गेलं. वेगवेगळ्या समित्या पुन्हा स्थापन करण्यात आल्या, आणि आता आपल्याकडे ५५ पेक्षा जास्त स्वयंसेवकांचा मोठा गट होता. ह्या मंडळींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आणि एमएसबीसीसाठी इतिहास रचण्यासाठी कामगिरी हातात घेतली. ब्रिटीश कोलंबियाच्या आरोग्य मंत्र्यांनी आणि बर्नाबीच्या महापौरांनी या कार्यक्रमाचा भाग होण्यासाठी आणि या सोहळ्याचे मुख्य अतिथी होण्यासाठी त्यांना पाठवलेले आमंत्रण स्विकारले. या कार्यक्रमाची सुरुवात आपल्या किलबिल शाळेच्या विद्यार्थ्यांनी गणेश वंदनेचे सुंदर गायन करून केली. त्यानंतर मराठी समाजाच्या विकासाचा पाया रचलेल्या आणि ज्यांचे नि:स्वार्थ योगदान आजही स्मरणात आहे, अशा माजी अध्यक्ष आणि स्वयंसेवकांचा गौरव करण्यात आला.

ह्या समारंभानंतर, श्री. महेश काळे यांनी मंचाचा ताबा घेतला आणि आपल्या गायनाने तसेच हलक्याफुलक्या गप्पांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. डेकोरेशन कमिटीने केलेली स्टेज आणि हॉलवेची सजावट, फोटो बूथ, फोटोंमधून दाखवलेला एमएसबीसीचा प्रवास, फूड कमिटीने केलेली भोजन व्यवस्था, वेळेचे नियोजन, निवेदन, कार्यक्रम समितीने केलेली सर्व बॅकस्टेज व्यवस्था आणि स्मरणिका समितीने उत्तम प्रकारे डिझाइन केलेली स्मरणिका! अत्यंत संस्मरणीय संध्याकाळ होती ती! प्रायोजकांकडून उदार मनाने मिळालेल्या देणग्या आणि निधी समितीने केलेली तिकीटविक्री ह्याशिवाय हा आनंदाचा प्रसंग साजरा होणं शक्यच नव्हतं. एमएसबीसीचा रौप्यमहोत्सवी सोहळा कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व सदस्यांच्या सौजन्याने आणि सर्व स्वयंसेवकांनी आणि मंडळाच्या सदस्यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळे एक भव्य यशस्वी कार्यक्रम ठरला.

मी २०१९-२०२० मध्ये मंडळाचा कोषाध्यक्ष आणि निधी समितीचा भाग असल्याने आणि त्यानंतर २०२२ मध्ये मंडळाचे अध्यक्षपद भूषवताना, या मोठ्या कार्यक्रमाचे व्यवस्थापन करण्यात मला खूप काही शिकायला मिळाले. श्री. महेश काळे यांना प्रत्यक्ष भेटण्याची मी कल्पनाही केली नव्हती, पण एमएसबीसीमुळे मला त्यांचे स्वागत करण्याची आणि आतिथ्य करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाला ५०० हून अधिक लोक उपस्थित होते आणि हा एमएसबीसीद्वारे आयोजित केलेला सर्वात मोठा कार्यक्रम आहे, आणि तो माझ्या स्मरणात कायम राहील. एमएसबीसी ह्या पुढेही असेच अधिकाधिक मोठे टप्पे गाठत राहील आणि हे प्रसंग आपण ह्याहून मोठ्या प्रमाणात साजरे करू ह्याची मला खात्री आहे!

# साठवणी

• शंकुतला रांगणेकर •




प्रथमतः एमएसबीसीला तिसाव्या वाढदिवसाच्या आमच्याकडून हार्दीक शुभेच्छा. मंडळ जरी तीस वर्षांचं झालं तरी इथे रहाणाऱ्या काही मंडळींना इथे येऊन पन्नासपेक्षा अधिक वर्षं झाली आहेत. ह्या लेखात मी त्यांच्याबद्दलच लिहीणार आहे. त्यात साखळीकर, कामत, परांजपे, देशपांडे (६८), वझे, अकलूजकर(६९), पराडकर, रांगणेकर (७०), एरन, जोशी (७१), कुलकर्णी (७२), गोखले, अभ्यंकर (७३) आणि नंतर मुझुमदार, अवसरे, उदखेडे आणि मथुरे ही मंडळी स्थायिक झाली.

इथे आलेल्या मराठी मंडळींचं इथलं जीवन आतापेक्षा अतिशय वेगळं होतं. त्यावेळेस भारतात दूरदर्शन सहजपणे उपलब्ध नव्हतं. त्यामुळे इथलं जीवन कसं असेल ह्याची कल्पना येणाऱ्या लोकांना केवळ वाचूनच मिळाली होती. राहणीमान, हवामान, भाषा हे सर्वच नवखं होतं. येणारे बहुतेक जणं सुखवस्तू नव्हते आणि त्यात त्यांना भारतातून केवळ ३५ डॉलर आणण्याची परवानगी होती. ३५ डॉलरमध्ये १ महिना पगार होईपर्यंत घालवणं कठीण जायचं. परंतु कोणाच्यातरी ओळखीने ते येत असल्याने त्यांची पहिल्या महिन्याची सोय होत असे, जसं पराडकर कामत कुटुंबाकडे राहिले होते, वझे परांजप्यांकडे आणि कुलकर्णी वझ्यांकडे राहिले होते. जे लोक अमेरिकेतून इथे आले त्यांना हा प्रश्न येत नसे कारण ते कितीही पैसे घेऊन येऊ शकत. नवीन कुटुंब लवकरच पैसे साठवून स्वत:ची जागा घेण्याच्या मागे लागत असत. घरांच्या किंमती फार नसल्याने ते शक्यही होतं. उदाहरणार्थ बर्नबीमध्ये चाळीस हजारात घर घेऊ शकता येत असे. नवीन कुटुंबाचं दुसरं ध्येय म्हणजे आपल्या भारतातील नातेवाईकांना आर्थिक मदत करणे. त्यामुळे काटकसर करणं हे त्यांच्या अगदी अंगवळणी पडलं. आजही ती सवय प्रयत्न करूनही जात नाही. तरुण मंडळींना त्याची गंमत वाटते. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही असं म्हणतात हे अगदी खरं आहे.

बऱ्याच जणांना सुरूवातीला भाषेचा प्रश्नही येत असे. जरी ते त्यांचे अभ्यासाचे विषय इंग्रजीतून शिकले असले तरी दररोजच्या व्यवहारात लागणारे इंग्रजी भाषेचे ज्ञान कमी पडत असे. जास्त करून घरात रहाणाऱ्या गृहिणीला इथल्या स्थानिक लोकांशी संवाद साधणं सुरुवातीला जड जात असे. शिवाय त्यांचे कधी न ऐकलेले उच्चार. पण हळूहळू त्यावरही मात करता आली. इंग्रजी माध्यमातून शिकलेल्यांना हा त्रास फारसा होत नसे.

इथले कपडे बऱ्याच बायकांनी भारतात कधी वापरलेले नसत. त्यामुळे पँट घालून वावरायला बऱ्याच जणींना संकोच वाटायचा. परंतु इथल्या थंडीमुळे इथला पोशाख स्वीकारायला भाग पाडले. पॅट बरोबरच शर्ट, जॅकेट आणि बूट इत्यादी आलेच. कपड्यांवरून मला माझा मुंबई ते व्हँकुअरचा पहिला प्रवास आणि तेव्हा घातलेला पोशाख आठवला. ठसठशीत कुंकू, पिवळी कांजीवरम साडी आणि लग्नात मिळालेले सगळे दागिने मी चढवले होते. आमचं स्वागत करायला बहुतेक मराठी मंडळी (वझे, परांजपे, कुलकर्णी आणि अकलूजकर) आणि सदानंदचे इंटरनॅशनल फोक डान्सच्या ग्रुपमधले स्थानिक मित्र आणि मैत्रिणी आले होते. आलेली मंडळी माझ्या नवऱ्याला ओळखत असल्यामुळे मला भेटायची त्यांना उत्सुकता होती. इथे येताना आपण कुठं जावून पडणार आणि आपलं काय होणार ह्या चिंतेने मला घेरलं होतं. पण ह्या मंडळींना बघून माझं मन प्रफुल्लित झालं आणि आपण इथे एकटे पडणार नाही ह्याचा दिलासा मिळाला.

आता पुन्हा विषयाकडे वळू. मराठी लोकांच्या जीवनातला दुसरा मुख्य भाग म्हणजे खाणं! भारतीय किराणा मालाचं एकही दुकान त्यावेळी नव्हतं. इटालियन किंवा ग्रीक दुकानात काही कडधान्ये आणि जाडेभरडं गव्हाचं पीठ मिळत असे. पाककलेचे कौशल्य पणाला लावून पोळ्या कराव्या लागत. बासमती तांदूळ मिळत नव्हता. आज इथे मिळणाऱ्या आंबेमोहराची गोष्ट तर स्वप्नातही करू शकत नव्हतो. तूर डाळ आणि चण्याचे पीठ मिळू लागल्यावर मराठी माणसाचा आनंद गगनात मावेनासा झाला कारण भजी, आमटी आणि खिचडी करता येऊ लागली! तेव्हा आम्ही अल्पसंतुष्ट होतो. साध्या साध्या गोष्टीतून आम्हांला आनंद मिळे. १९७३ मध्ये पटेल नावाच्या माणसाने एक दुकान उघडलं आणि बऱ्याच गोष्टी हळूहळू मिळू लागल्या.

आमच्या जीवनातली पुढची महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतातील नातेवाईकांशी संपर्क साधणे. ते फार महाग आणि कटकटीचं होतं.

मला डोंबिवलीला ट्रंककॉल लावायला लागायचा. आताच्या लोकांना हा प्रकार बहुतेक माहीत नसेल. फोनचा दर होता मिनीटाला ४ डॉलर आणि कमीतकमी फी १२ डॉलर! ४-५ तासांनी फोन लागल्यावर बराचसा वेळ हॅलो-हॅलो करण्यात आणि तुम्ही कसे आहात आणि आम्ही कसे आहोत हे विचारण्यात जायचा. त्यात प्रतिध्वनी! वारंवार फोन लावणं परवडत नव्हतं. त्यामुळे आमची पत्र लेखनाची कला शाबूत राहिली. पत्राची वाट बघण्याची मजाही काही औरच होती.

मनोरंजन हा आपल्या जीनवातला आणखी एक महत्त्वाचा भाग! इथल्या टिव्हीवर कोणत्याही प्रकारचा हिंदी कार्यक्रम दाखवला जात नसे. मराठी तर विसराच! पटेलने किराणामालाच्या दुकानाबरोबर एक थिएटरही उघडलं. त्यात तो हिंदी चित्रपट दाखवत असे. एकाच तिकिटात दोन चित्रपट बघायला मिळतात म्हणून आमच्यातली काही हौशी लोकं एकापाठोपाठ एक असे दोन चित्रपट पहात असत. नंतर VHS मिळू लागल्या. हिंदी चित्रपट बघायला मिळू लागले. पण खरं सांगायचं तर आमचं मनोरंजनाचं साधन म्हणजे एकमेकांना भेटणे हेच होतं. प्रत्येक विकेंडला एकत्र येऊन जेवण आणि गप्पा गोष्टी ह्यातच मजा यायची. आमच्यातील काही लोक पत्ते खेळण्याचे शौकीन होते, त्यामुळे गप्पाटपांबरोबर पत्ते खेळत असू. कधी वाटलं तर इकडचे प्रसिद्ध गायक आमची करमणूक करण्यास हजर असत. किती सुखाचे दिवस होते ते! भारतातून येणारे विद्यार्थी आमच्यातलेच होऊन गेले होते. त्यांना जेवायला बोलावणे आणि घर सोडून इतक्या दूर आल्याने वाटणारा एकटेपणा दूर करणे ह्याकरता आम्हां सर्व कुटुंबांचे प्रयत्न चालायचे.

आम्ही काही सण एकत्र साजरे करत असू. सुरुवातीला आम्ही दिवाळीचा सण कोणाच्यातरी घरी जमून साजरा करत असू. परंतु लोकांची संख्या वाढत गेली तशी सगळ्या मराठी कुटूंबांनी घरी एकत्र येण कठीण जाऊ लागलं. निरनिराळे हॉल घेऊन दिवाळीचा कार्यक्रम करू लागलो. बहाई टेंपल, युनाईटेड चर्च, लायब्ररी, सायमन फ्रेजर युनिव्हर्सिटीची सेमिनार रूम, युबीसी एशियन स्टडीज डिपार्टमेंट अश्या अनेक ठिकाणी कार्यक्रम होत गेले. सांस्कृतिक कार्यक्रम इथली उत्साही मंडळी बसवून घेत असत. जेवण म्हणजे पॉटलक आणि त्याची व्यवस्था बघण्याचे काम आम्ही क्रमाक्रमाने घेत असू. आतासारखी नावनोंदणी नव्हती. त्यामुळे किती लोकं येतील ह्याचा अंदाज लावणं कठीण जात असे. जेवण मिळणार म्हंटलं की, पालक आपल्या कधीही न येणाऱ्या मुलांना बरोबर घेऊन येत! त्यांची गणना तुम्ही जेवायला येणाऱ्या व्यक्तींमध्ये केलेली नसायची आणि त्यामुळे जेवण पुरेल की नाही ह्याची कायम भीती असायची. पॉटकल म्हणजे खऱ्या अर्थाने पॉटलक असायचं. सांबार आणायला सांगितलं की काही लोकं आपल्यापुरत घेऊन येत! पण त्यातही मजा होती. नंतर आम्ही लोकांना आईस्क्रीमबकेटच्या मापाने पदार्थ आणायला सांगू लागलो.

१९७७ साली वझे आणि परांजपे ह्यांनी व्हीएचपीच्या बर्नबीमधल्या मंदिरात सामुदायिक गणेश पूजेची प्रथा पाडली. अनंतराव वझे व्यवसायाने सायमन फ्रेजर युनिव्हर्सिटीमध्ये कॉम्प्युटर कंसलल्टंट म्हणून काम करत, पण त्यांना पौरोहित्याच्या वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला होता. त्यांचं पाठांतर आणि अस्खलित संस्कृत उच्चार वाखाणण्यासारखे होते. त्यांनी पुढे अनेक वर्षं गणेश पूजा सांगण्याचं कार्य केलं. त्यावेळेस देवळात स्वयंपाक करण्याची सोय नव्हती. प्रसादासाठी जेवण घरून करून आणत असू. इथल्या काही मराठी लोकांनी इतर भारतीयांसाठी सुद्धा कार्य केलं. ज्यांच्या कार्याची लोकांना माहिती नाही अश्यांचा उल्लेख मी इथे करणार आहे. परांजपे आणि वझे ह्यांचा व्हीएचपी मंदिर स्थापन करण्यात मोठा वाटा होता. तसेच इंडीयन म्युझिक सोसायटी ह्या संस्थेच्या स्थापनेत परांजपे कुटुंबाचा वाघाचा वाटा होता. शास्त्रीय संगीत रसिकांनी अनेक दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमाचा आनंद लुटला. वसंत साखळीकर ह्यांचाही खास उल्लेख करावासा वाटतो. ते युनायटेड चर्चचे धर्मगुरू होते. त्यामुळे समाजकार्य त्यांच्याकडून घडतच होते. त्याचबरोबर ते अनेक संस्थांना मदत करायला आपला मौल्यवान वेळ देत असत. त्यांनी थिओलॉजी विषयात कॅनडातून डॉक्टरेट मिळवली होती आणि बर्कले विद्यापिठातून फॅमिली कौंसिलींग विषयात अधिक शिक्षण घेतलं होतं. पैश्याच्या मागे न लागता ते धर्मगुरू बनले. 'गर्व' आणि 'आत्मस्तुती' हे दोन्ही शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हते. त्यामुळे आम्हां सर्वांना त्यांच्याबद्दल अतिशय आदर वाटे. न्यू वेस्टमिनस्टर शहराने त्यांना 'मॅन ऑफ द इयर' हा किताब बहाल केला.

एमएसबीसी नसताना सभागृह भाड्याने घेऊन कार्यक्रम करणं शक्य नसल्याने परांजपे, अकलूजकर आणि दिपक देशपांडे ह्यांच्या घरी साहित्य वाचन आणि संगीताच्या अनेक मैफिली रंगल्या. त्यात मला लक्षात राहिलेल्या म्हणजे सुधीर फडके, वसंतराव देशपांडे, द.मा. मिरासदार, वसंत बापट, झाकीर हुसेन आणि पंडीत हरिप्रसाद चौरासिया! मराठी लोकांची संख्या हळूहळू वाढत गेली आणि त्यांना एकत्र आणण्यासाठी मराठी मंडळाची स्थापना झाली and the rest is history! मराठी मंडळाचे सभासद जोरात वाढत आहेत हे बघून आनंद होतो. मराठी मंडाळाची उन्नती अशीच होत राहो हीच सदिच्छा! मराठी मंडळाच्या बोर्डाच्या सदस्यांनी माझ्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांना वेळोवेळी केलेल्या मदतीबद्दल आम्ही शतशः आभारी आहोत आणि ही परंपरा अशीच पुढे चालत राहो ही इच्छा!

(तळटीप : ह्या केवळ माझ्या आठवणी आहेत त्यामुळे मी कोणाचा उल्लेख करायला विसरले असेन तर क्षमस्व!)

# मराठी सोसायटीतला माझा नृत्यप्रवास



• प्रिया आजगावकर •

नमस्कार, मी प्रिया आजगावकर. २०१० मध्ये माझे लग्न झालं आणि मी भारतातून अमेरिकेला गेले. नंतर २०१५ मध्ये मला कॅनेडियन पीआर मिळाल्यानंतर, मी अमेरीकेहून न्यू वेस्टमिन्स्टर, बी. सी. ला आले. घरापासून दूर घर शोधण्यासाठी मी त्याचवर्षी मराठी सोसायटी ऑफ बीसी (एमएसबीसी) मध्ये सामील झाले आणि मला काही चांगले मित्र मैत्रिणी आणि काही उत्तम आठवणी मिळाल्या.

सहसा आपल्या सगळ्यांकडे बालपणापासून ते महाविद्यालयीन दिवसांपर्यंतच्या आपल्या रंगमंचीय सादरीकरणाची आठवण असते. मी कधीही विचार केला नव्हता की कॅनडामध्ये मला अशी संधी मिळेल आणि सेलिब्रिटीसारखं मी पुन्हा सादरीकरण करू शकेन. जेव्हा मी अमेरिकेला गेले, तेव्हा मला वाटलं की आता रंगमंचावरील सादरीकरण हा आता आयुष्याचा भाग असणार नाही, परंतु कॉलेज संपल्यावर इतक्या वर्षांनंतरही ते सादरीकरण चालू राहिलं.

यापैकी सर्वात मोठी आठवण म्हणजे 'नमस्ते कॅनडा!' मी २०१६ मध्ये मी त्यात भाग घेतला. पण वैयक्तिक बांधिलकीमुळे पुढची काही वर्ष मी 'नमस्ते कॅनडा'मध्ये भाग घेऊ शकले नाही. २०२२ मध्ये मला पुन्हा 'नमस्ते कॅनडा'मध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आणि सहभागाबरोबरच मी समन्वय, नृत्यदिग्दर्शन आणि संकल्पनेचीही जबाबदारी घेतली. उन्हाळ्याची सुट्टी असल्याने आणि बहुतेक लोक सरावासाठी उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या संख्येने नर्तक उपलब्ध नव्हते. तसेच इथे नवीन आलेल्या मंडळींना 'नमस्ते कॅनडा' या कार्यक्रमाबद्दल फारशी माहिती नव्हती. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे हा एम.एस.बी.सी. मंडळाचा उद्देश होता. बॉलीवूडचे गाणे वाजवून त्यावर नृत्य करणं सोपं आहे. परंतु मला प्रेक्षकांशी जोडले जाता येईल अशी संकल्पना सादर करायची होती. म्हणून मी 'शिवाजी महाराजांची स्वराज्यासाठीची लढाई आणि त्यांना मिळालेला तुळजाभवानीचा आशीर्वाद' ही संकल्पना नृत्यातून मांडली आणि 'गोंधळ' हा मराठी नृत्यप्रकार सादर केला.

जेव्हा 'नमस्ते कॅनडा' पॅनेलने ऑडिशन फेरीतील आमची कामगिरी पाहिली, तेव्हा त्यांनी आमच्या ऑडिशनवर आम्हाला नकारात्मक प्रतिसाद दिला. त्यात बरेच लोक सुट्टीवर होते आणि

ऑडिशन फेरीसाठी येऊ शकले नव्हते. आता मी ते एक आव्हान म्हणून घेतलं आणि संघाला सांगितलं की आपल्याला ऑडिशनच्या दुसऱ्या फेरीत सादरीकरण करावं लागेल आणि ही शेवटची संधी असेल. ६ मुलं आणि आम्ही ४ महिला असा आमचा संघ होता. आम्ही चौघींनी खूप सराव केला आणि मुलांनीही खूप मेहनत घेतली. ऑडिओ रेकॉर्डिंग आणि व्हिज्युअलसाठी मला एमएसबीसी मंडळाच्या सदस्यांकडून खूप मदत मिळाली. एमएसबीसी २०२२ च्या अध्यक्षांनीही स्वत: लक्ष घालून मिरवणुकीसाठी कलाकार शोधण्यात मदत केली. ४५ सेकंदाच्या सादरीकरणासाठीही मिरवणुकीतील लोक आणि ढोलचा चमू २ आठवडे सरावासाठी आले, जे खूप कौतुकास्पद होते. सांघिक भावना उच्च होती. प्रत्येकाला आपल्या मराठी संस्कृतीचे अभिमानाने प्रतिनिधित्व करायचे होते. जेव्हा पॅनेलने सर्व सहभागींसह आमची संपूर्ण कामगिरी पाहिली, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की त्यांनी आम्हाला दोनदा सादरीकरण करण्याची परवानगी दिली. एकदा व्हीआयपी पाहुण्यांसमोर आणि दुसऱ्यांदा मुख्य कार्यक्रमात इतर नृत्य अकादमी आणि संघांबरोबर!

अनेक अडचणी आल्या तरी एमएसबीसी मंडळाने माझ्या नृत्य आणि नेतृत्व क्षमतेवर विश्वास ठेवला, सगळ्या बाबतीत पाठिंबा दिला आणि लागेल तेव्हा मदत केली. याव्यतिरिक्त, 'नमस्ते कॅनडा' पॅनेलकडून मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आणि त्यानंतर प्रेक्षकांचा प्रतिसाद, ही आमच्या मेहनतीला मिळालेली दाद होती. हे एक स्वप्न साकार झाल्यासारखं होतं. प्रेक्षकांनी आम्हाला 'गोंधळ गर्ल्स' हा किताब दिला आणि आम्हांलाही तो फारच आवडला!

२०२३ मध्ये मी पुन्हा एकदा एम.एस.बी.सी. नृत्य समन्वयक- स्वयंसेवक म्हणून काम केलं. यावेळी इतर मंचांवरही आपली एमएसबीसीची प्रतिभा दाखवावी अशी माझी इच्छा होती. आम्हांला भाग घेता येईल असे आणखी काही कार्यक्रम मला सापडले. नर्तकांच्या निवडीपासून ते कार्यक्रम बसवण्यापर्यंत सर्व बाबतीत मंडळाने मला पूर्ण पाठिंबा आणि निर्णय घेण्याची मुभा दिली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने एम.एस.बी.सी. मधल्या अनेक चांगल्या नर्तकांशी ओळख झाली आणि त्यांच्याबरोबर काम करता आलं.

२०२३ च्या 'नमस्ते कॅनडा'मध्ये मला मोठ्या संख्येने म्हणजे सुमारे २० नर्तकांसोबत सादरीकरण करायचं होते. याही वर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे बरेच जण बाहेरगावी गेले होते आणि सरावाला येऊ शकत नव्हते तरीही ३ पुरूष, ३ महिला आणि ६ मुले असा चांगला संघ तयार झाला. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी लोकांना एकत्र आणण्यासाठी लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेली 'सार्वजनिक गणपतीची स्थापना' ही संकल्पना यावेळी मी निवडली होती. दुर्दैवाने त्याचवेळी मला दुखापत झाली म्हणून मी माघार घेण्याचा विचार करत होते, परंतु सगळ्यांच्या पाठिंब्यामुळे मला पुन्हा नृत्य करण्याची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या अंतिम दिवशी आम्ही केलेलं सादरीकरण प्रेक्षकांना खूप आवडलं आणि त्यांनी आमचे भरभरून कौतूक केलं. आमच्या सादरीकरणाची संकल्पना, नृत्य आणि एकूण प्रवासाबद्दल स्थानिक वृत्तपत्राने माझी मुलाखत घेतली तसेच त्यांच्या वर्तमानपत्रात एमएसबीसीच्या नृत्य सादरीकरणाची छायाचित्रे प्रकाशित केली. आणखी एक मोठे यश म्हणजे आमच्या नृत्याचे छायाचित्र भारतीय वाणिज्य दूतावासाच्या संकेतस्थळावरील मुख्य पृष्ठावर झळकले.

२०२३ मध्ये 'नमस्ते कॅनडा' च्या प्रचंड यशानंतर आम्ही विविध संस्थांनी आयोजित केलेल्या दिवाळी कार्यक्रमांमध्ये सादरीकरण केलं. आम्ही प्रेक्षकांसाठी 'लावणी' हा आणखी एक मराठमोळा नृत्यप्रकार बसवला. पाच महिलांनी POCO दिवाळी फेस्टिवल आणि अन्य एका सामुदायिक दिवाळी कार्यक्रमात लावणी सादर केली. वेगवेगळ्या सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या प्रेक्षकांसमोर आम्ही सादरीकरण केल्यामुळे येथे आमच्या नर्तकांचे खूप कौतुक झालं. प्रेक्षकांनी सर्व नर्तकांसोबत छायाचित्रे काढली आणि त्यामुळे सर्व नर्तकांना सेलिब्रिटी असल्यासारखं वाटत होतं.

यानिमित्ताने मी एम.एस.बी.सी. समुदायाची ताकद, सगळ्या सभासदांचा पाठिंबा आणि या अनुभवांमधून निर्माण झालेली मैत्री अधोरेखित करू इच्छिते. मोठ्या मंचावर सादरीकरण करणं आणि आपली मराठमोळी संस्कृती व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणं ही गोष्ट माझ्यासाठी अतिशय समाधानदायी आहे. तसच एम.एस.बी.सी. हा आता माझ्या आयुष्याचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. आणि सर्व सभासदांचे माझ्या नृत्यप्रवासाच्या यशात खूप मोठे योगदान आहे.

या सोसायटीचा भाग व्हायची संधी मला मिळली त्याबद्दल मी स्वतःला खूप भाग्यवान समजते. नवीन संकल्पना आणि उत्तम नर्तकांसोबत छान नृत्य घेऊन मी लवकरच तुम्हा सर्वांच्या भेटीला येईन.



# एक अविस्मरणीय आठवण

• अमित वैशंपायन •

नमस्कार मंडळी. माझं नाव अमित वैशंपायन. आमचा परिवार मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया मंडळाशी २०११ पासून जोडला गेलेला आहे. तेव्हापासून मंडळाच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात आम्ही नेहमीच सहभागी होत आहोत.

तसाच एक उपक्रम म्हणजे मंडळाचा नाट्य रसिक ग्रुप. या उपक्रमात मला निरनिराळ्या नाटकांमध्ये वेगवेगळ्या भूमिका सादर करण्याची संधी लाभली. मला लहानपणापासून नाटकात भाग घायची खूप आवड होती आणि माझ्या बालपणी मी मुंबई राहताना शाळेत आणि आमच्या राहत्या बिल्डिंगच्या कार्यक्रमामध्ये नेहमी भाग घायचो.

व्हँकुअर मंडळाच्या 'मोठे झाले छोटे' या बालनाट्यात मला वडिलांची भूमिका करायला मिळाली. या नाटकात वयाचा विचार न करता लहान मुलांसारखा स्कूटर चालवणे, हट्ट करणे, मित्रांशी भांडण आणि आई बाबांसमोर हट्ट करून रडण्याची भूमिका अश्या बऱ्याच गंमती केल्या. खरंतर ही फारच वेगळी भूमिका, पण छान वाटलं काम करताना, खूप धमाल आली आणि परत लहान होण्याचा अनुभवही घेता आला. या भूमिकेला प्रेक्षकांचा खूप छान प्रतिसाद मिळाला.

'प्रेमाच्या गाव जावे' या नाटकाचे प्रयोग व्हँकुअर, कॅल्गरी आणि सिएटल या शहरांमध्ये करण्याची संधी आम्हाला लाभली. या नाटकात एक कपटी साधूची भूमिका करताना साधूच्या वेशभूषेत, चेहेऱ्यावर आणि वाक्यांमध्ये कपटीपणा सादर करण्याची खूप प्रॅक्टिस करावी लागली. या नाटकला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. तुम्हाला एक गंमत सांगतो, कॅल्गरी प्रयोगानंतर प्रेक्षकांशी भेट वार्ता करत असताना प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे याचे सासू - सासरे आवर्जून भेटायला आले होते. त्यांच्याशी गप्पा मारत असता त्यांनी दिलेली एक कंमेंट अशी होती की, तुझा चेहरा आणि बोलणं प्रशांत दामल्यांशी खूप जुळतं! तू विनोदी भूमिका फार छान

करू शकशील. त्याच बरोबर काही दुसऱ्या प्रेक्षकांची प्रतिक्रिया होती की, तुमची साधूची भूमिका एकदम खरी वाटत होती!

त्यानंतर लाभली ती एका संगीत नाटकामध्ये गाण्याची आणि भूमिका करण्याची संधी! 'पति गेले गं काठेवाडी' या संगीत नाटकामध्ये मी वाटाड्या आणि त्याच बरोबर शाहीर या दोन भूमिका केल्या.. या नाटकाचे प्रयोग व्हँकुअर, कॅल्गरी आणि एडमंटन शहरांमध्ये झाले. या नाटकाचे वैशिष्ट्य असे की या भूमिकांमुळे मला अभिनय आणि गाणं दोन्ही करता आलं.. या नाटकाला सर्व शहरांमध्ये खूप भरभरून प्रतिसाद मिळाला. मुळातच संगीत नाटक हे खूप दुर्मिळ होत चालले आहे आणि त्यातून इथे कॅनडामध्ये संगीत नाटकात काम करणं म्हणजे पर्वणीच! विशेषतः सर्व गायक आणि नाट्य कलाकार हौशी असले तरी कोण्याच्याही गायनामध्ये किंवा अभिनयामध्ये असं जाणवलच नाही. या नाटकाच्या दरम्यान खूप रसिकांनी येऊन कौतुक तर केलंच काहींनी आवर्जून सांगितलं की तुमचा आवाज खूपच खणखणीत आहे. तुम्हाला माईकची गरजच नाही आणि तुम्ही अगदी मनापासून ढेकर देता!

या नाटकांच्या निमित्ताने आम्हा कलाकारांना त्या शहरांमधील प्रेक्षकांशी अनेक गप्पा आणि त्यांचे प्रतिसाद ऐकण्याची संधी मिळाली. महत्त्वाचे म्हणजे मला आलेला हा पुढचा अनुभव आणि तो ही नाटकाच्या काही महिन्यांनंतर! हा अविस्मरणीय अनुभव मी आपल्या सर्वांना सांगू इच्छितो.

या वर्षी मे महिन्यात माझा चुलतभाऊ भारतातून आम्हाला भेटण्यासाठी व्हँकुअरला आला होता. त्यांना घेऊन आम्ही बँफ जास्परची रोडट्रीप केली. त्या दरम्यान आम्ही 'गोल्डन' गावातल्या एका हॉटेलमध्ये राहत होतो. एके दिवशी सकाळी मी हॉटेलच्या लॉबीमध्ये बसलो होतो. तेव्हा एक गृहस्थ माझ्याकडे आले आणि म्हणाले ''Excuse me. मी आपल्याशी दोन मिनिटे बोलू शकतो का हो?'' असे मला आधी कोणी कधीच विचारले नव्हते! ते पुढे म्हणाले ''आपण नाटकात काम करता का हो? आपल्याला नुकतंच आम्ही कॅल्गरीमध्ये वेगवेगळ्या नाटकांमध्ये पाहिल्यासारखे वाटत आहे. तुम्ही एकदा साधूची भूमिका आणि एकदा वाटाड्याची भूमिका केली होती ना? मी आपल्याला काल ओळखलं होतं, पण काल बोलण्याची संधी नव्हती मिळाली. आपली दोन्हीही नाटकं फारच छान झाली होती. सर्व कलाकार अगदी प्रोफेशनल वाटत होते आपआपल्या भूमिकेत. आम्हा सगळ्यांना ती नाटकं खूप आवडली. कॅनडामध्ये अशी उच्च दर्जेदार नाटकं बघायला मिळतील असं कधी वाटल नव्हतं. स्थानिक कलाकारांमध्ये एवढी प्रोफेशनल दर्जाची कला आहे हे बघून फार छान वाटलं. अशीच दर्जेदार नाटकं घेऊन सारखे कॅल्गरीला या हीच विनंती.'' त्या गृहस्थांचे हे प्रोत्साहन ऐकून खूप मस्त वाटलं. आपल्याला लोक फक्त नावाने नाहीतर आपल्या कलेमुळेही ओळखतील असं कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं आणि म्हणून त्या क्षणी मी थोडा भारावून गेलो होतो.

आनंदाचा दुसरा आणि सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे ही स्तुती नुसती प्रेक्षक, मित्रपरिवार यांच्याकडून नाही तर आमच्या दोन्ही मुलांकडून, ज्यांनी या आधी मराठी नाटक कधीच पहिली नव्हती, त्यांच्याकडूनही मिळाली. ''बाबा तू मस्त acting केलीस, आम्हाला आणि आमच्या मित्रांनाही खूप आवडलं तुझं काम, We are so proud of you! अशी स्तुती आपल्या मुलांकडून मिळाल्यावर ऑस्कर अवॉर्ड जिंकण्यासारखा आनंद होणं साहजिक आहे नाही का?

आमच्यासारख्या हौशी आणि इच्छुक कलाकारांना हे अनुभव घेण्याची संधी दिल्याबद्दल मराठी सोसायटी ऑफ ब्रिटिश कोलंबियाचे अगदी मनापासून आभार.

धन्यवाद!

## हास्यकट्टा

१) यजमान - आम्ही दार्जीलिंगचा चहा वापरतो
पुणेकर - वा, तरीच छान थंड होता...
किमान शब्दात कमाल अपमान

२) दोन मित्र फोनवर बोलत असतात.
पहिला - Hello भाई काय करतोस?
दुसरा - मस्त रे एकदम, काय म्हणतोस?
पहिला - अरे एक काम होते.
दुसरा - हा कर मग,
थोड्या वेळाने निवांत बोलू.

३) घरात बायकोने फरशी पुसल्यावर असं चालावं लागतंय जस काय आतंकवाद्यांनी बॉम्ब पुरवून ठेवलेत.

# ।। एमएसबीसी सभासदाची कहाणी ।।

• पराग सहस्त्रबुद्धे •




ऐक एमएसबीसी सभासदा तुझी कहाणी,

कॅनडा नामक देशात व्हॅंकुअर शहराच्या परिसरात एक गरीब मनुष्य रहात होता. त्याची त्याहून गरीब स्त्री होती. त्यांनी काय करावं? सकाळी उठावं, घरातील सर्वांची त्रिकाळ खाण्याची व्यवस्था करावी, मुलांना शाळेत धाडावं, स्वतः ऑफिसात जाऊन पाट्या टाकाव्या. घरी येऊन पुन्हा कामाला जुंपावं. त्यांना आपल्या घराची, भारताची खूप आठवण यावी. त्या स्त्रीने हट्टाने सणवार करावे, मराठी पदार्थ करावे, मुलांना मराठी बोलायला/लिहायला शिकवायचा प्रयत्न करावा! पण आपल्या सारखी मराठी पार्श्वभूमी असलेले फार कोणी न भेटल्याने खिन्न व्हावं.

एकदा हिने पाहिले की तिच्याच परिसरात रहाणारी तिची सखी कायम आनंदात, उत्साहात असते! हिने तिला विचारले ''बाई, तुझ्या आनंदाचे रहस्य काय? तू कसले व्रत करतेस?'' तेव्हा ती म्हणाली ''मी एमएसबीसीचे सभासदत्व घेतले आहे. तिथल्या कार्यक्रम-उपक्रमांमध्ये येणाऱ्या मजेमुळे मी आनंदी असते.'' हिने विचारले ''मलाही सांग याबद्दल.'' ती म्हणाली ''बघ हो! उतशील, मातशील. घेतली मेंबरशीप रद्द करशील आणि सवत्या सुभ्याला जाऊन मिळशील!'' ही म्हणाली ''उतणार नाही. मातणार नाही. घेतला वसा टाकणार नाही. तू मला महिती सांगच!''

मग तिने माहिती दिली. ''हा वसा कसा घ्यावा? वर्षाअखेरी एमएसबीसीने नवीन वार्षिक मेंबरशीप सुरू केली की लगेच ती घेऊन टाकावी. ते झाल्या झाल्या एमएसबीसीचं फेसबुक आणि इंस्टाचं पान, युट्यूब चॅनेल लाईक करावं आणि मुख्य म्हणजे व्हॉटसॲपची कम्न्युनिटी जॉईन करावी. व्हॉटसॲप कम्न्युनिटी मधले वेगवेगळे ग्रुपही जॉईन करावे. तिथल्या चर्चांमध्ये भाग घ्यायला सुरुवात करावी. स्वतःची किंवा स्वतःच्या व्यवसायाची जाहिरात, बाहेरच्या लिंका किंवा फॉरवर्डेड मेसेज मात्र तिथे अजिबात पाठवू नयेत! नाहीतर ॲडमिनचा कोप होतो. बोर्डाने 'टॅलेंट हंट' ची इमेल पाठवली की स्वतःला येणाऱ्या आणि न येणाऱ्या सर्व कलाप्रकारांमध्ये भाग घेण्यासाठी आपले नाव नोंदवावे.

एकिकडे समविचारी मंडळी शोधून त्यांच्याबरोबर कंपू करावा आणि व्हॉटसअॅप वर आपले खाजगी ग्रुप उघडावे. होणाऱ्या कार्यक्रमांना तसेच ऑनलाईन उपक्रमांना हजेरी लावायला सुरुवात करावी. आपल्या कंपूतल्या सादरकर्त्यांची तोंड दुखेस्तोवर स्तुती करावी. बाकीच्यांबद्दल आपल्या खाजगी व्हॉट्सअॅप ग्रुपवर नाकं मुरडावी आणि टिंगळ-टवाळ्या कराव्या. प्रत्यक्षात मात्र फक्त अनुल्लेख करावा. अनुल्लेख करणं शक्य नसेल तर ''खल्लास!'' ''तू अशक्य आहेस!'' वगैरे चमत्कृतीपूर्ण प्रतिक्रिया द्याव्यात. ते ही शक्य नसेल तर व्हॉट्सअॅपवर अंगठा दाखवावा किंवा बदामाची इमोजी डकवावी.

विविध कार्यक्रमांबद्दलच्या बोर्डाने पाठवलेल्या इमेल, व्हॉट्सअॅप मेसेजेस किंवा फेसबूक पोस्ट बघायच्या विसरून जाव्या आणि कार्यक्रमांची नोंदणी बंद झाली की बोर्डाला निदान एकतरी तिकिट देण्याची विनंती करावी. ''अशा सण समारंभाच्यावेळी आम्हांला घराची खूप आठवण येते आहे हो, प्लीज आम्हांला येऊ द्या!'' अशी हृदयद्रावक इमेल पाठवावी. तरीही बोर्ड बधलं नाही तर ''इतक्या लवकर तिकीटं संपलीच कशी? मोठा व्हेन्यू घ्यायला काय झालं होतं? आमचा इमेल अॅड्रेस तुम्ही मुद्दाम वगळल का??'' किंवा ''तिकिटच मिळणार नसतील तर आम्ही मेंबरशिप घ्यायचीच कशाला?'' असे सडेतोड प्रश्न बोर्डाला विचारावे.

उन्हाळा सुरू होऊन हवा सुधारली की त्याबरोबर होणाऱ्या क्रिकेट डे, पिकनिक, हाईकिंग वगैरे मैदानी उपक्रमांमध्येही उत्साहाने भाग घ्यावा. एमएसबीसीचा क्रिकेट कप म्हणजे आपल्यासाठी वर्ल्डकपच! त्यामुळे त्याच ईर्ष्येने तो खेळावा. प्रसंगी दोन द्याव्या.. दोन घ्याव्या (अर्थात फक्त शाब्दिकच!). महाराष्ट्राला पंढरीच्या वारीचे वेध लागले की इकडेही मेपलची वारी सुरू होते. त्यात भाग घेतला की भक्तीपासून स्वास्थ्यापर्यंतचा प्रवास होतोच पण आपले किलोमीटर आणि लिडरबोर्डवरचा आपला नंबर जास्त महत्त्वाचा! त्यामुळे इतरांच्या किलोमीटरकडे बारीक लक्ष ठेऊन रात्री अपरात्री हळूच आपले किलोमीटर वाढवावे.

कार्यक्रमाकरिता बोर्डाने ठरवलेल्या नियमांमध्ये काहीतरी कोपऱ्यातल्या शंका काढून त्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर किंवा थेट अॅडमिनांना मेसेज/ फोन करून विचाराव्या. आपल्या चुणचुणीत शंकांनी ते गोंधळले तर गालातल्या गालात हसावं. बोर्डतली मंडळीसुद्धा आपल्यासारखीच नोकरी, धंदे, संसार करतात हे विसरून उत्तर मिळेपर्यंत आपल्या प्रश्नांचा जोरदार पाठपुरावा करावा. उत्तर मिळाल्यावर मात्र त्यांचे तोंडभरून आभार मानावे.

दरम्यान अर्ध वर्ष संपतं आणि किलबिल मराठी शाळेची अॅडमिशन सुरू होते. आपल्या मुलांची अॅडमिशन मुदतीच्या शेवटच्या दिवसापर्यंत थांबून मगच घ्यावी. त्याच इमेलमध्ये पालकांना शिक्षक किंवा स्वयंसेवक म्हणून येण्याचं आवाहन केलेलं असतं, त्याकडे पाहून न पाहिल्यासारखं करावं. मात्र शाळा सुरू झाल्यानंतर थोड्या दिवसांनी शाळेने काय केलं पाहिजे आणि काय नाही यावर हिरीरीने मतं मांडायला सुरूवात करावी.

सरत्या उन्हाळ्याबरोबर येतो तो सणासुदीचा काळ! याची सुरूवात पारंपारिक सणांनी नाही तर इथल्या इंडीया डे परेड, नमस्ते कॅनडा अश्या आधुनिक सणांनी होते. एमएसबीसीच्या टीममध्ये सहभागी होऊन या कार्यक्रमांमध्ये नृत्य, नाट्य सादर करावं. आवर्तन ढोल-ताशा पथकात सहभागी होऊन वादनाचा सराव सुरू करावा. ढोल ताशाच्या गजरात आपल्या लाडक्या दैवताचं म्हणजे गणरायाचं स्वागत करावं! छान नटून थटून गरब्याच्या गाण्यांवर ठेका धरावा. या काळात बोर्डातर्फे कुठला व्यवसायिक कलाकारांचा कार्यक्रम आयोजित केला गेला, तर त्यात जमेल तेवढी मदत करावी आणि कार्यक्रमाला हजेरी लावावी.

आत्तापर्यंत आपलं बस्तान चांगलं बसलं असलं तर 'एमएसबीसीच्या कार्यक्रमांना फुकट जेवण/चहा/नाश्ता का मिळत नाही?' 'आपण पेपॅल, टुगोज वगैरे सिस्टीम का वापरतो?' 'मेंबरशिप घेऊनही आम्हांला काही कार्यक्रमांची पैसे भरून तिकीटं का काढावी लागतात?' वगैरे ज्वलंत विषयांवर कुजबूज सुरू करावी आणि ती बोर्डापर्यंत नक्की पोहोचेल याची खबरदारी घ्यावी. तुम्ही जुने-जाणते सभासद असाल तर वर 'आमच्या वेळी हे असं नव्हतं' अशी फोडणीही घालावी. एमएसबीसीच्या कार्यक्रमांबद्दल आणि तिथे येणाऱ्या मजेबद्दल सभासद नसलेल्या मराठी किंवा अमराठी लोकांना सांगत रहावे आणि त्यांना पुरेसा 'फोमो' निर्माण करून सभासदत्त्व घ्यायला लावावे. कधीतरी मध्येच बोर्डाला 'माझ्या नणंदेच्या दिरांचा भाचा इथे शिकायला आला आहे, तर त्याला आमच्या फॅमिली मेंबरशिपमध्ये धरू का?' किंवा 'मी सध्या 'कोर्सेरा'वर ऑनलाईन कोर्स करत आहे, मी स्टुडंट मेंबरशिप घेऊ शकतो का?' असे गुगली टाकावे.

एकीकडे दिवाळीची तयारी सुरू करावी. आवराआवरी, फराळ याच्या बरोबरच विविध गुणदर्शनात काय सादर करायचं ते ठरवून त्याचा सराव करायला घ्यावा. एमएसबीसी परिवारातल्यांबरोबर दिवाळी छान आनंदात साजरी करावी. दिवाळी होईपर्यंत थंडी सुरू झालेलीच असते आणि मग किलबिल शाळेच्या ख्रिसमस पार्टीचे आणि एमएसबीसीच्या न्यू इयर पार्टीचे वेध लागतात. वर्षातले हे शेवटचे कार्यक्रम. पारंपरिक कपडे आणि खाऊ यांना थोडा आराम देऊन आधुनिक पद्धतीचे हे कार्यक्रम म्हणजे वर्षभर केलेल्या मजेचं उद्यापनच जणू!''

हे फक्त ऐकूनच हिला उत्साही वाटू लागले. हिने विचारले ''बाई, हे ऐकूनच मला बरं वाटायला लागलं तर हे सगळं केल्यावर त्याचं फळ काय मिळतं?'' सखीने सांगितलं, ''हे सगळं मनोभावे केलं तर हक्काचे अनेक जिवलग मित्रमैत्रिणी मिळतात. त्यांच्या बरोबर बोलता, हसता, धमाल करता येते! वेळप्रसंगी मदत मागता येते. अडीअडचणीला सल्ला मागता येतो. एक-दोन कार्यक्रमांना गेलो नाही तर ''एव्हढ्यात दिसला नाहीत.. सगळं ठीक आहे ना?'' अशी आपुलकीने चौकशी करणारे मेसेज, फोन येतात आणि या परक्या मुलखात आपण एकटे नाही ही जाणीव होते. कार्यक्रमांच्या, तयारीच्या निमित्ताने आयुष्यभर पुरतील अश्या आठवणी तयार होतात. चांगलं काही केल्यावर वयाने आणि अनुभवाने ज्येष्ठ मंडळींकडून कौतुकाची, शाबासकीची थाप मिळते आणि चूका झाल्यावर कानही उपटले जातात. हक्काने लाड करून घेणारी भाचरं मिळतात. विविध वयांची, विचारांची, विविध क्षेत्रांमध्ये आणि कला-क्रीडांमध्ये पारंगत असणारी अनेक लोकं एका ठिकाणी भेटतात. त्यांच्याकडून भरपूर शिकायला मिळतं. हल्लीच्या जमान्यातलं एक प्रकारचं 'नेटवर्किंग'च हे. यातून नोकऱ्या मिळणे, व्यवसायाची जाहिरात होणे असे फायदे होतातच आणि शिवाय काही जणांची कुठल्याही पदाशिवाय एमएसबीसीसाठी, समाजासाठी नि:स्वार्थी, नि:स्पृहपणे काम करण्याची वृत्ती बघून आपल्यालाही प्रेरणा मिळते. आपल्यातले कलागुण दाखवण्यासाठी हक्काचं व्यासपीठ मिळतं तर व्यावसायिक कार्यक्रमांच्या निमित्ताने इथे येणाऱ्या कलाकारांना भेटण्याची, त्यांना जवळून बघण्याची संधी मिळते. तसच इथल्या अनुभवी मंडळींचं बोट धरून आणि त्यांच्या पाठिंब्याने कधीही न केलेल्या गोष्टीं पहिल्यांदा करून बघण्याचं धाडस करता येतं, मग ती कुठली कला असो, उपक्रम असो, खेळ असो किंवा कार्यक्रमाच व्यवस्थापन असो! कार्यक्रमांमध्ये मुलांनाही खूप मजा येते आणि त्यांनाही मित्र-मैत्रिणी मिळतात. किलबिल शाळेच्या माध्यमातून मुलांचं मराठी सुधारतं आणि त्यांचा भारतातल्या आजी आजोबांबरोबरचा संवाद कायम राहतो. एकंदरीत परदेशात राहूनही एका मोठ्या परिवाराचा भाग असल्याचं समाधान मिळतं!''

हे सगळं ऐकून त्या मनुष्याने आणि स्त्रीने एमएसबीसीचे सभासदत्त्व घेतले. त्यांची खिन्नता दूर झाली आणि ते ही आनंदात, उत्साहात राहू लागले. हा असाच आनंद तुम्हां-आम्हांसही होवो. ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी स्टॅनली पार्कच्या दारी सेडारच्या पारी सुफळ संपूर्ण.

# मंडळाविषयी बोलू काही - मेपलची वारी

पंढरीची वारी ही महाराष्ट्रातली वर्षानुवर्षांची परंपरा आहे. आळंदी ते पंढरपूर हे सुमारे २४५ किलोमीटरचे अंतर वारकरी मंडळी टाळ मृदुंगांच्या गजरात सहज पार करतात आणि आषाढी एकादशीच्या दिवशी आपल्या लाडक्या विठूरायाचे दर्शन घेतात. इथे सातासमुद्रापार राहून आपल्याला पंढरीची वारी करणं शक्य नाही पण शक्य होईल त्या स्वरूपात, निदान प्रतिकात्मकरित्या आपण ही परंपरा जपू शकतो का? असा विचार २०२२च्या बोर्डाने सुरू केला. रोजची व्यवधान संभाळून काय आणि किती करणं शक्य आहे ह्याची चाचपणी केली. वारीमधला महत्त्वाचा भाग म्हणजे सातत्य! त्यामुळे आपल्या प्रतिकात्मक वारीतही सातत्य हवं. वारकरी पंढरपूरपर्यंत चालत जातात पण आपल्याला आपल्या जागी राहूनच हा प्रवास करायचा आहे, त्यामुळे चालण्याबरोबर पळणे, डोंगर चढणे, सायकल चालवणे, पोहोणे असे पर्यायही तपासून बघितले. सुमारे २४५ किलोमिटरचे अंतर एका महिन्यात कापायचे म्हणजे दिवसाला किती चालणे किंवा पळणे करावे लागेल ह्याचं गणित मांडलं. त्यावरून त्रैराशिक मांडून पोहोण्याचं आणि सायकल चालवण्याचां अंतरही काढलं आणि मग नियम ठरवले. आषाढी एकादशीच्या एक महिना आधीच्या तारखेपासून रोज ८ किमी चालणे, २० किमी सायकल चालवणे किंवा ६०० मिटर पोहोणे असे पर्याय ठेवले. वारीच्या सांगतेच्या दिवशी सगळ्यांनी मिळून 'डियर लेक पार्क'चा ५ किलोमिटरचा ट्रेल चालायचा, एखादा छोटासा कार्यक्रम करायचा आणि मग पोटपूजा करायची असा कार्यक्रम ठरवला. पहिल्या वर्षी काही गायिकांनी विठ्ठलाचे अभंग सादर केले, दुसऱ्या वर्षी आंतरराष्ट्रीय योगादिनानिमित्त योगसाधना केली तर ह्या वर्षी सहभागींनी आपापले अनुभव सांगितले. ह्या प्रतिकात्मक वारीत भाग घेणाऱ्या वारकर्यांचा सहभाग दरवर्षी वाढतोच आहे. सभासद ह्या उपक्रमाची आतुरतेने वाट पाहू लागले आहेत. ह्या वर्षीतर एका सभासदाने वारीच्या एका महिन्यात १००० पेक्षा जास्त किलोमिटर अंतर पार केले! पुढच्या वर्षी तुम्हीही ह्या मेपलच्या वारीत सहभागी होऊन भक्तीपासून स्वास्थ्यापर्यंतचा प्रवास नक्की अनुभवा!



# खुल जा सिम सिम!

• देवयानी गोखले •

३० मे, २०१४, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, माझा पाय निघता निघेना. नवऱ्याला वॅन्कूवर, कॅनडा, येथे नोकरी मिळाल्याने आम्हालाही नाइलाजाने आपला भारत देश सोडावा लागत होता. आपले कुटुंब, मित्र मंडळ सगळ्यांना सोडून लांब, साता समुद्रा पलीकडे जायचे होते. माझेच काय तर माझ्या ५ वर्षाच्या मुलाचे ही मन भरून आले होते. तिथे जायचे एकच कारण होते – कुटुंबाने एकत्र राहणे. मग काय, 'इंग्लिश विंग्लिश' मधल्या श्रीदेवी सारखी इमिग्रेशनला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची आणि मनाची भरपूर तयारी करून एकदाची त्या विमानात बसले आणि कॅनडाला पोहचले.

कॅनडाच्या विमानतळावर या श्रीदेवीने पहिली परीक्षा उत्कृष्टरित्या पास केली. मन शांत झाले आणि लगेच दुसरा सुखद धक्का बसला. तो म्हणजे हवामानाचा. चक्क ४५ डिगरीतून २५ डिगरीत आले. इथली स्वच्छ, थंडगार हवा, सुंदर निसर्ग पहात, नव नवीन अनुभव घेत, केव्हा इथे रमले, माझे मलाच कळले नाही.

शांतपणे आयुष्य जगत असताना, आयुष्याने आनंदाचा धक्काच दिला – सोऽहम्च्या मराठी शाळेच्या निमित्ताने MSBC मध्ये झालेले माझे पदार्पण. मराठी मंडळाचे सभासदत्व घेतले आणि MSBC च्या रूपाने जणू 'खुल जा सिम सिम' म्हणून माझ्यासाठी विविध रंगांची, विविध ढंगाची गुहाच उघडली आणि नकळतच कलेच्या एकेका दालनात प्रवेश करत गेले. खरेच, MSBC ची मी नेहमीच रुणी राहेन.

सुरूवात झाली गाण्यांच्या लहान – सहान ऑनलाईन कार्यक्रमातून. यामुळे इतर गायक मित्र मैत्रिणींशी ओळख झाली. जवळ जवळ २० वर्षांनी मी पुन्हा गायला लागले आणि लोकांनीही तितक्याच प्रेमाने आणि आपलेपणाने मला स्वीकारलं. कधी स्वप्नातही विचार केला नव्हता अश्या संधी मला इथे प्राप्त झाल्या. या ठिकाणी महेश काळे सरांना विसरून कसं चालेल? महेश काळे सरांबरोबर कोरस म्हणून का होईना, गायला मिळतेय म्हणल्यानंतर मला आठवण आली ती माझे गुरू, श्री गोपाळ कौशिक सरांची. त्यांच्याकडून शिकलेली गाणी, त्यांनी आमच्यावर घेतलेली मेहनत, आणि त्यांच्या सोबत केलेले कार्यक्रम, एकदम डोळ्यापुढे उभे राहिलेत. त्यांच्या माझ्या कडून खूप अपेक्षा होत्या. विश्वास होता की मी या क्षेत्रात नाव करणार, त्यांचा वारसा पुढे चालवणार. परंतु त्या गोष्टी पुढे तश्या होऊ शकल्या नाहीत. आज मला त्यांची खूप आठवण येते आहे. ते आज असते, तर सगळ्यात जास्त आनंद त्यांनाच झाला असता. Miss you Sir!

महेश काळे सरांनी, आमचा सराव करून घेण्यासाठी त्यांचा एक शिष्य नेमला. त्यांच्या शिष्याने जेव्हा आमचा सराव घ्यायला सुरवात केली, आणि सरांच्या शिस्तीबद्दल, परिश्रमाबद्दल, सवयींबद्दल जे काही कळले त्यावरून लक्ष्यात आले की मोठे गायक कसे तयार होतात. आमच्या सरावाला सुरुवात झाली आणि वेगळीच मजा अनुभवायला मिळाली. पुन्हा एकदा आयुष्यात उच्च दर्ज्याच्या गायकाकडून सराव तर मिळत होताच पण त्याच बरोबर नवीन मित्र मैत्रिणी पण मिळाल्यात. त्यांच्यात मी कधी मिसळून गेले माझं मलाच कळलं नाही. अगदी साधी गोष्ट सांगायची तर आजवर चहा न घेणारी मी, चक्क चहा प्यायला लागले.

शोच्या आदल्या दिवशी स्वत: महेश काळे सरांनी आमचा सराव घेतला. तो दिवस मी आजही विसरणार नाही. पोटात जो काही गोळा आला होता! सरांनी सांगीतले होते, स्टेजवर, मी तुमच्या दिशेने बघितलं, आणि हात वर केला, की तुम्ही कोरस सुरू करायचा. मग काय, शोच्या दिवशी पूर्ण वेळ लक्ष सरांच्या हाताकडेच. गंमतीचा भाग सांगायचा म्हणजे, त्या दिवशी प्रेक्षकांनीच आमच्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने कोरस गायला. अर्थात आम्हांलासुद्धा खूप मजा आली कारण आम्हांला एक गाणं सरांसोबत गायला मिळालं. काय कमाल अनुभव होता तो!

तसं माझं मुळातलं शिक्षण म्हणजे 'मास्टर ऑफ फाईन

आर्ट्स'. त्यामुळे कळत नकळत वेगवेगळ्या कार्यक्रमांची पोस्टर्स, लोगो, MSBC चे बॅनर आवडीने बनवू लागले आणि मंडळाच्या कामांमध्ये माझा सहभाग वाढला. त्यातूनच 'ती' ची गोष्ट आणि कॅनडीयन फर्स्ट नेशन आर्टच्या शैलीत रेखाटलेले आपल्या बाप्पाचे चित्र, माझ्यासाठी खूप विशेष आहे.

अशा प्रकारे सुरू असलेल्या प्रवासात, स्वप्नातही विचार केला नव्हता अशा तिसऱ्या दालनात माझा प्रवास झाला. 'प्रेमाच्या गावा जावे' या नाटकात काम करण्याची संधी मिळाली. मी मनाशी ठरवलं होतं की, हाती आलेल्या संधीला गमवायचे नाही. निव्वळ या निर्धारामुळे मी या क्षेत्रात प्रवेश केला. दिग्दर्शक साहेबांना, ''मला अभिनय जमला नाही तर मला स्पष्टपणे, अगदी माझ्या तोंडावर सांगा. नाटकातून काढूनही टाकलं तरी मला वाईट वाटणार नाही.'' असं म्हणूनच मी या नाटकाचा भाग झाले. नाटकाची सुरुवातच पाठांतरापासून झाली आणि माझी घाबरगुंडी उडायला लागली. कारण स्पष्टच होतं, कॉलेज सोडल्यापासून पाठांतराशी कधी संबंधच आला नव्हता. पण जोमाने पाठ करायला बसले, आणि झालं बुआ एकदाचं! अशारितीने पहिला टप्पा पार पडला.

आता दुसरा महत्त्वाचा टप्पा म्हणजे – अभिनय! मला मिळालेली भूमिका बऱ्यापैकी माझ्या रोजच्या जीवनाशी निगडीतच होती. म्हणजे, घरात आई, बायको, सून म्हणून मी जशी वावरते, बोलते, तसच! त्या नाटकातली बरीच वाक्य तर मी कित्येकदा घरी बोलते तीच होती. त्यामुळेच कदाचित, अभिनय करताना मला फारशे कष्ट घ्यावे लागले नाही. सुरुवातीला दिग्दर्शक साहेबांकडून काहीच सूचना मिळत नाहीत हे पाहून मला वाटले, 'झालं! आपला पत्ता लवकरच कटणार!' आणि त्या दिवसाची मी वाट पाहू लागले. पण सुदैवाने तो दिवस उगवलाच नाही. नाटकात सुमंगलची भूमिका साधताना, ती खोटी नाती जगताना, माझी त्या कलाकार मंडळींशी कधी, खरीखुरी मैत्री जमली, माझं मलाच कळलं नाही. आणि माझा नाटकाचा प्रवास सुरू झाला. या प्रवासात भेटलेली माणसं, तालमींच्या वेळच्या गमती जमती, प्रयोगांनंतरचे श्रमपरिहार, प्रवासातील मज्जा, आणि याहूनही प्रत्येक प्रयोगाच्या वेळचे अनुभवलेले क्षण या आठवणींचे गाठोडे आयुष्यभर माझ्यासोबत राहिलं. मंडळातील लोकांच्या माझ्यावरील विश्वासामुळे, अशक्य वाटणारी गोष्ट शक्य झाली आणि माझ्यावर टाकलेल्या विश्वासास मी पात्र ठरले. खरं सांगायचं तर माझाच माझ्यावर विश्वास बसत नाही. यातून मला मिळालेल्या आनंदाचे वर्णनच मी करू शकत नाही. MSBC तुमचे खरच खूप आभार!


एका एका दालनातील आनंदरूपी हिरे, मोती गोळा करता करताच केव्हा पुढच्या दालनापर्यंत येऊन पोहचले ते लक्षातही आलं नाही. पुन्हा एकदा कधीही विचार न केलेल्या क्षेत्रात पाऊल टाकलं. ते म्हणजे शिक्षणाचे क्षेत्र. अर्थातच, किलबिल मराठी शाळा. म्हणजे जिथून सुरुवात केली होती, त्याचं खरं दालन समोर होतं. एका मैत्रिणीने अगदी विश्वासाने, हक्काने या शाळेतला एक वर्ग शिकवण्याची जबाबदारी दिली आणि तिच्या मार्गदर्शनाखाली धडपडत का होईना ती मी पूर्ण केली. मुलांना मराठी शिकवताना आलेल्या अनेक आठवणींपैकी एक आठवण तुम्हाला अगदी आवर्जून सांगावीशी वाटते. त्या दिवशी मुलांना वर्गात व्याकरणातील 'लिंग' ही संकल्पना शिकवत होते. ''पुल्लिंगी म्हणजे, masculine gender, male, boy. स्त्रिलिंगी म्हणजे, feminine gender, female, girl. आणि तिसरे, नपुंसकलिंगी म्हणजे... एवढ्यात एक मुलगा म्हणाला, ''Transgender. हो ना?'' मी कपाळावर हात मारू, की तोंडावर हसू लपवायला ठेवू, की हसू न आवरल्याने पोट धरून हसू, अशी अवस्था झाली होती. खरंच काय मज्जा आली होती त्या दिवशी! आजही आठवलं तरी तेवढंच हसू येतं. एकंदरीतच विद्यार्थ्यांना शिकवणं, त्यांच्या बरोबर वेळ घालवणं, हे नेहमीच आनंददायी आणि समाधान देणारं असतं याची मला प्रचिती आली आणि सहजच आईचे शब्द आठवले. ती नेहमीच म्हणायची, ''तू चांगली शिक्षिका होऊ शकतेस.''

हे चालू असतानाच अजून एक नवीन वळण आलं. पुन्हा एकदा माझ्यासमोर एक अवघड कार्य उभं ठाकलं. ज्यामुळे मला अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्यात. आज मी या किलबिल मराठी शाळेची मुख्याध्यापिका आहे. ही जबाबदारी यशस्वीपणे पेलण्याचा मी मनापासून प्रयत्न करते आहे. या कार्यातही संपूर्ण किलबिल परिवार माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे आणि अर्थातच नेहमीप्रमाणेच MSBC बोर्डाच्या रूपाने उत्तम सहकारी मला लाभले आहेत.

या सर्वांच्या मदतीनेच सुरुवात झालेल्या माझ्या प्रवासात वेळोवेळी या सर्वांची मिळालेली सोबत, त्यांचे सहकार्य, नेहमी असेच आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मला अनुभवायला मिळेल याची मला खात्री आहे. प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर भेटलेल्या मित्र मैत्रिणी आज माझ्या आयुष्याचा अविभाज्य घटक झालेले आहेत. आजच्या घडीला जे काही कमवलं आहे, ते केवळ आणि केवळ याच परिवारामुळे. खरंच, मी खूप नशीबवान आहे ! 'वयाच्या चाळीशी नंतर घट्ट जवळचे मित्र बनवू शकत नाही' असं म्हणतात, पण मी मात्र याला अपवाद ठरले आहे. माझ्या मते, या वयात झालेली मैत्री मनापासून केलेली मैत्री असल्यामुळे ती आपलीशीच राहते. या यशस्वी प्रवासात आपण सर्वांबरोबर देवाचेही आभार मानून माझ्या विचारांना विराम देते.

# नाटकं करताना!

• शैलेश अरोरा •




नाट्यंभिन्नरुचेर्जनस्य बहुधाऽप्येकं समाराधनम् ।।

या किती समर्पक पंक्ती आहेत याचा अनुभव संगीत 'पति गेले गं काठेवाडी' या नाटकाच्या प्रयोगादरम्यान घेतला. व्हँकुअर, कॅलगरी आणि एडमंटन या तीन ठिकाणी हे नाटक सादर केलं गेलं. एका बाजूला हे नाटक निवडताना थोडीशी शंका होती की कॅनडामधले प्रेक्षक संगीत नाटक कसे स्विकारतील? जसा एखादा कलाकार वेगवेगळ्या भूमिका करता करता घडत जातो, तसे प्रेक्षकही विविध प्रयोग स्वीकारत जातात आणि म्हणूनच दुसऱ्या बाजूने विचार करता चांगलं दिलं तर प्रेक्षक नक्की स्वीकारतील, अशी खात्रीही वाटत होती. तीनही शहरांमध्ये या नाटकाला भरभरून प्रतिसाद मिळाला. नाटक ही एक सांघिक कलाकृती आहे याची जाण असणारे रंगमंचावरील तसेच पडद्यामागचे संवेदनशील कलाकार, प्रतिभावंत वादक आणि भूमिकेच्या आवश्यकतेनुसार चपखल कलाकारांची निवड, हे या नाटकाला मिळालेल्या यशाचे रहस्य आहे.

यानिमित्ताने हे आवर्जून सांगावेसे वाटते की, रंगमंचावर भूमिका सादर करण्यामधला खरा आनंद आहे नाटक बसवण्याच्या प्रक्रियेमध्ये. प्रत्येक वेळेस नाटक आणि त्याची तालीम आपल्याला समृद्ध करत नेते. आपल्या भावविश्वाशी आणि अनुभवांशी प्रामाणिक राहून, कलाकृतीच्या विविध अंगांचा आधीपासून बारकाईनं विचार करून, व्यवस्थित अभ्यास करूनच नाटक बसवायला घेतलं की ते योग्य रितीने पूर्णत्वाला जातं आणि हमखास यश मिळतं.

आता हेच बघाना, गेल्या वर्षी सादर झालेलं नाटक 'प्रेमाच्या गावा जावे' हे देखील पेक्षकांनी चांगलं स्वीकारलं होतं. या नाटकामध्ये एकूण १२ कलाकार होते. त्यातील ६ कलाकार प्रथमच रंगमंचावर काम करणार होते. सर्व कलाकारांनी खूप मेहनतीने तालीम करून हे पूर्णत्वाला नेलं. काळानुसार सादरीकरणाच्या दृष्टीने संहितेत काही बदल केले होते. सादरीकरणाच्या स्वातंत्र्यानुसार पहिल्या अंकाचा शेवट पूर्णपणे बदलून घेतला होता आणि तो कलाकारांनी वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला.

काही गोष्टी 'प्रेमाच्या गावा जावे' या नाटकाच्या निमित्ताने इथे पहिल्यांदाच घडत होत्या. हे इथलं पूर्ण लांबीचं पहिलं नाटक. नाटकाचे शीर्षकगीत आणि इतर गाणी आणि त्याला नृत्याची जोड आणि त्याच बरोबरीने विचारपूर्वक केलेलं नेपथ्य, वेषभूषा आणि रंगभूषा. या सगळ्यांचा एकत्रित परिणाम रसिकांची दाद मिळवून गेला. पहिल्यांदा एखादी गोष्ट करणं याचं नेहमीच अप्रूप असतं. पुढे त्याची इतरत्र पुनरावृत्ती होतेच.

अशा मोठया नाटकांसाठी किंबहुना सगळ्याच रंगमंचीय सादरीकरणासाठी, योग्य भूमिकांसाठी योग्य कलाकारांची निवड ही कुठल्याही यशस्वी नाटकाची पहिली पायरी. आधी एखादं नाटक निवडायचं आणि मग त्यासाठी योग्य असे कलाकार निवडायचे हा सर्वमान्य क्रम, पण इथे परदेशात पाळणं शक्य होईलच असं नाही. त्यातून इथे किंबहुना सगळीकडेच बदलत चाललेली जलद आणि स्वार्थी जीवन शैली. त्यामुळे कुठले कलाकार उपलब्ध आहेत आणि ते किती मनापासून तयार आहेत हे बघूनच निवड करणं योग्य ठरतं. साधारणपणे आठवड्यातून केवळ एकदा एकत्र प्रॅक्टिस असते, बाकी जेंव्हा शक्य असेल तेंव्हा १ ते २ दिवस वैयक्तिक प्रॅक्टिस घायची. त्यामुळे प्रत्येकानी जवाबदार असणं खूपचं महत्त्वाचं ठरतं.

कुठल्याही दडपणाशिवाय आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे भूमिकेच्या गरजेनुसार जर कलाकारांची निवड केली तर रंगमंचीय अवकाशात गोष्टी थोड्या सोप्या होतात. तरीही प्रत्येक वेळेस समर्पक कलाकार मिळतीलच असं होत नाही. त्यावेळेस नाटकातील

व्यक्तिरेखा, त्यातील वेगवेगळ्या छटा, यात उपलब्ध कलाकाराच्या शैली प्रमाणे, त्याच्या शक्तीस्थळानुसार लवचिकता आणावी लागते. याचे कुठलेही मापदंड ठरलेले नाहीयेत म्हणूनच नाटकाला प्रयोग असं म्हणतात ना! कुठलंही नाटक बसवताना अडचणी खूप येतातच पण इतर कुठल्या बाबींपेक्षा सर्जनशील पैलूंवर अधिक लक्ष केंद्रित केलं की मार्गही मिळतो.

'मोठे झाले छोटे' हे एक असंच एक मजेदार नाट्य, खरंतर मुलासाठीचं एक बालनाट्य. पण या एकांकिकेमध्ये इथे लहानाच्या भूमिका लहानांनी आणि मोठयांच्या भूमिका मोठयांनीच केल्या त्यामळे कल्पनेला मिळालेल्या व्यावहारिक जोडीची वेगळालीच रंगत प्रेक्षकांना अनुभवायला मिळाली. 'किलबिलाट' कार्यक्रमामध्ये या एकांकिकेने धमाल उडवून दिली होती. अर्थात, या एकांकिकेच्या यशाचं श्रेय हे सर्व कलाकारांना आहे. त्यांनी कुठलेही सामाजिक दडपण न ठेवता भूमिका वठवल्या. लहान दोन कलाकारांनीही मोठ्यांचं दडपण न घेता सुरेख भूमिका वठवल्या. त्यामुळे सर्व कलाकारांचे नक्कीच कौतुक आहे.

आपण एकदा काम स्विकारलं की ते पूर्णत्वाला न्यायचं, मग त्यात कितीही व्यवधान आली तरीही! याच उत्तम उदाहरण म्हणजे, 'छू मंतर' या एकांकिकेमधील कलाकार. ही एकांकिका इथे ३ वर्षांपूर्वी सादर झाली होती. खरंतर कोवीडच्या आधी या एकांकिकेची तालीम सुरू झाली होती, पण पुढे २ वर्ष ती काही सादर होऊ शकली नाही. कोवीडच्या अपरिहार्य कारणाने त्याची तालीम खूपच लांबली, पण यातील प्रत्येक कलाकार मनापासून काम करत होता. तेवढ्याच उत्साहाने ती सादर झाली आणि प्रत्येक कलाकार रसिकांच्या कौतुकास पात्र ठरला.

या एकांकिकेबरोबरच नाट्यगीतांचा नाट्यमय अविष्कार – मर्मबंधातील ठेव हा देखील कार्यक्रम सादर झाला. कोवीडनंतरचा पहिला ऑनलाईन नसलेला प्रत्यक्ष रंगमंचावरचा कार्यक्रम. यातील गुणी गायिकांना, प्रतिभावान वादकांना, नटी आणि सर्व कलाकारांना प्रेक्षकांची मनापासून दाद मिळून गेली. गेल्या तीन–चार वर्षात बरीच कलाकार मंडळी इथे सगळ्यांबरोबर जोडली गेली, काहींची परत नव्याने ओळख होत गेली. मंडळी, इथे कोणीही व्यावसायिक कलाकार नाहीयेत. प्रत्येक जण आपापली व्यवधाने सांभाळणारे हौशी रंगकर्मी आहेत. पण हौशी आहेत म्हणून गुणवत्तेकडे डोळे झाक न–करता, आणि न करू देता, आपलं भावविश्व, जाणवणारी उत्कटता या अनुभूतीमधून जाणीवपूर्वक सादर केलेल्या प्रत्येक कलाकृतीचं, कलाकाराचं प्रेक्षक कायमच कौतुक करत आले आहेत आणि यापुढेही करत राहतील. म्हणून म्हणतात ना की ''शौकिया थिएटर आदमीको अपने नसीबसे ऊचा उठा देता है'' हे कुठल्याही काळात आणि प्रदेशात परत परत खरं ठरत. या सगळ्या सादरीकरणाचं यश, कौतुक हे त्यामधील प्रत्येक कलाकाराचं आहे, मग तो रंगमंचावर काम करत असेल किंवा रंगमंच्यामागे.

नाटकाच्या प्रत्येक अंगाचे निकष बऱ्याचदा बदलत असतात. एक ढोबळ मानाने असं म्हणतात की इथे चांगलं नाटक वाईट नाटक असं काही नसतं. कोणाचा अधिक जास्त विचार, अभ्यास यांवर त्याचं यश अपयश ठरतं. म्हणूनच नाटकात काम करताना, नाटकातील पात्र उभं करताना, ती भूमिका समजून घेताना तिचे वेगवेगळे कंगोरे मांडताना आपण दुसऱ्या व्यक्तिमत्त्वाला आपल्या अनुभवांच्या चाळणीतून मांडत असतो. जेंव्हा आपण ते पात्र योग्य रीतीने समजून घेऊन मांडतो तेंव्हाच ते प्रेक्षकांनाही मान्य होत.

अहो बऱ्याचदा ही सवय नुसती नाटकात नाही तर आपल्या रोजच्या जीवनात खूप उपयोगी पडते बरंका! वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये समोरच्या व्यक्तीला समजून घेताना आणि म्हणूनच नाटक बसवणे म्हणजे खूप वेगळं काहीतरी आपण करतो आहोत असं काही नाही. आपल्या नेहमीच्या आयुष्यात आपण हेच करतो की! घरी एखाद्याकडून काही काम करून घायचं असेल, तर कॉन्ट्रॅक्ट देताना आपण नीट सर्वांगांनी विचार करतो ना? जसं की माझी कल्पना तो किव्हा ती नीट समजून घेऊन वेळेवर पूर्ण करून देईल ना? गुणवत्ता चांगली असेल ना? किंवा ऑफिसमध्ये मुलाखत घेताना असाच विचार करतो, की हा किंवा ही प्रामाणिक असेल ना? कामाबाबत, दिलेलं काम वेळेवर योग्य रितीने पूर्ण होईल ना? तेच सगळे विचार नाटकाच्या बाबतही करावे लागतात. अर्थात, याच बरोबरीने रंगमंचीय अवकाशाची सखोल जाणं असणं सर्वात महत्त्वाचं. मुळातच नाटक हे सांस्कृतिक आणि सामाजिक आयाम व्यक्त करणार एक गंभीर माध्यम आहे.

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ही की, कुठलीही कला ही केवळ स्वतःच्या आनंदासाठी करत राहणं. जन परिणामाचा विचार आणि अपेक्षा बऱ्याचदा मानसिक स्वास्थ रसातळाला घेऊन जातं. प्रतिभासंप्पन्न कलेला आणि कलाकाराला लोकाश्रय कायमच मिळत असतो. स्वानंदातून सादर झालेली कला ही कुठल्याही बाह्यानंदापेक्षा खूप आनंद देऊन जाते. कारण मुळातच आनंद ही एक अवस्था आहे, गुण नाही. कलेच्या नवं निर्मितीमधून आपण आनंदाचे छोटे छोटे क्षण अनुभवत असतो आणि हेच नवनिर्मितेचे क्षण आपल्याला कमालीची ऊर्जा देऊन जातात. कारण मुळातच कुठलीही कला; ही जगण्याचा प्रवास अधिक समृद्ध करण्यासाठी, आनंदाची अनुभूती देणारं, एक प्रभावी माध्यम आहे.

# MSBC Events 2024
















# कलादालन



अनिका गोरे (वय ७)




श्लोक पाटील (वय १०)



आयुष फडके (वय ११)




रिया सहस्त्रबुद्धे (वय १२)




अक्षरा चौधरी (वय १४)




रश्मी कामत (वय १५)



# वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें

• विद्युल्लेखा अकलूजकर •

मेपलच्या वारीच्या दिवसात ती तिच्या नेहमीच्या प्रभातफेरीला निघाली होती. महाराष्ट्रात पंढरीला जायला वारकरी निघाले, की इथे कॅनडाच्या पश्चिम तीरावर मेपलच्या वारीला प्रारंभ होत असे. सगळे मराठी नवागत अलिकडे दोनतीन वर्षांपूर्वीपासून मराठी मंडळाच्या वॉट्सॅप ग्रुपवर आपल्या फिरण्याचे किंवा पळण्याचे, सायकलीवरच्या रपेटीचे किंवा पोहण्याचे किलॉमीटर्स नोंदवायचे, मग सगळ्यांच्या संख्येची एकत्रित नोंद व्हायची, आणि शेवटी तिथली पंढरीची वारी संपताना इथल्या मेपलच्या वारीतल्या सर्वोत्कृष्ट उमेदवारांचे कौतुक केलं जायचं. या मेपलच्या वारीची सांगता बर्नबीतील सेंट्रल पार्कमध्ये किंवा आणखी कुठल्यातरी पार्कमध्ये सहकुटुंब, सहपरिवार जाऊन पिकनिकसारखी मजेत व्हायची. हे सगळं बघायला, यात सहभागी व्हायला तिला आवडायचं, पण ती तिच्या पद्धतीने नुसती फिरायची. आपल्या संख्येची नोंद, किंवा दुसऱ्या कोणाशी स्पर्धा तिला नको असायची. मधून मधून ती आपल्या मार्गावर दिसलेलं सौंदर्य टिपायची, आणि ते सगळ्यांना दाखवायची. तेवढ्याने तिला आनंद मिळत असे.

आज ती आपल्या वसाहतीतून निघून ग्रॅनव्हिल ओलांडून समोरच्या लान्सिंग वसाहतीतून चालली होती. लान्सिंग रस्त्यावरून आत येताना तिला ते गगनचुंबी सिक्वोयाचे भलेमोठे वृक्ष दिसू लागले. एका अपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या पार्किंग लॉटच्या रस्त्याकडच्या बाजूला ते कित्येक वर्षांपूर्वीपासून लावलेले असावेत. त्या पाच वृक्षांपैकी गेल्या वर्षीच्या हिंवाळ्यात त्यातील तीन वृक्षांनी जीव सोडला होता. ते संपूर्णपणे भुऱ्या रंगाचे आणि जळके होऊन गेले होते, आणि तिला त्याचं खूप वाईटही वाटलं होतं. पण सगळीचकडे सध्या हवामानबदलाचे जालिम दुष्परिणाम जाणवत होते, त्याचंच हे आणखी एक उदाहरण होतं. काय करणार?

असा विचार करीत ती त्या वृक्षांजवळ पोचली, तेव्हा तिला दिसलं की यातले तीन वठलेले वृक्ष काढून टाकण्याची सिटी हॉलची नोटीस त्या वृक्षांपैकी सगळ्यात मोठ्या वृक्षावर आणि आणखी दोन मधल्या वृक्षांवर लावलेली होती. पण हे काय? ते मधले दोन वृक्ष खरोखरच वठलेले होते, पण पहिला जो मोठा वृक्ष होता, तो अजिबातच वाईट झालेला नव्हता. तो तर सगळ्यात अधिक हिरव्यागार पानांच्या फांद्या मिरवीत होता आणि त्या सगळ्यांत अतिशय भव्य आणि सुंदर दिसत होता. मग ही पांढरी नोटीस त्याच्या खोडावर कशी आणि कां बरं लावून ठेवली होती?

याचा छडा लावल्यावाचून तिला तिथून पुढे जाववेना.

सकाळी सहाची वेळ होती. रस्त्यात चिटपाखरूही नव्हते. एकाददुसरा माणूस आपल्या गाडीत बसून जाताना दिसायचा, तेवढाच. नियमाप्रमाणे झाडे तोडण्यापूर्वी अठ्ठेचाळीस तास सर्वांना कळावं म्हणून नोटीस लावून ठेवण्यात आली होती. त्यावर तारीख कालची होती. म्हणजे उद्या येऊन कापणारे कामगार वृक्ष कापून टाकणार. अरे बापरे! म्हणजे भलताच गोंधळ होऊ शकेल! त्यांनी केवळ तीन ''रेडवुडचे वृक्ष कापणे ठरवलेले आहे'', एवढंच प्रत्येक कागदावर लिहिलेलं होतं. सिक्कोयाला रेडवुड म्हणणं ही काही चूक नव्हे, पण चुकीच्या वृक्षाला बळी देणं म्हणजे मात्र भयानक त्रासदायक चूक होती! चोर सोडून संन्याश्याला सुळी देण्यासारखी! पण नोटीस लावणाऱ्याची ही घोडचूक कापणाऱ्यांना जर उमगली नाही, तर या बिचाऱ्या जित्यजागत्या हिरव्यागार वृक्षावर कुऱ्हाड चालवली जाणार की काय? भयानं तिची गती कुंठित झाली. पावलं पुढे जाईचनात!

आता काय बरं करावं? हे मुळीच होतां कामा नये! तिरीमिरीने तिने ती पहिल्या सुंदर वृक्षावर स्टेपल्सनी लावलेली पांढरी नोटीस आपल्या नखांनी स्टेपल्स कसेबसे वाकवून त्यातून चक्क काढून हातात घेतली, पण त्या पार्किंग लॉटच्या दुसऱ्या टोकाशी असलेल्या तिसऱ्या मेलेल्या झाडाजवळ जाऊन ती नोटीस त्याच्यावर लावण्यात मात्र तिला मुळीच यश आलं नाही. कारण मूळचे चार स्टेपल्स त्या पहिल्या वृक्षातच अडकलेले होते. तिला ते काढता येत नव्हते. आणि ती काढलेली नोटीस त्या तिसऱ्या झाडाच्या खोडावर कशाने घट्ट लावणार ते तिला काही केल्या सुचत नव्हतं. बरं, न लावतां नुसती नोटीस त्या झाडाच्या मुळाशी ठेवणं मूर्खपणाच झाला असता. कारण वाऱ्याने ती उडूनच गेली असती कुठल्या कुठे! मग तिने ठाम विचार करून ती नोटीस चक्क घडी करून आपल्याच खिशात घातली, आणि ती आपलं तासभराचं फिरणं पूर्ण करून सरळ आपल्या घरात शिरली. पण नवऱ्याला नाश्ता देऊन झाल्यावर तिने लगेच रिचमंडच्या सिटी हॉलच्या वेबसाइटवर जाऊन, तिथून पार्क्स बोर्डाचा नंबर शोधून, त्यांना फोन लावून, आपण त्या वृक्षांवर चुकीच्या ठिकाणी लावलेली नोटीस का काढली वगैरे सांगायला सुरुवात केली.

तोवर तिच्या आजच्या फिरण्यातले हे तपशील घरच्या मंडळींना कळलेले होते. ''नोटीस काढायला नको होतीस तू! नुसतं फोनवर सांगता येत नव्हतं का?'' इति नवरा. ''मॉम, आर यू गोइंग टु जेल फॉर रिमूव्हिंग द लीगल नोटिस?'' मुलगी. ''मॉम, डोंट वरी! जस्ट आस्क मी टु बेल यू आउट!'' मुलगा. ती कुणाशीही वाद न घालतां नुसती एकामागून एक फोन करण्यात दंग! पाचसहा फोननंतर एका कोणीतरी तिला दाद दिली. हा नंबर ''सेव्ह द ट्री'' अशा नावाखाली होता. पुन्हा हिने नेमकी नोटीस लावणाऱ्यांची काय चूक झालीय, ते सांगितलं, आणि उद्याला वृक्षांना कापणारा कॉंट्रॅक्टर कोण ते सांगणार का आपल्याला, असं म्हटल्यावर त्या बाईने ''नाही, मी तुला त्याचं नाव नाही सांगू शकत, पण तुझा निरोप मात्र नक्की त्याच्याकडे पोचवीन'' असं आश्वासन दिलं. हिने ''आजच्या आज हे नक्की कराल ना पण?'' असा मात्रेचा आणखी एक वळसा दिला, आणि होकार मिळाल्यावर त्या बाईचे नावही विचारून घेतलं आणि मगच तिला बरं वाटलं. शिवाय स्वत:चं नाव तिने त्या कोणालाही सांगितलंच नव्हतं. फक्त नेमकं झाड कुठलं कापायचं, आणि कुठलं नाही कापायचं, एवढाच तपशीलवार निरोप दिला होता.

पुढचा दिवस कसाबसा इतर सत्राशे साठ कामं आवरण्यात पटकन संपला. मधून मधून तिला त्या भव्य वृक्षाची आठवण येत राहिली, आणि ती मनोमन त्याच्याशी संवाद करत, त्याला (आणि स्वत:लाही) धीर देत राहिली. रात्रीची झोप तरी अस्वस्थच लागली. दुसऱ्या दिवशी पुन्हा पहाटफेरी घालायला ती निघाली, आणि पुन्हा त्याच वसाहतीच्या दिशेने तिने मोहरा वळवला. एरवी दर दिवशी पंचक्रोशीतल्या वेगवेगळ्या दिशांनी ती फिरत असे. पण आज तिला तिथे गेल्यावाचून चैन पडणार नव्हतं. लांबूनच तिला त्या रस्त्यावर वृक्षांच्या ओळीत मधली रिकामी जागा प्रथम दिसली, आणि तिथल्या वृक्षांऐवजी कापून आडवे घालून ठेवलेले भले दांडगे ओंडकेही दिसले. अरे बाप रे! म्हणजे एवढ्यात हे कापणारे कामगार येऊन कापून गेलेदेखील! मग तो मोठा वृक्ष कुठे आहे? पण ती रस्त्याच्या कोपऱ्याशी आली मात्र, तो भव्य वृक्ष जागच्या जागी स्थिर उभा होता! वा! ''देवा, तुझी कृपा!'' म्हणत ती त्याच्या हिरव्यागार वैभवाच्या जवळ येऊन उभी राहिली. त्याच्याशी मूकपणे बोलत राहिली. त्याच्या अंगाखांद्यांवर खेळणाऱ्या बारक्या पक्ष्यांच्या भूपाळ्या तिला सहज ऐकू येत होत्या. तिच्या एका छोट्याशा मनस्वी कृतीमुळे त्या सगळ्या जिवांचा तो पोशिंदा वाचला होता. तिला कृतकृत्य वाटलं. आणि थोडासाच वेळ त्या मोठ्या सिक्कोयाडेंड्रन जायगँटियुमच्या खोडाला थोपटून ती परत आपली पहाटफेरी पूर्ण करायला निघाली. तिच्यापुरती तिच्या मेपलच्या वारीची सांगता झाली होती!



# कलाकृती नको पण प्रमोशन आवरा ..!

• नेत्रा जोशी •

आजकाल कुठलाही सिनेमा रिलीज होणार आहे असं कळलं की धडकीच भरते, कारण, बापरे म्हणजे आता अजून एका सिनेमाच्या प्रमोशनचा धबधबा अंगावर कोसळणार तर आणि त्यात इच्छा नसताना केवळ पर्याय नाही म्हणून भिजावं लागणार. तुम्ही म्हणाल बघू नकोस प्रमोशनचे व्हीडिओज, त्यात काय एवढं? पण प्रश्न व्हिडिओ बघावे की नाही हा नाहीच आहे. त्यांचे thumbnails डोळ्यांसमोर सतत नाचतच राहतात. तर मुद्दा हा आहे एखादा सिनेमा कसा आहे, हे ठरवायचा हक्क आता प्रेक्षकांकडे राहिलेलाच नाहीये का? अरे सिनेमाविषयी बेसिक माहिती देऊन थांबा की.... मग टीझर बघून पुढची उत्सुकता प्रेक्षकांना निर्माण तर होऊ द्या. अगदी कुठल्याही व्हिडिओवर क्लिक करायचं नाही असं ठरवलं तरी सिनेमाचा टीझर आल्यापासून ते सिनेमा रिलीज होईपर्यंत आणि रिलीज झाला की मग सिनेमाच्या यशाचे पोवाडे गाऊन संपेपर्यंत स्क्रीनवर दिसत राहणारे विविध करमणूकप्रधान आणि गॉसिप वाहिन्यांद्वारे केलेल्या व्हीडिओजचे thumbnails इतके सतत डोळ्यासमोर नाचवले जातात की एका क्षणाला 'अरे पुरे करा रे' असं मनात आल्याशिवाय रहात नाही. हे सिनेमाच्या यशाला मारक ठरतंय हा विचार कुणाच्या मनात येत नसेल का? Collection चे आकडे कदाचित उलटही सांगत असतील. मी अमान्य करत नाहीये, पण एक सामान्य प्रेक्षक म्हणून जे जाणवलं ते मांडण्याचा हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे.

अनेकदा अनेक कलाकारांनी जाहीर मुलाखतीत हे सांगितलेलं आहे की, आम्ही शुटींग करून दमत नाही इतके त्यानंतर त्या सिनेमाचं प्रमोशन करून दमतो. पण काय करणार? आम्हाला या बाबतीत चॉईस दिला जात नाही. ही अत्यंत खेदजनक बाब आहे असं मला तरी वाटतं.

अरे प्रेक्षक म्हणून आम्हाला ठरवू द्या की सिनेमा कसा आहे ते. आजकालचा प्रेक्षक तितका सुजाण नक्कीच आहे. शेवटी प्रेक्षकांसाठीच करता ना निर्मिती? मग स्वतःभोवती आधीच दिवे ओवाळून घ्यायचं हे लोण ज्या वेगाने पसरत चाललंय त्यामुळे या लोकांना स्वतःच्याच कलाकृतीबद्दल म्हणावं तसा विश्वास नाहीये की अनेक platforms मुळे प्रचंड प्रमाणात होणाऱ्या निर्मितीच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी केली जाणारी ही केविलवाणी धडपड आहे, हा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही.

हेच पेव आता थोडंफार प्रमाणात गाण्यांच्या मैफिलींपर्यंतही पोचायला लागलंय. म्हणजे आज संगीतक्षेत्रात खूप चांगल्या स्थानावर आणि अखंड कार्यरत असणारे अनेक जण माझे खूप चांगले जवळचे मित्रमैत्रिण आहेत आणि त्यांच्याकडून मी हे खूपदा ऐकलंय की आम्हाला कार्यक्रमामधल्या आमच्या सादरीकरणाचं जितकं टेन्शन नसतं तितकं त्या कार्यक्रमाचा प्रोमो रेकॉर्ड करताना येतं. पूर्वीची दिग्गज मंडळी सतत म्हणत असत की तुमची कला तुमची ओळख ठरली पाहिजे, एकदा ती बोलायला लागली ना की तुम्हाला बोलायची गरजच पडणार नाही. तुमची कलाच तुमचा प्रेक्षकवर्ग तुमच्याकडे खेचून आणेल. पण मग आजकाल आपलं हे काय चाललंय? शांतपणे एक ध्येय ठेवून काम करत राहण्यापेक्षा काय करतो ते सतत दुसऱ्याला सांगत राहण्याची एक विचित्र गरज सोशल मिडियाने निर्माण केलेली आहे. स्वान्तसुखाय म्हणूनही काही गोष्टी करता येतात हे आपण विसरत चाललोय का? आणि अगदीच व्यावसायिक म्हणून संगीतक्षेत्रात काम करत असाल तर, आजकाल मी छान गाते, किंवा छान वाजवते किंवा छान बोलते हे पुरेसं नसतं तर मला माझ्या कामाबद्दल किती छान बोलता येतं हे ही तितकंच महत्त्वाचं ठरू लागलंय. हे पूर्णतः चूक आहे असं माझं अजिबात विधान नाही. मी स्वतःदेखील performing arts background मधून आलेली असल्यामुळे तुमचं काम तुम्ही तोंड

उघडून सांगितलं नाहीत तर ते लोकांपर्यंत कसं पोचणार? हे आम्हाला शिकवलं गेलंय आणि आपल्या कामाची माफक ओळख करून देणं योग्यच आहे, पण कधीकधी सोशल मिडिया आणि चॅनेलकडून या मर्यादा ओलांडल्या जातात असं मला वाटतं.

प्रमोशन हे फक्त त्या कलाकृतीबद्दल गरजेची असेल तेवढी उत्सुकता निर्माण करणारं असावं असं माझं तरी प्रामाणिक मत आहे. पण दुर्दैवाने ते तितकंच रहात नाही कारण आजकाल चित्रपट आणि संगीतविषयक कार्यक्रमांची मुबलकता यामुळे एक छुपी स्पर्धा निर्माण झालेय. त्यामुळे नवीन पिढीचा कल हा सादरीकरणापेक्षा स्वतःची जाहिरात करत राहणे याकडे जास्त होत चाललाय आणि तो नकळत त्यांच्यावर ताण निर्माण करतोय. पूर्वी कदाचित कलेच्या क्षेत्राकडे कमी लोकं वळत असत म्हणूनही असेल, पण या सगळ्याची गरज भासली नाही. आता काळ बदलतोय तशी उपलब्धता वाढतेय, पण त्याचबरोबर नकळत स्पर्धादेखील वाढतेय. आणि त्यामुळे कलेचा आत्मा कुठेतरी हरवत चाललाय ही खंत वाटल्याशिवाय रहात नाही.

'रोटी' सिनेमामधलं आनंद बक्षी यांनी लिहिलेल्या गाण्याचा एक वेगळा अर्थ हा लेख लिहिताना जाणवला

ये जो पब्लिक है ये सब जानती है
अजी अंदर क्या है बाहर क्या है
सब पहचानती है
ये पब्लिक है

# शोधा बरं!

**खाली दिलेल्या अक्षरसंचयात एमएसबीसी संबंधी प्रश्नांची उत्तरे लपलेली आहेत. उभ्या, आडव्या, तिरक्या कशाही क्रमात ती असू शकतात. शोधा बरं! (उत्तरे इतरत्र)**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र | न | ड | ध | र | ग | म | व | जा | ब | म | व | भा | का | ग |
| य | ल | व | भा | गी | बी | सं | ड | प | त | य | ध | ल | ळे | य |
| द | चा | म | त | फ | त | ड | ल | मा | न | प | नि | का | ग | र |
| ग | पु | र | मा | सा | प | धा | ज | फ | पु | र | श | प | इं | म |
| जा | नि | न | क | द | य | मा | रा | नो | मा | हे | म | सा | द | व |
| ल | म | ळी | म | प | य | प्र | ब | द | म | न | ग | ब | नं | ज |
| ध | क | ल | पो | प | र | द | स | चा | पु | र | मा | पु | आ | ड |
| र | य | मा | प | ळ | द | न | म | रा | वा | द | ब | व | चा | कि |
| म | क | रा | भा | जा | गु | जा | त | क | वे | म | र्त | य | ल | ची |
| त | प | ड | मा | प | न | पु | ण | री | जा | न | फ | बि | र | मा |
| ग | स्व | य | रा | मा | र्क | क | प | म | वा | द | ल | त | प | ध |
| चा | ल | र | नि | प | र | ण | व | य | गा | ची | प | जा | वा | य |
| ध | द | ब | सं | ज | मा | ब | ड | प | च्या | गा | ल | व | न | चा |
| य | र | ल | पु | ध्या | प | ति | मा | ज | मा | ल | मा | प | फ | ग |
| ड | भा | व | त | ध | र | ग | प्र | ध | प्रे | फ | ध | प्रे | मे | म |

१ २०२४च्या क्रिकेट स्पर्धेतील विजेता संघ
२ ढोल ताशा पथकाचे नाव
३ पहिले अध्यक्ष
४ पहिल्या महिला अध्यक्ष
५ २०२४च्या हळदीकुंकू समारंभातील गोड पदार्थ
६ २०२३मध्ये आयोजित नाट्यमहोत्सवातील प्रतिथयश कलाकार
७ सुरवातीच्या काळातील गाण्याच्या कार्यक्रमाचे नाव
८ मंडळाचे बातमीपत्र
९ गेली ५ वषे सादर होत असलेला गाण्याचा कार्यक्रम
१० एमएसबीसीच्या रौप्य महोत्सवातील गायक कलाकार
११ आपली मराठी शाळा
१२ व्हॉलिबॉल स्पर्धेतील विजेत्या संघाचा कर्णधार
१३ टेबलटेनिस स्पर्धेतील एकेरी विजेता
१४ एमएसबीसी निर्मित दोन अंकी नाटक
१५ भक्ती आणि स्वास्थ्य याचा संगम – एमएसबीसीचा एक उपक्रम



# भरारी

• अग्रजा डाबरे •

बऱ्याच महिन्यांपासून ज्याची मी संयमाने वाट पाहत होते तो दिवस शेवटी आला. अखेर मला ग्राउज माउंटन झिपलाइनवर जाण्याची परवानगी मिळाली. दरवर्षी काही ना काही कारणामुळे मला ही परवानगी मिळाली नव्हती. ''तू पुरेशी उंच नाहीस / तू पुरेशी वजनदार नाहीस'' अशी कारणं दिली जात होती. पण यावर्षी काहीच अडचण नव्हती आणि मी अखेर त्या थरारक अनुभवात भाग घेऊ शकले.

माझा दिवस कंटाळवाण्या ट्रेकने सुरू झाला. मला ते फारसं आवडत नव्हतं. ''चांगल्या गोष्टी शेवटासाठी ठेवाव्यात.'' असं म्हणतात आणि माझ्यासाठी ती गोष्ट झिपलाईन होती. आम्ही ग्राउज माउंटनला पोहोचलो तेव्हा मी ती जबरदस्त झिपलाइन पाहिली. ती आधी पाहिली होती त्यापेक्षा जास्त भयानक वाटत होती. हे सगळं खरंच घडत होतं आणि तो फक्त माझ्या कल्पनेचा एक भाग नव्हता!

मी झिपलाइन एरियात प्रवेश केला आणि प्रशिक्षकाने दिलेल्या सूचना लक्षपूर्वक ऐकल्या. कारण त्या योग्य प्रकारे न पाळल्यास ते खूप धोकादायक ठरू शकतं. सूचना देऊन झाल्यावर त्यांनी आम्हांला हार्नेस, हेल्मेट आणि ट्रॉली असं झिपलाइन गियर दिलं. हे जड गियर मी खांद्यावर घेतलं आणि असं वाटलं जणू मी हजार पाउंडचं हत्तीचं वजन उचललंय! पहिला थांबा एक मिनी झिपलाइन मार्ग होता. ह्यात आम्हाला आगामी झिपलाइन मार्गांचा अनुभव मिळाला. मी माझ्या प्रशिक्षकाने सांगितलेलं काळजीपूर्वक ऐकलं. आम्हाला एक पोझ करायची होती, 'हँडल पकडा, गुडघे वर आणा.' हे जवळजवळ एक बॉलमध्ये वळलेल्या स्थितीसारखं होतं, पण आमच्या सुरक्षिततेसाठी ते महत्त्वाचं होतं.

त्यानंतर माझ्या प्रशिक्षकाने मला झिपलाइनवर हुकने अडकवलं. त्याने मला सोडल्यावर माझ्या चेहऱ्यावर हसू फुटलं. मला आकाशात उडणाऱ्या पक्षासारखं मुक्त वाटलं! माझा हात हँडलवरून सुटला आणि मी जोरात किंचाळले. तेव्हढ्यात मला माझ्या प्रशिक्षकाचा ओरडतानाचा आवाज ऐकू आला, ''हँडल पकडा, गुडघे वर आणा.'' मी त्याने सांगितलं तसंच केलं आणि सुरक्षितपणे झिपलाइनच्या शेवटी पोहोचले. मला कळलं की, ही


तर फक्त सुरुवात आहे आणि अजून बरंच काही बाकी आहे. त्यानंतर, मी आणखी ४ अतिशय कठीण झिपलाइन्स केल्या. प्रत्येक झिपलाइन आधीपेक्षा अधिक कठीण होती. ह्या थरारक अनुभवाची मला आजही खूप आठवण येते. दरवर्षी मी झिपलाइनवर जाते, पण माझा पहिला अनुभव अप्रतिम होता.

ग्राऊज माउंटनवर झिपलाइनिंग केल्यावर मला तिथे आणखी काय करता येईल उत्सुकता वाटायला लागली. मी सर्व उन्हाळी आणि हिवाळी ॲक्टिव्हिटीज शोधल्या. त्यातलं स्कीइंग करून बघायला मला आवडेल अशी खात्री वाटली! बर्फाच्छादित पर्वतावर स्कीइंग करण्याच्या विचारानेच मला थरारून आलं. मी माझ्या बाबांना माझं आणि माझ्या भावाचं नाव बिगिनर स्कीइंग क्लासेससाठी नोंदवायला सांगितलं आणि शांतपणे हिवाळ्याची वाट बघायला लागले. हिवाळ्यातली पहिली बर्फवृष्टी होताच मी बर्फाळ पर्वताच्या टेकड्यांशी लढायला तयार झाले आणि स्कीइंगची तयारी सुरू केली. माझा पहिला धडा एका छोट्या टेकडीपासून सुरू झाला. आम्ही तिथे स्कीइंगचे बेसिक धडे शिकलो. आम्ही 'पिझ्झा' करायला शिकलो, म्हणजे आमच्या स्कीजना त्रिकोणाचा आकार देऊन सुरक्षित आणि सावकाश स्लोपवरून खाली जाणं!

थोडी प्रॅक्टिस केल्यावर आम्ही पहिली ग्रीन हिल 'बनी हिल' टेस्ट करण्यासाठी तयार झालो. आम्ही आमचं 'पिझ्झा' फॉर्मेशन वापरलं आणि आमच्या प्रशिक्षकांच्या पावलांचा मागोवा घेत टेकडीवरून खाली आलो. पहिल्यांदा टेकडीवरून जाताना, मी फारच वाईट कामगिती केली! मी माझ्या ग्रुपसोबत राहू शकत नव्हते, मागे पडत होतो आणि माझ्या प्रशिक्षकांच्या सुचनांचे योग्यरित्या पालन करायलाही जमत नव्हतं. त्या वेळी मला वाटलं की कदाचित स्कीइंग मला कधी जमणारच नाही, पण मी स्वतःवर विश्वास ठेवून तसच पुढे करत राहिले. पहिल्या दिवशीची शिकवणी तीन तास चालली. दुसऱ्या दिवशी मला अजिबात उत्साह नव्हता पण तरीही मी उठले, माझं गिअर घेतलं आणि ग्राऊजला निघाले. आम्ही बनी हिलवर प्रॅक्टिस सुरू केली. दुसरा दिवस पहिल्यापेक्षा खूपच चांगला होता. छोट्या छोट्या सुधारणांमुळे मला अजून मेहनत करण्याची प्रेरणा मिळाली आणि तीन तासांच्या क्लासमध्ये मी कालपेक्षा जास्त शिकत होते असं वाटलं. दुसऱ्या दिवशी मी सूचना नीट पाळत होते. मी घरी आनंदी मनाने आणि चेहऱ्यावर स्मितहास्याने गेले. तिसऱ्या दिवशी, आमच्या प्रशिक्षकांनी सांगितलं की आम्ही आता बनी हिलवर नाही तर खरोखर मोठ्या टेकडीवर जाणार आहोत. उतार बघेपर्यंत मला पूर्ण आत्मविश्वास वाटत होता. पण जाऊन बघितलं तर तो स्लोप खूपच मोठा होता आणि आजवर मी कमावलेला सर्व आत्मविश्वास एका सेकंदात नष्ट झाला. त्याचं नाव 'द कट' असं आहे. माझ्या मनात असंख्य प्रश्न घोळत होते, 'मी या स्लोपवर पडले तर?' किंवा 'मी एखाद्या ठिकाणी अडकले तर आणि मला कोणी भेटलं नाही तर?' किंवा 'मी एखाद्या झाडाला धडकले तर?'! मी त्या स्लोपवरून खाली जाऊ शकेन असं मला वाटतच नव्हतं. आमच्या प्रशिक्षकांनी आमच्या ग्रुपला तयार होण्यासाठी सांगितलं. मी बसून फक्त स्लोपकडे बघायला सुरुवात केली. 'द कट' अशा प्रकारे तयार केला आहे की तिथून व्हँकुअरचं सर्वोत्तम दृश्य दिसतं. संपूर्ण व्हँकुअर दिसणारं ते सुंदर दृश्य मी मनात भरून घेतलं. ते पाहून माझं मन शांत झालं आणि मी मानसिकदृष्ट्या माझ्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आव्हानाचा सामना करण्यासाठी तयार झाले. मी हळूहळू उठले, एक दीर्घ श्वास घेतला आणि स्लोपवरून झेप घेतली. एका क्षणासाठी, मला असं वाटलं की मी उडत होते आणि मी अजेय होते. मला जाणवलं की स्लोप अधिक तीव्र होत आहे आणि मी पुन्हा वास्तवात परत आले! आतापर्यंत मी शिकलेल्या सर्व तंत्रांचा मला वापर करावा लागला. मी 'पिझ्झा' म्हणजे स्नोप्लो, कार्विंग आणि एक स्की टर्न वापरून यशस्वीरित्या स्लोपचा शेवट गाठला. मी उतरत असताना, मला खूप अभिमान वाटत होता! राल्फ वाल्डो इमर्सन यांच्या शब्दात सांगायचं झालं तर, ''भीती जगातील इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा जास्त लोकांचा पराभव करते.''

ग्राऊज माउंटनवरील माझे अनुभव, झिपलाइनिंग आणि स्कीइंग, हे फक्त थरारक नव्हते; ते धैर्य आणि चिकाटीच्या महत्त्वाच्या धड्यांनी भरलेले होते. हवेत झिपलाइनवरून उडतानाचा थरार असो किंवा तीव्र उतारावरून स्कीइंग करण्याची भीती असो, प्रत्येक क्षणाने मला माझ्या भीतीपलीकडे जायला शिकवलं. या अनुभवांनी मला समजलं की मोठ यश मिळवण्यासाठी आपल्याला आपल्या सवयीच्या जगाबाहेर जावं लागतं. जेव्हा मी मागे वळून पाहते, तेव्हा मला अभिमान वाटतो की मी माझ्या भीतीला तोंड दिलं आणि नवीन आव्हानं स्वीकारली. हे सिद्ध केलं की निर्धार आणि धैर्याने, मी कोणत्याही अडथळ्यांवर मात करू शकते!

# खुर्ची – एक सिंहासन



• विवेक आस्वलकर •

वाचकहो, कथेचं शीर्षक वाचून गोंधळून गेलात ना? अहो,सत्तेतल्या खुर्चीचा आणि या कथेतल्या खुर्चीचा काडीमात्रही संबंध नाही. तर मंडळी, ही कथा आहे ऑफिसामधल्या चार मध्यमवर्गीय सहकाऱ्यांची. बऱ्याचदा आपण ठरवतो एक आणि होतं काही वेगळंच. असाच काहीसा अनुभव नारायण खेडेकर यांना आला होता.

अलीकडेच त्यांनी काटकसर करून बदलापूर येथील चाळीमध्ये दोन खोल्यांचं घर घेतलं होतं. घरातल्या वस्तूंची खरेदीही ऐपतीनुसारच चालू होती. मिसेस खेडेकरांचं 'घरामध्ये फर्निचर हवं', असं टुमणं बरेच दिवसांपासून चालू होतं. नारू ऑफिसला निघताच त्या म्हणाल्या, ''अहो, ऐकताय ना? तुमच्या ओळखींमध्ये कोणी स्वस्तामध्ये फर्निचर विकत असेल तर विचारून पहा बरं.''

नारायण त्यांच्या ऑफिसमध्ये नारू या नावानं प्रसिद्ध होता. ऑफिसमध्ये पोहचताच त्यानं आपल्या सहकाऱ्यांसमोर विषय काढला. ''अहो घारुअण्णा! तुमच्या ओळखीमध्ये जर कोणी फर्निचर विकत असेल तर नक्की कळवा.'' घारुअण्णा म्हणजे प्रचंड चतुर आणि व्यवहारी व्यक्तिमत्व. ते बऱ्याच गोष्टींची खबर ठेवतात याची नारूला कल्पना होती.

''अरे नारू! कालच मुरली म्हणाला होता की, त्याला दोन खुर्च्या काढायच्या आहेत. चांगल्या सागवानी आहेत. अगदी सिंहासना सारख्याच! स्वस्तामध्ये देऊन टाकेल तो. तू विचारून तर बघ.'' घारुअण्णा छताकडे बघत म्हणाले. मुरलीने अलीकडेच ठाण्यामध्ये टू बीएचकेचा फ्लॅट घेतला होता. त्याच्याकडे असलेल्या वडिलोपार्जित खुर्च्या नवीन फ्लॅटमध्ये शोभा वाढवण्याऐवजी अडचणच करत होत्या. त्या खुर्च्या घराबाहेर काढण्याचा चंगच मुरलीच्या पत्नीने केला होता.

खुर्च्यांच्या किंमती ऐकून नारूला आभाळ अगदी ठेंगणं झालं होतं. कोणताही विलंब न करता नारूने व्यवहार पक्का केलाही आणि सकल खेडेकर कुटुंब घरामध्ये खुर्च्यांचे स्थान कोठे असायला हवे याची मांडणी करू लागले. मुलांनी तर त्या खुर्च्यांचा वापर कसा करता येईल याचं एक वर्कशॉपच केलं.

खुर्च्यांच्या आगमनाचा दिवस ठरला. खुर्च्या ठाण्याहून बदलापूरला आणायची योग्य वेळ म्हणजे दुपारची,ज्या वेळेस ट्रेनला गर्दी कमी असते. नारू आपला परोपकारी मित्र दत्तू याला घेऊन सकाळीच मुरलीच्या घरी दाखल झाला. गप्पाटप्पा आणि चहापान होईपर्यंत अकरा वाजले. ऊनं चांगलीच वर आली होती आणि त्यातच मे चा महिना. नारू खुर्च्यांकडे न्याहाळत, खुश होत म्हणाला ''वा वा, फारच भारी आहेत या खुर्च्या.'' मुरली हळूच नारूला बाजूला घेऊन पुटपुटला, ''अरे नारू, माझं ऐक, या खुर्च्या टेम्पोने घेऊन जा.'' मुरलीचा तो सल्ला काही नारूच्या पचनी पडला नाही, कारण टेम्पोचं भाडं त्याला परवडणारं नव्हतं. तो अत्यंत आत्मविश्वासाने मुरलीला म्हणाला ''तू कां काळजी करतोस? माझ्या सोबत दत्तू आहेच. आम्ही दोघे या खुर्च्या सहज उचलून नेऊ शकतो.'' नारूचा निर्धार पाहून मुरली मूग गिळून गप्प बसला.

मंडळींनी खुर्च्या नारू आणि दत्तूच्या डोक्यावर विराजमान करताच ''खुर्च्या फारच भारी आहेत'', असं वाक्य आपसूकच नारूच्या तोंडून निघालं. मंडळी हळूहळू जिने उतरून बिल्डिंगच्या खाली उतरली. एवढ्या प्रवासातच नारू आणि दत्तू चांगलेच घामाघूम झाले होते. मित्रांना स्टेशनपर्यंत सोबत करावी असा

प्रामाणिक विचार घारुअण्णा आणि मुरलीच्या मनात आला आणि ती वरात हळूहळू स्टेशनच्या दिशेने निघाली. एव्हाना उन्हाचे चटकेही जाणवायला लागले होते.

जेमतेम पन्नास एक पावलं चालून गेल्यावर नारू आणि दत्तू एकदमच गलितगात्र झाले आणि चक्क खुर्च्या खाली उतरवून त्यांनी फुटपाथवरच ठिय्या मारला. रस्त्यावरच्या लोकांनां वाटलं की खुर्च्या विकायला ठेवल्या आहेत. जो तो थांबून, ''काय हो कितीला दिल्या?'' असे विचारू लागले. लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देता देता नारू प्रचंड बेजार झाला. धीर एकटवून पुन्हा एकदा खुर्च्या डोक्यावर उचलून त्यांनी स्टेशनच्या दिशेने वाटचाल सुरुवात केली. अजून काही अंतर चालल्यावर नारू आणि दत्तू एकदमच हवालदिल झाले. झेंडू फुटावा तसा घाम फुटला होता. वैतागून नारू मुरलीला म्हणाला, ''अरे मुरली, या खुर्च्या फारच अवजड आहेत. कदाचित आमच्या घरात शोभायच्या नाहीत.'' नारूचं हे वाक्य ऐकताच मुरलीच्या पोटात गोळाच आला. त्याच्या मनात पाल चुकचुकली –अरे बापरे! या खुर्च्या आपल्याला पुन्हा आपल्या घरी न्यायला लागतात की काय? त्यावर उपाय म्हणून मुरली नारुला म्हणाला, ''हे बघ नारू, हवे तर तू खुर्च्यांचे पैसे अजून कमी दे.'' खुर्च्यांचे कमी झालेले दाम ऐकून नारूची चिडचिड थोडी कमी झाली. कपाळावरचा घाम पुसत त्याने पुन्हा एकदा खुर्ची डोक्यावर घेत मुकाट्यानं चालायला सुरुवात केली. दत्तूचे हाल तर कुत्रा खाईना. आपल्या मैत्रीला जागत मुकाट्याने नारूच्या मागून जाणं हेच त्याच्या हातात होतं.

सध्य परिस्थितीचा अंदाज घेत घारुअण्णा मुरलीच्या कानात पुटपुटतले, ''हे बघ मुरली,आपण असेच यांच्या सोबत स्टेशनपर्यंत गेलो तर कदाचित तुला खुर्च्या फुकटात द्याव्या लागतील. माझं ऐक, आपण इथूनच मागं फिरुया.'' मुरलीला घारुअण्णांचं म्हणणं पटलं आणि अचानक काहीतरी आठवल्याचा आव आणत तो म्हणाला. ''अरे देवा ! विसरलोच की. आमच्या हिची आई गावाहून येत आहे. तिला घ्यायला एस. टी. स्टॅण्डवर जायचं आहे.'' असं म्हणत त्यांनी काढता पाय घेतला.

नारू आणि दत्तू हेलपाटत का होईना, एकदाचे फलाटावर पोहोचले. दोघांचं सर्वांग घामाने निथळत होतं. त्यांच्या घशाला कोरड पडली होती. खुर्च्या डब्यात चढवण्याचं दिव्य कसंतरी पार पडलं. ट्रेनमध्ये आता कुठे थोडासा विसावा मिळत होता. बदलापूर स्टेशनवर ट्रेनमधून खुर्च्या बाहेत काढल्यावर गड काबीज केल्याच्या अविर्भावात मंडळी निघाली खरी, पण आपसूकच तिकीट चेकरच्या जाळ्यात सापडली. ''अरे देवा, या सगळ्या गडबडीत तिकीट काढायचंच राहून गेलं.'' नारू दत्तूच्या कानात पुटपुटला. गयावया करत आणि थोडी चिरीमिरी देत त्या दोघांनी आपली सुटका करून घेतली. अखेर मंडळी जेव्हा चाळीच्या पटांगणात पोहोचली तेव्हा चाळीतली काही कार्टी मोठमोठ्यानं गलका करू लागली,जसा काही डोंबाऱ्याचा खेळच चालू आहे. त्यांचा आवाज ऐकून चाळीतील बायका पुरुष गॅलरीत जमा होऊन तमाशा बघू लागली. अनेकांनी तर नारूवर प्रश्नाचा भडीमार करायला सुरुवात केली. आधीच शिणलेल्या नारूच्या अगदी नाकी नऊ आले. कधी एकदा घर गाठतो असं त्याला झालं होतं.

मंडळी दोन जिने चढून वर आली आणि घरासमोरील व्हरांड्यात खुर्च्या खाली ठेऊन त्यांनी चक्क लादीवर बसकणच मारली. खुर्च्या पाहून सौ.खेडेकर प्रचंड खुश झाल्या. खुर्च्या घरात कुठे ठेवायच्या याचा सर्वानुमते प्लॅन बनला.पहिली खुर्ची हलवायला सुरुवात केली आणि नारूच्या पायाखालची जमीनच सरकली. तो मटकन खालीच बसला. दत्तू अवाक झाला आणि नारूच्या पत्नीने चक्क डोक्यावर हात मारून घेतला. आता काय करावे हे त्यांना कळेना. एव्हाना सर्वांच्या लक्षात एक गोष्ट तर नक्कीच आली की खुर्च्यांचे आकारमान हे दरवाजाच्या चौकटीपेक्षा फारच जास्त आहे, त्यामुळे त्या खुर्च्या काही घरात जाऊ शकत नाहीत. खुर्च्या घरापर्यंत आणण्यासाठी केलेले कष्ट आठवून दिवसाढवळ्या नारूच्या डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले.

खुर्च्या घरात जाईनात म्हटल्यावर सर्वानुमते त्यांना व्हरांड्यात ठेवणं भाग पडलं. नारूने त्या खुर्च्या मुरलीला परत कराव्यात असाही एक सूर निघाला. परंतु खुर्च्या इथपर्यंत आणायला जे काही अति कष्ट पडले ते पुन्हा करायची हिम्मत काही नारू आणि दत्तूकडे बिल्कुल नव्हती. त्यावर असा पर्याय निघाला की, खुर्च्यांना दुसरं गिऱ्हाईक शोधून त्या परस्पर देऊन टाकाव्यात.

आता मंडळी युद्धपातळीवर खुर्च्या विकण्याच्या मोहिमेला लागली. अनेक गिऱ्हाईकं येऊन गेली, पण व्यवहार काही होईना. खुर्च्या व्हरांड्यात विराजमान होऊन जवळजवळ महिना होऊन गेला होता. दिवसा चाळीतील रहिवासी खुर्च्यांची स्तुती करून त्यांचा यथेच्छ वापर करीत असत आणि रात्री चाळीतली कुत्री खुर्चीचा ताबा घेत. थोडक्यात काय तर सध्या त्या सिंहासनांचे श्वानासन झाले आहे. खेडेकर कुटुंब अजूनही त्या खुर्च्यांसाठी स्थळं शोधत आहेत. तर मग मंडळी! काय विचार आहे तुमचा? करायची आहे का तुम्हाला, या खुर्च्यांना तुमच्या घरची शोभा? पण हो, तुमच्या दरवाजाच्या चौकटीचे माप घेऊन जायला विसरू नका बरं कां.



# रान

• विदुला नायगांवकर-कुलकर्णी •

सोनसळी घन-तरूतळी पंख-नव्हाळी नांदते,
आकाशाचे स्वप्न भेटीला पाण्यातून वाहते।
सळसळ निर्मळ कुजबुज कोमळ रानी रुणझुणते,
गूढ चेतना असंख्य जीवांतूनी अखंड मिणमिणते.
तिथल्या कलत्या संध्याकाळी ऊन गव्हाळी सांडते,
तिथल्या झुलत्या कमळ-दळी काळचक्र थांबते.
सहस्र बाहूंनी फांद्या-फांद्यातून सर्जन बोलविते,
नवथर वेलींमधुनी माया आकाशी पोहोचविते.



# When you see something, say something!

• स्वरा भाटे •

नमस्कार. माझं नाव स्वरा भाटे. मी आज तुम्हांला माझ्या हायस्कूलमध्ये घडलेली एक घटना सांगणार आहे. बारावीचं वर्ष अर्ध संपलं आणि मग आमच्या शाळेत Valedictorian निवडण्याचं काम सुरू झालं. Valedictorian म्हणजे विद्यार्थी प्रतिनिधी. हा विद्यार्थी प्रतिनिधी हायस्कूल ग्रॅज्युएशनच्या समारंभात सगळ्यांच्या वतीने भाषण करतो. साधारणपणे शाळेतला 'टॉपर' Valedictorian म्हणून निवडला जातो पण आमच्या शाळेत ह्याची निवड सगळ्या विद्यार्थ्यांतर्फे मतदानाद्वारे केली जाते. ही पद्धत एका बाजूने चांगली आहे पण त्याचबरोबर जे शाळेत सगळ्यात प्रसिद्ध असतात, सगळ्यांना माहीत असतात तेच निवडले जाण्याची शक्यताही असते.

मी कॅनडातल्या शाळेत तीनच वर्ष गेलेली असल्याने माझ्या बाकी विद्यार्थ्यांशी फार ओळखी नव्हत्या. त्यामुळे मी निवडून यायची शक्यता खूपच कमी होती तरी माझं इंग्रजीतलं लिखाण चांगलं असल्याने मी चांगलं भाषण लिहू आणि करू शकेन ह्याची मला खात्री होती. म्हणूनच मला ह्या निवडणूकीत नक्की भाग घ्यायचा होता. माझ्याबरोबर अजून १५ जणांनी निवडणूकीत भाग घेण्यासाठी नाव नोंदवलं होतं. ह्या सगळ्या कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी एका टिचरने घेतली होती. तिने आमच्या सगळ्यांची मिटींग घेऊन नियम तसेच पुढच्या पायर्या समजावून सांगितल्या. आम्हांला आमच्या भाषणाची झलक दाखवणारा प्रत्येकी एक मिनिटाचा व्हिडीयो तयार करायचा होता. ह्या व्हिडीयोत कुठल्याही प्रकारची जाहिरात (campaigning) केलेलं चालणार नव्हतं. म्हणजे ''तुम्ही जर मला मत दिलं, तर मी असं असं करेन...'' असं काहिही बोललेलं चालणार नव्हतं. तसच हा व्हिडीयो फक्त शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अँपवर अपलोड करायचा होता. कुठल्याही सोशल मिडीयावर टाकलेला चालणार नव्हतं. ह्या पैकी कुठलाही नियम मोडला तर तो विद्यार्थी निवडणूकीतून बाद होईल असं सांगितलं होतं. मी तयारी करून माझं भाषण लिहिलं आणि त्यातला महत्त्वाचा भाग घेउन त्याचा व्हिडीयो तयार केला. काही सेंकद जास्त होत होती. त्यामुळे बरीच काटछाट करून, एक एक सेकंद कमी करून बरोबर एक मिनिट लांबीचा व्हिडीयो झाल्यावर तो शाळेच्या ॲलडमिनला पाठवून दिला.

दोन दिवसांनी ॲडमिनने सगळ्यांचे व्हिडीयो शाळेच्या ॲपवर अपलोड केले आणि सगळ्यांनी ते बघून मतदानाला सुरूवात केली. मी सुद्धा बाकीच्यांचे व्हिडीयो बघायला सुरूवात केली आणि मला धक्काच बसला! अकरापैकी पाच जणांनी कुठला ना कुठला नियम मोडला होता. एकीने १ मिनिट १५ सेकंद लांबीचा व्हिडियो केला होता (म्हणजे सांगितलेल्या वेळेपेक्षा २५% जास्त वेळ घेतला होता!). मी एक एक सेकंद कमी करण्यासाठी मारामारी केलेली असल्याने मला अजूनच राग आला. तिने आणि बाकी चार जणांनी जाहिरात करू नका सांगितलेलं असूनही स्वतःला मत द्या असं म्हटलं होतं आणि तरीही त्यांचे व्हिडीयो बाद झाले नव्हते.

मी लगेच ॲडमिनला आणि टिचरला इमेल करून माझी तक्रार नोंदवली. त्या दोघांनीही ''आम्हांला ह्या व्हिडियोत नियम मोडला असं वाटलं नाही'' असं उत्तर पाठवलं आणि तुला अजूनही

तक्रार असेल तर उपमुख्याध्यपकांकडे तक्रार कर असं सुचवलं. मी लगेच दुसऱ्या दिवशी उपमुख्याध्यपिकेला भेटायला तिच्या ऑफिसमध्ये गेले. माझं म्हणणं ऐकून तिनेही मला तेच उत्तर दिलं. नियम आणि ते मोडले गेले असल्याची उदाहरणं मी तिला दाखवल्यावर तिने नियम मोडले गेले आहेत हे मान्य केलं पण आता मतदान सुरू झालेलं असल्याने ते व्हिडियो काढून टाकता येणार नाहीत असं सांगितलं. ह्या प्रकारातून आम्ही धडा घेऊन पुढच्या वर्षी सुधारणा करू असही सांगितलं. पण त्याचा मला काही उपयोग नव्हता कारण पुढच्यावर्षी मी शाळेत असणार नव्हते. तिने मला आणखीन एक कारण सांगितलं की त्या पाच विद्यार्थ्यांपैकी काही जणं त्या टिचरबरोबर बाकी काही उपक्रमांमध्ये/ क्लबमध्ये काम करत आहेत आणि त्यामुळे त्यांचे व्हिडीयो काढणं आता वाईट दिसेल. मला त्यावेळी तिचं म्हणणं लक्षात आलं नाही पण नंतर विचार केल्यावर तर मला अजून मोठा धक्का बसला! कारण हा तर सरळ सरळ पक्षपात होता. तुम्ही त्या टिचरबरोबर इतर कुठल्या उपक्रमात काम केलं तर तुम्ही इथले नियम मोडले तर चालतील असाच अर्थ निघत होता.

Valedictorian म्हणून मी निवडून येण्याची शक्यता खूप कमी असली तरी आता मात्र मी पेटून उठले होते. मी ज्यांनी सगळे नियम पाळले होते अश्या चार जणांची भेट घेतली आणि त्यांना माझं म्हणणं सांगितलं. त्यातले कोणीच माझे मित्र-मैत्रिणी किंवा ओळखीचेही नव्हते. त्यांना माझं म्हणणं पटलं आणि आम्ही सगळे मिळून आमच्या counselor ला भेटायला गेलो. त्याच्या मदतीने आम्ही सगळयांनी पुन्हा त्या टिचरची आणि उपमुख्याध्यापिकेची भेट घेतली. त्या दोघींनी आम्हांला परत तेच ऐकवलं आणि आमची त्या बाकी मुलांशी काहीतरी भांडणं असावीत म्हणून आम्ही त्यांची खोटी तक्रार करत आहोत असा आरोपही केला! आम्ही त्यांच्याशी व्यवस्थित बोलत असताना त्यांनी मात्र दोन वेळा विनाकारण आवाज चढवला आणि शेवटी आम्हांला ऑफिसातून घालवून दिलं. counselor ने आम्हांला आमच्या आई-बाबांना शिक्षकांशी बोलण्याचा सल्ला दिला. मी माझ्या बाबाला सगळी गोष्ट सांगितली आणि त्याने माझं सगळं म्हणणं ऐकून मग आमच्या मुख्याध्यापकांना फोन केला.

मुख्याध्यापकांनी सगळं म्हणणं ऐकून घेतलं आणि झालेली चूकही मान्य केली फक्त आता बराच उशीर झालेला असल्याने ह्या वर्षी काही करता येणं शक्य होणार नाही असं सांगितलं. पण दुसर्या दिवशी मला त्यांना येऊन भेटायला सांगितलं. मी त्यांच्या ऑफिसमध्ये गेले तेव्हा ते वही आणि पेन घेऊन माझी वाट बघत होते. माझं सगळं म्हणणं त्यांनी शांतपणे ऐकून घेतलं. उपमुख्याध्यापिकेच्या ऑफिसात घडलेल्या प्रकाराबद्दल माझी माफी मागितली आणि पुढच्या वर्षी आपल्याला काय सुधारणा करता येतील याबद्दल माझं मत विचारलं. मी सांगितलेले सगळे मुद्दे वहीत लिहून घेतले आणि ह्यात स्वत: लक्ष देण्याचं कबूल केलं. ह्यावर्षीच्या निवडणूकीत काही करता येणं शक्य नसल्याचं सांगितलं पण त्यांनी मला आमच्या शाळेच्या exclusive student forum मध्ये सहभागी होण्यासाठी invitation दिलं. हा फोरम सगळ्या विद्यार्थ्यांसाठी नसतो, त्यामुळे मला छान वाटलं.

पुढच्या वर्षी खरच काही बदलेल का ते माहीत नाही आणि बदललं तरी ते बघायला मी शाळेत नसेन पण "When you see something, say something" हे लक्षात ठेऊन मी बोलले! शाळेतल्या माझ्या सगळ्या मित्र-मैत्रिणींनी त्यांना माझं म्हणणं पटत असूनही ते सोडून देण्याचा सल्ला दिला होता कारण बोलूनही काही उपयोग होणार नाही हे त्यांना माहीत होतं. झालही तसच! पण चुकीच्या गोष्टींमध्ये बदल घडवण्यासाठी मी प्रयत्न केले ह्याचं मला खूप समाधान वाटलं!

# हास्यकट्टा

१) २ चा पाढा एका कागदावर लिहून तो जाळल्यास जी राख तयार होते तिला 'बेचिराख' म्हणतात!
शपथ काय काय सुचायला लागलय बसल्या बसल्या

२) एक भिकारी देवाला म्हणतो
हे देवा मला खाण्यासाठी असं काहीतरी दे जे,
खाल्ल्यावरसुद्धा संपले नाही पाहिजे
देव - हे घे पूर्ण एक चिंगम

३) फक्त मोबाईलाच माहीत असतं,
की,
आपला मालक काय गुणांचा आहे!!!

४) बायको तिच्या मैत्रिणीला - अग काल दिवसभर नेट चालत नव्हते
मैत्रीण - मग काय केले?
बायको - काही नाही ग, नवऱ्याबरोबर गप्पा मारत होते.
चांगला वाटला ग स्वभावाने

# सफरनामा - हैदा ग्वाई - जगाच्या काठावर

• लेखक - अनघा सुरा •
प्रकाशचित्र - निकेत सुरा



कॅनडातल्या किटिमॅट, बी.सी. इथे रहात असताना आम्हांला हैदा ग्वाईबद्दल समजलं. हैदा ग्वाई हे कॅनडामधील अगदी पश्चिमेचं ठिकाण. इकडून बोटीने गेलं की आपण अलास्काच्या बाजूने थेट जपानला जाऊ शकतो. या जागेबद्दल खूप कुतूहल वाटलं म्हणून ठरवलं की इथे आहोत तोपर्यंत जाऊन यावं कारण हे अतिशय दुर्गम ठिकाण आहे. आम्ही राहत होतो तिथून प्रिन्स रूपर्ट ३ तास आणि पुढे बोटीने ७ तास असा प्रवास होता.

हैदा ग्वाई मध्ये ४०० पेक्षा ज़ास्त छोटी छोटी बेटं आहेत. दोन प्रमुख बेटं - ग्राहम बेट उत्तरेला आणि मोरेसबी बेट दक्षिणेला.

आम्ही उत्तरेला तलेल्ल नावाच्या गावात 'सिसिलियास बेड अँड ब्रेकफ़ास्ट'मध्ये राहीलो. सिसिलिया या मालकिणीचं अतिशय सुंदर लॉग हाउस होतं. आत शिरलं की एका बाजुला जेवायचं टेबल आणि स्वयंपाकघर तर दुसऱ्या बाजुला मोकळी जागा होती. या जागेत सिसिलिया योगासनांचे वर्ग घ्यायची. खाली दोन खोल्या होत्या आणि वरच्या मजल्यावर गेलं की तीन खोल्या. वर मध्यभागी एक प्रशस्त जागा आणि त्या जागेत तिने तिचं हस्तकलेचं टेबल आणि सामान-सुमान ठेवलं होतं. काम करायला छान जागा होती. तिथे तिने तिला सापडलेल्या दगड आणि 'ड्रिफ्टवूड'पासून बनवलेल्या छोट्या छोट्या कलाकृती ठेवल्या होत्या.

सिसिलिया ही एक अवलियाँ व्यक्तिमत्त्व. साधारण ६०-६५ वर्षांची असावी, मूळची ऑस्ट्रियाची आणि सेवानिवृत्तीनंतर इकड़े आलेली. तिच्याशी गप्पा मारताना आम्ही पुण्याचे आहोत असं म्हणताच ती म्हणाली मला पुणे माहीत आहे! अय्यंगार योगा शिकवणारी तिची शिक्षिका पुण्याला येऊन गेली होती. सिसिलियाने आम्हांला आसपासच्या परिसराची छान माहिति सांगितली आणि २-३ दिवसांमध्ये काय बघता येईल ते सांगितलं.

आम्ही 'हैदा हेरिटिज सेंटर'ला भेट दिली. अतिशय संदर आणि रम्य ठिकाणी हे सेंटर आहे. हैदा ग़्वाई मध्ये पाय ठेवल्या ठेवल्या मला एखाद्या आध्यात्मिक ठिकाणी आल्यासारखं वाटलं. एकदम शांत आणि निवांत. तिथली स्पंदनं मनात घर करून गेली.

तिथे दुएट्स दूठेल (Dutes Dutheil) या फ्रेंच माणसाने ने १९८० मध्ये सुरू केलेलं 'क्रिस्टल कॅबिन' नावाचं ठिकाण आहे. तिथे पहिल्यांदा आम्हाला धक्काच बसला! वॉशरूमला जाण्याच्या मार्गावर गणपती बाप्पाची मूर्ती! निकेतने लगेच कॉउंटरवर जाऊन सांगितलं की आमच्यासाठी हा देव आहे तर वॉशरूमच्या वाटेवर नका ठेवू. माहीत नाही त्याबद्दल त्यांनी काही केलं की नाही ते. शेवटी आपल्यासाठी तो देव, पण त्यांच्यासाठी ती फक्त एक कलाकृतीच! दुएट्सला भारतीय आणि हिंदू धर्माबद्दल थोडीफार (खरंतर वरच्या अनुभवावरून थोडीच!) माहिती होती.

क्रिस्टल कॅबिनमध्ये सुंदर माणिकं, खडे आणि हैदा कलाकुसर बघायला मिळाली. हैदा लोक 'आर्जेलाइट' या काळ्या खड्यांपासून दागिने तयार करतात. क्रिस्टल कॅबिनच्या बाहेर दुएट्सने एक 'ट्लेल्ल स्टोन सर्कल' ही कलाकृती तयार केली आहे. त्यात हैदा ग्वाईमध्ये सापडलेली, सुमारे ६० लाख वर्ष जुने भुशास्त्रीय नमुने वर्तुळाकारात ठेवले आहेत. मध्यावर एक लंबगोलाकार दगड आम्हाला अगदी शंकराच्या पिंडीसारखा वाटला. माहिती वाचताना समजलं की हे स्वयंभू शिवलिंग दुएट्सला सापडलं आणि त्याला ते शिवलिंगासारखं वाटलं म्हणून त्याने 'शिवलिंग' हेचं नाव दिलं. भारतीय संस्कृती आणि हैदा ग्वाईच काहीतरी ऋणानुबंध नक्कीच असावेत असं वाटून गेलं.

हैदा ग्वाईला खूप छान छान हाईकिंग रूट्स आहेत. आम्ही 'टोव हिल' / 'ब्लो होल' आणि 'गोल्डन स्प्रूस ट्रेल' हे दोन मार्ग निवडले.

ट्लेल्लला जाताना आणखी एक छान जागा आहे – बॅलन्स रॉक. एक मोटरगाडीच्या वज़नाचा दगड स्वतःला संभाळत उभा आहे. हा दगड अनेक शतकांपूर्वीच्या हिमस्खलनाच्या वेळस इकडे राहीला असावा असं म्हणतात. 'नॉर्थ बीच' या एक अफ़लातून समुद्रकिनाऱ्यावर आम्ही गेलो. इथे अगदी सिनेमात दाखवतात तशी समुद्र किनाऱ्यावरून भरधाव गाडी तुम्हीं चालवू शकता. एकदम अविस्मरणीय अनुभव होता हा!

आम्हाला हैदा ग्वाई इतकं आवडल की ३ दिवस फारच कमी वाटत असताना देवाच्या आणि 'बीसी फेरीज'च्या कृपेने आम्हला १.५ दिवस जास्त रहायला मिळालं. सिसिलियाने सुद्धा आमची रहायची सोय अधिक पैसे न घेता केली. तिचं म्हणणं की तुम्ही आमचे पाहुणे आहात आणि आम्हाला पाहुणचार करायला आवडतं. आजच्या काळात आणि कॅनडासारख्या परदेशातसुद्धा अशी माणसाला धरून राहणारी माणसं बघून परत भारताची आठवण आली.

मिळालेल्या वेळात आम्ही 'पोर्ट कलेमेंट्स' ला 'रेन्बो वॉर्फ' या बंदरावर तर पश्चिम बाजूला रेन्ने या ठिकाणी 'साउंड रेक्रीएशन साइट'ला गेलो. इथे निर्मनुष्य समुद्र किनारा आणि आम्ही अहाहा! समुद्र किनारा खूप खडकाळ होता, पण मुलांनी आणि मी खडकांमधून भरपूर भटकंती केली.

परत येताना मात्र पाय निघत नव्हते. सारखं वाटत राहिलं की अजून काही दिवस पाहिजे होते. कधी तुम्हाला वाटलं एखाद्या वेगळ्या वाटेवर भटकंती करावी तर हैदा ग्वाईचा नक्की विचार करा. तिकडे गेल्यावर काय माहीत काहीतरी सापडून जाईल. तिथे एवढं निवांत आणि शांत आहे की तुम्हांला अंतर्मुख होता येईल. आमची हैदा ग्वाईची हटके सफर पूर्ण झाली, पण मनाचं समाधान मात्र झालं नाही. मनाशी 'फिर मिलेंगे हैदा ग्वाई' अशी खूणगाठ बांधून मी परतीच्या वाटेवर निघाले.

## शोधा बरं – उत्तरे

१ सायप्रस रावेन
२ आवर्तन
३ वसंत साकळीकर
४ प्रतिमा पराडकर
५ गुळपोळी
६ आनंद इंगळे
७ गीतधारा
८ संपर्क
९ स्वरसंध्या
१० महेश काळे
११ किलबिल
१२ मनोज डबीर
१३ सागर वाकणकर
१४ प्रेमाच्या गावा जावे
१५ मेपलची वारी

# झुणका

• केतकी पाटील पारखी •



'कुत्री आवडणं वेगळं आणि त्यांना सांभाळणं वेगळं. I'm done.' समीरला बघताच असा खेदजनक सूर मानसीने लावला. ऑफिसमधून आलेल्या समीरचा डबा घेऊन, 'चहा टाकते' असं म्हणत मानसी किचनमधे गेली. समीर न बोलताच फ्रेश होऊन पॅटीओमध्ये निवांत बसला. दोघंही रोज समीर ऑफिसामधून आल्यानंतर चहाचा झुर्का घेत, लेकमध्ये न्हाहून निघालेला सूर्य एकटक बघत बसायचे. पाण्याची असीम निळाई आणि दाह शमलेल्या सूर्याचे सोनसळी प्रतिबिंब डोळ्यांत सामावून घ्यायचे. दिवसभराचा शीण याच पॅटीओमध्ये मावळायचा, अनेक ट्रिप्सचे बेत इथेच आखले जायचे आणि अगण्य 'बिझनेस आयडिया' इथूनच मूळ धरायचा.

परदेशात स्थायिक होण्यासाठी मानसीची एकच अट होती. तिला स्वतःचा बिझिनेस सुरू करायची मुभा असावी. पुण्या-मुंबईत १०-१२ वर्ष दोघांची नोकरी झाली आणि आता थोडा चेंज हवा म्हणून परदेशगमन ठरले. तेंव्हापासून वेगवेगळ्या आयडिया डोक्यामध्ये आहेत. नवीन घर लावण्यात २-३ महिने गेले. जरा स्थिरस्थावर होताच, मानसीची 'मायकेल्स' या कलाकुसरीच्या दुकानाशी झाली. कुठलीही कला असो, त्याचं सगळं साहित्य आणि त्यावर आधारित बिझनेस ट्रेनिंग या दुकानात दिलं जातं. मानसीनी तिची क्रोशाची आवड गृहीत धरून त्याचा कोर्स केला आणि छोटी छोटी, कलाकुसरीची कानातली तयार केली. आसपास, मार्केटमध्ये विकली सुद्धा. पण जमा खर्चाचं गणित काही बसेना. वेळ आणि पैसा ज्या हिशोबानी बिझनेसमध्ये घालावा लागत त्यामानाने उत्पन्न खूपच कमी. मग काय वेळेत दुकान बंद करणे हेच उत्तम.

नंतर २-३ चेन मार्केटिंगच्या कंपनींची तोंडओळख झाली. पण हे म्हणजे याची टोपी त्याला असं दिसतंय हे कळताच मानसीनी काढता पाय घेतला. थोडे दिवस चीनमधून माल इम्पोर्ट करून तो फेसबुकवर पण विकला. पण उठता -बसता, रात्री अपरात्री हजारो मेसेजेस. कधी लोकं सामान घ्यायला यायचेच नाहीत, तर कधी पैसेच द्यायचे नाहीत. कधी कधी तर अनोळखी लोकांची भीती पण वाटायची. त्यामुळे दूरचा विचार करता, हा बिझनेस टिकणार नाही हे मानसीला लवकरच कळलं.

मग थोडे दिवसांनी गणपतीसाठी म्हणून मानसीने तिची ठेवणीतली पैठणी नेसली आणि आयडिया आली. पैठणीचा बिझनेस. मग काय मार्केट रिसर्च सुरू. पैठणमध्ये अनेक दुकानात, हातमाग केंद्रात फोन लावले. सगळ्या खर्चाचा अंदाज काढला, १० साड्यांची ऑर्डर दिली आणि महिन्याभरात साड्या परदेशात दाखल झाल्या. सगळीकडे जाहिराती दिल्या, ओळखीच्या बायका भेटून बघून गेल्या पण विक्री शून्य. सगळ्याजणी देशात फोन करून, परदेशातली

मानसीची साडी स्वस्त की महाग याची पडताळणी करण्यातच दंग होत्या. ज्यांना आता भारतात जाणं होत नाही आणि त्यांची पैठणी अगदीच विरायला आली आहे, अशा एक दोघींनी पैठणी घेतली. या सगळ्यात २ महिने गेले. पैसे धंद्यात घातल्यापासून विक्री होईपर्यंतचा प्रवास खूपच लांब होता. एवढंच की नाशवंत पदार्थ नसल्यामुळे, दरवर्षी एखाद दोन साड्या विकल्या तरी तसं नुकसान नाही. पण हे पुन्हा होणे नाही.

पुढे दिवाळीसाठी पुण्यातून लाडू-चकलीचं, चिवडा, भडंग, शंकरपाळ्या, चिरोटे, अनारसे असं पार्सल आलं आणि लगेच नवीन आयडिया आली. पुण्यात फोनाफोनी करून मानसीनी जवळ जवळ ५०-६० किलो ऑर्डर दिली. परदेशातून आलेली ऑर्डर म्हणून पुण्यातल्या त्या छोटेखानी घरगुती बिझनेसला चांगलीच उभारी आली. एकीकडे ऑर्डर घरी पोचेपर्यंत मानसीने तिच्या ग्राहकांची यादी केली, फोन केले, जवळच्या मराठी मंडळात दिवाळीच्या कार्यक्रमात तिचा फूड स्टॉलही बुक केला. सगळं अगदी झटपट जुळून आलं. मानसी आतुरतेने ऑर्डरची वाट बघत होती. एकदा तर पोस्ट ऑफिसमध्ये पण जाऊन आली. पण दिवाळी कार्यक्रमच दिवस आला तरी ऑर्डर घरी पोचली नाही. पुण्यातून आईचा फोन आला की 'पार्सल अजून मुंबईतच आहे. इम्पोर्ट एक्स्पोर्टचं काहीतरी आहे. अमेरिकेला पोचायला वेळ लागत आहे.' मानसी एकदम कोलमडलीच. एवढ्या लोकांच्या ऑर्डर्स घेतल्या आहेत, स्टॉल बुक झाला आहे, ऑर्डरचे पैसे भरले आहेत आणि हे असं. सगळ्याप्रकारच्या फिया भरल्यावर साधारण ४-५ आठवडयांनी शेवटी ती ऑर्डर मानसिकडे पोचली. जेमतेम १०-१२ किलो. प्रवासात फुटलेल्या पिशव्या, सांडलेला चिवडा, भुगा झालेले चिरोटे, तुटक्या चकल्या... ते बघताच ही आयडिया पण बारगळली.

काही दिवसांपूर्वी मानसीच्या शेजारणीने बोलता बोलता 'डॉग सिटिंग' च्या बिझनेसबद्दल सांगितलं. मानसीची शेजारीण 'जेन' साधारण तिशीतली वर्किंग वुमन. रोजचं ऑफिस झालं की ६ कुत्र्यांना २ तास फिरवून आणायची. एक जोडधंदाच म्हणा ना. मानसीला प्राण्यांविषयी खूप प्रेम आणि आदर. पण पुण्यातल्या फ्लॅटमध्ये हे प्राणी पाळणं दूरापास्तच. त्यामुळे तिने जेनला लगेच होकार सांगितला आणि तिला थोडं ट्रेनिंग द्यायला सांगितलं. पुढचे दहा दिवस मानसी आणि जेन रोज त्या सहा कुत्र्यांना फिरायला घेऊन जायच्या. आता मानसीला चांगलाच आत्मविश्वास आला आणि आज सकाळी २ तास केवळ एका कुत्र्याला सांभाळण्याची जबाबदारी तिनी स्वतंत्रपणे घेतली. पहिले ५-१० मिनिटं कुत्रं आणि मानसी एकमेकांना न्याहाळतच होते. मग त्या कुत्र्याच्या आईने भाजी आणायची म्हणून मार्केट गाठलं. तिचा जसा पाय घराबाहेर पडला, तसं ते कुत्रं बिथरलं आणि पुढेच २ तास मानसीची तारेवरची कसरत झाली.


मानसी चहा घेऊन पॅटीओमध्ये आली आणि सगळी श्वानकथा समीरला सांगितली. समीर तसा स्वभावानी शांतच. आपण बरं आपलं काम बरं. नेटानी काम करून बढती मिळवायचा. मानसीला प्रत्येक कामात हातभार लावायचा आणि तिच्या प्रत्येक नवीन उपक्रमाला पाठिंबा द्यायचा. अजून चांगली आयडिया येईल गं. जे होतं ते चांगल्यासाठी. १४ इंजेक्शन तरी नाही ना घ्यावी लागणार.. 'असं म्हणत त्यांनी वातावरण हलकं फुलकं केलं. 'चहा कडक झालाय. बेस्टच. आणि मला खूप भूक लागली आहे. आजही थोडाच डबा मिळाला मला. सगळ्या ऑफिसनी झुणका फस्त केला. सकाळचा शिल्लक आहे का?' असं विचारेपर्यंत मानसी किचनमध्ये जाऊन ताजी भाकरी आणि झुणका करत होती, जोडीला फोडलेला कांदा आणि हिरव्या मिरचीचा ठेचा. जेवणं आटोपून दोघं झोपायला गेले. मानसी थोडी अस्वस्थच होती. अचानक 'झुणका, झुणका, झुणका' असा पुटपुटायला लागली. अचानक समीरला पण साक्षात्कारच झाला. काखेत कळसा आणि गावाला वळसा असं झालं. अगं खरंय 'झुणकाच' असं तो ओरडला. दोघांनी एकमेकांना कडकडून मिठी मारली आणि पॅटीओमधल्या लुकलुकणाऱ्या दिव्यांखाली बसून रात्री ११.३० वाजता नवीन बिझनेसची सुरुवात झाली.

काही महिने घरातून सुरू झालेलं 'झुणका' रेस्टॉरंट, पुढे क्लाउड किचन आणि आता स्वतंत्र टुमदार जागेत नावारूपाला आलं आहे. अगदी २०-२५ लोकांच्या साक्षीनं सुरू झालेला हा बिझनेस, मानसीच्या सचोटीने आणि समीरच्या पाठिंब्याने संपूर्ण अमेरिकेच्या कान्याकोपऱ्यात पसरत आहे. हे केवळ रेस्टॉरंटचे यश नव्हे तर 'इन्स्टंट झुणका' या युनिक आयडियाचे यश आहे. मानसीच्या झुणक्याची चव घरोघरी पोचावी म्हणून अगदी इडली डोसा इन्स्टंट पाहात मिळतं तसं हे इन्स्टंट झुणका पाकीट. पाणी घाला, वाफवा आणि तूप सोडून गट्टम. पाकिटात सोबत ठेचा आहेच. आत्तापर्यंतचे सगळे अनुभव, वाटेतले काटे सगळं गाठीशी बांधत मानसीची उत्तरोत्तर प्रगतीच होईल यात शंकाच नाही. तुमच्याकडे आहे का अशीच युनिक आयडिया?

# MSBC ची दिवाळी

• सुजाता परळकर •

MSBC ची दिवाळी,
MSBC ची दिवाळी,
बघता बघता आली
MSBC ची दिवाळी.




वर्षानुवर्ष येत रहाते,
पण तिची ओढ काही सुटत नाही.
बोर्ड कामाला लागते मिटींगा होतात,
सभासद मंडळींना मिळते इमेल,
घरोघरी चर्चा रंगतात.
लहान थोर सगळ्यांमधेच
भरतो उत्साह
नृत्य नाटक गायनाला येतो भर,
प्रॅक्टीसला आलेल्या
मित्रमैत्रिणींनी भरते घर,
रांगोळ्या आकाशकंदिल किल्ले आणि
फराळ स्पर्धांचा होतो संगम सुंदर.

बघता बघता येतो कार्यक्रमाचा दिवस,
सजवला जातो हॉल.
बघावे तिकडे दिसतात
भरपूर फुले आणि आरास,
जोडीला भरजरी
पैठण्या खास.
खाद्यपदार्थांची होते रेलचेल

सरतेशेवटी दिवाळी साजरी
होते परफेक्ट.
सगळेजण घरी जातात
होऊन तृप्त.
अशी ही MSBC ची दिवाळी,
वर्षानुवर्ष येतच राहो.
सभासद मंडळींच्या मनाला
उभारी देतच राहो.



# बापजन्म

• प्रणव साकुळकर •

**एक**

रोज रात्री झोपताना गोष्टी ऐकायची सुश्रुतला सवय झालीय. किंबहुना आम्हीच ती लावलीय. रोज रोज नवनवीन गोष्टी कुठून आणायच्या हाही एक प्रश्नच असतो. यातून आमच्या कल्पनाशक्तीचा कसच लागतो. वर त्या बोधप्रद असाव्यात, त्यांचं काही तात्पर्य असावं असा आमचाच आग्रह. असंच एकदा कुठली गोष्ट सांगता येईल याचा विचार करीत असताना अश्वत्थामा आठवला.

अश्वत्थामा लहान असताना एकदा त्याला भूक लागली होती आणि त्यानं दूध प्यायचा हट्ट धरला होता. घरी दूध नव्हतं. ''बाबा, ते वॉलमार्टला जाऊन का आणत नाही?'', सुश्रुतचा निरागस प्रश्न. काहीही हवं असल्यास वॉलमार्टमधून ते आणता येतं हा त्याचा आजवरचा समज; पण वॉलमार्टमधून वस्तू विकत घ्याव्या लागतात, त्यासाठी पैसे मोजावे लागतात आणि तेच बऱ्याच लोकांकडे नसतात, हाच खरं तर ही गोष्ट सांगण्यामागचा उद्देश. गोष्टीत अश्वत्थाम्याची आई दूध म्हणून कणिक पाण्यात मिसळून त्याला पाजते. दूध पिल्याचं समाधान होऊन शेवटी अश्वत्थामा शांत झोपी जातो. गोष्ट संपली. सुश्रुत रडायला लागला. अगदी हमसून हमसून. मी सुश्रुतला घट्ट मिठी मारली, पाठीवरून हात फिरवला. पण सुश्रुतच्या रडण्याचं नेमकं कारण काय बरं असावं? ते रडणं अश्वत्थाम्याला खरं दूध मिळालं नाही याबद्दल तर नव्हतं ना? अश्वत्थाम्याच्या आईची अगतिकता त्याला कळली असेल? गरिबांना स्वतःच्या अगदी लहानसहान इच्छा मारून कसं जगावं लागतं हे त्याला समजलं असेल? सुश्रुतला त्याचं रडण्याचं कारण विचारलं. ''कारण ते गरीब होते'', सुश्रुत हुंदके देत म्हणाला. मी मिठी आणखी घट्ट केली, त्याचे भरपूर पापे घेतले. आपल्याला जे समजावून सांगायचं होतं, ते सुश्रुतला समजलं याच्या समाधानाचं स्मित माझ्या चेहऱ्यावर आलं.

कसलीही दैन्यावस्था आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये अशी सर्व आई-वडिलांची इच्छा असते, अपेक्षा असते. पण गरिबी प्रत्यक्ष अनुभवली नसली तरी मुलांना गरिबांप्रती करुणा असावी, त्यांच्या संघर्षांची जाण असावी, पैशांचं मूल्य कळावं अशी सुजाण पालकांची आशा असते. आई-बाबांनी माझ्या बाबतीत असे भरपूर प्रयत्न केलेत. बाजारातून मुद्दाम समोर गर्दी नसणाऱ्या गरीब शेतकऱ्याकडून भाजी घ्यायची, भाव करायचा नाही, हे लहानपणापासून बघितलं होतं. बाबा तर हमखास लहान दुकानातून कुठलीही खरेदी करायचे. कपडे लहान-मोठे करायला, गुंड्या लावायला बाबांचा एक ठरलेला शिंपी होता. एका बोळात अतिशय लहान असं त्याचं दुकान होतं. तिकडे जाताना तो शिंपी किती गरीब आहे हे वारंवार सांगायचे. प्रत्यक्षपणे आणि स्वतःच्या वागण्यातून अप्रत्यक्षपणे त्यांनी हे माझ्या मनावर बिंबवण्याचा सतत प्रयत्न केला.

आता मोठं झाल्यावर मी स्वतः देखील अशीच दुकानं निवडतो हे नुकतंच मला जाणवलंय. बाबांना अपेक्षित असणारी जाणीव माझ्यात निर्माण झाली असावी. हीच जाणीव आता पुढे सुश्रुतमध्ये निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याची पहिली पायरी यशस्वी झाली या आनंदात सुश्रुतला कुशीत घेऊन, बिलगून झोपी गेलो.

**दोन**

सुश्रुतला रोज रोज सांगून आता गोष्टींचा ऐवज संपायला आला आहे. 'एकीचे बळ', 'जशास तसे', 'दोघांचे भांडण,

तिसऱ्याचा लाभ' अश्या नेहेमीच्या सगळ्या गोष्टी सांगून झाल्या आहेत. आता कधी कधी याच अर्थाच्या नवीन गोष्टी रचाव्या लागतात. परवा 'गर्वाचे घर खाली' या तात्पर्याची अशीच एक नवीन गोष्ट तयार केली.

मोराला 'पक्ष्यांचा राजा' म्हणायला लागल्यापासून मोराच्या डोक्यात हवा गेली. तो स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजायला लागला. ''माझा डौलदार पिसारा बघा, त्यावरचे सुरेख रंग बघा'', असं तो सतत इतर पक्ष्यांना सांगायला लागला आणि त्यांना त्यांच्या रंगावरून चिडवायला लागला. असाच एकदा तो पक्ष्यांच्या घोळक्यात वल्गना करत होता. जवळून एक वाघ जात होता. मोराचा आवाज ऐकून तो दबक्या पावलांनी चालत आला आणि संधी साधून त्यानं पक्ष्यांवर झेप घेतली. वाघाची चाहूल लागताच पक्षी घाबरून उडायला लागले. कावळा उडाला, चिमणी उडाली, पोपट उडाला. पण... ''बाबा!'', सुश्रुतनं मला थांबवलं, ''मोर उडाला पाहिजे, नाहीतर मला वाईट वाटेल.'' सुश्रुतच्या चेहेऱ्यावरचे भाव बदलले होते. मोर उडणार की नाही ही शंका त्याच्या चिंतातुर चेहेऱ्यावर दिसत होती. मला काही बोलायलाच सुचेना. मी सुश्रुतला कवटाळलं. किती विचार करतात मुलं! गोष्टीत पुढे काय होणार, ते आपल्याला आवडणार की नाही. बाप रे! गोष्टीचा शेवट बदलणं मग मला भागच होतं. गोष्टीत मी मोर उडवला. सुश्रुतचा चेहेरा खुलला. मोराचा जीव वाचला हे ऐकून तो हसायला लागला. या आनंदातच मग तो माझ्या कुशीत शांत झोपी गेला.

या प्रसंगानं माझी शांतता मात्र हिरावली गेली, मला अंतर्मुख केलं. मुलं किती हळवी, संवेदनशील असतात याचा पुनःप्रत्यय आला. जगाच्या रहाटगाडग्यात निरागसता गमावून बसलेली मोठी माणसं लहानांना काय शिकवणार? तो अधिकार तरी त्यांना आहे?

*सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः,*
*सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्।*


यात 'सर्व' कोण? केवळ मनुष्य? की सर्व सजीव? लहानपणी आईनं शिकवलेल्या श्लोकाचा खरा अर्थ मुलाकडून शिकायला मिळाला.

गर्विष्ठ असला तरी काय झालं? तोही एक प्राणी आहे आणि त्याचंही वाईट होता कामा नये. किती गहन विचार हा! पसायदानात संत ज्ञानेश्वरांनी सांगितलं आहे : 'जे खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मीं रती वाढो।' यात दुष्टत्व नष्ट व्हावे हीच अपेक्षा आहे, व्यक्ती नाही. बायबलमध्येही लिहिलंच आहे: "Hate the sin, not the sinner'. गर्विष्ठपणाचा तिरस्कार करतानाही त्या व्यक्तीचा द्वेष करून चालणार नाही. गांधीजींनीही हा विचार समजायला कसा सोपा, पण आचरणात आणायला किती कठीण आहे हे आपल्या आत्मचरित्रात नमूद केलंय.

मुलाला 'गर्वाचे घर खाली' ही म्हण शिकवायला म्हणून सांगितलेली गोष्ट बदलायला लावून शेवटी मुलानेच मला खूप काही शिकवलं होतं. आपल्याला खूप काही कळतं असं समजणाऱ्या बापाचंच जणू मुलानं गर्वहरण केलं होतं.

# मंडळाविषयी बोलू काही - स्वरसंध्या

एमएसबीसी परिवारातल्या गायक-गायिकांना मंच मिळावा ह्यासाठी गाण्यांचा कार्यक्रम करावा अशी कल्पना २०१९च्या कार्यकारिणीच्या बैठकीत पुढे आली. ही कल्पना सगळ्यांनीच उचलून धरली. श्री. सुरेंद्र फडके ह्यांच्या पुढाकाराने आणि श्री. मोहन भिडे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र दिनानिमित्त मराठी गाण्यांचा कार्यक्रम करण्याचं ठरलं. गायकांनी गाण्यांची निवड करून झाल्यावर सगळ्यांनी सरावाला सुरूवात कली. ह्या कार्यक्रमाला 'स्वरसंध्या' असं नाव देण्याचं ठरलं. उत्कृष्ट गायन, वादन आणि निवेदनासह हा कार्यक्रम BACI हॉलमध्ये पार पडला आणि सगळ्यांना तो खूप आवडला. सगळ्यांच्या उत्तम प्रतिसादामुळे पुढे हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जाऊ लागला. कोव्हिड लॉकडाऊनच्या काळात 'स्वरसंध्या' कार्यक्रम ऑनलाईन स्वरूपात सादर होऊ लागला आणि ह्या कार्यक्रमाला संकल्पनाधारीत गाण्यांच्या कार्यक्रमाचं स्वरूप मिळालं. गायनाची कला केवळ मराठी गाण्यांपुरती मर्यादीत न ठेवता हिंदी गाण्यांचाही ह्यात समावेश केला जाऊ लागला. आत्तापर्यंत 'स्वरसंध्या'च्या मंचावर लता मंगेशकर, महंमद रफी, मन्ना डे, ए.आर. रेहमान, यश चोप्रा, मदन मोहन अश्या कलाकारांची गाणी सादर केली गेली आहेत. तसेच एका सत्रात 'मराठी भावगीत' अशीही संकल्पना ठेवली होती. कुठल्याही निवडीशिवाय सहभागी होता येत असलेला हा खुला मंच अनेक सभासदांसाठी एमएसबीसीत सहभागी होण्याची सुरूवात ठरला आहे आणि त्यामुळेही 'स्वरसंध्या' कार्यक्रम महत्त्वाचा आहे!




# लग्न सोहळा

• जयदीप खाडिलकर •

खरंतर या लेखाला मी 'एका भटजीचे मनोगत' किंवा 'एका लग्नाच्या कॉंट्रॅक्टरचे आत्मचरित्र' वगैरे नाव देण्याचा विचार करत होतो. पण म्हटलं नको. कारण त्यांच्यासारखा हजारो लग्नांचा माझ्याकडे अनुभव नाही. जवळ आहेत ४०-५० लग्नांच्या आठवणी आणि गमती जमती. पण ४०-५० हा आकडाही फार मोठा आहे. आपले डोळे आणि कान पूर्णपणे उघडे ठेवून एकच लग्नसोहळा पाहिलेली व्यक्तीदेखील या विषयावर बिनधास्तपणे लिहू शकते. कारण सगळी लग्नं ही एकाच साच्यातून काढलेल्या चकल्यांसारखी असतात. आपण १० चकल्या खाऊनही ११ वी चकली बशीत पडल्यावर जो आनंद होतो, तोच आनंद दारात लग्नाची पत्रिका पडल्यावर होतो.

'लग्नाची पत्रिका' याकडे साहित्यातील एक विजोड घटक म्हणूनही पाहता येईल. पुढे मागे शालेय परीक्षांमध्ये पत्र लेखनाप्रमाणे 'पत्रिका लेखन' हा प्रश्नसुद्धा येण्याची शक्यता आहे.

पत्रिका लिहिताना सर्वात वर कुलदैवतंचं नाव लिहावं, की ज्या देवाला आपण मानतो त्याचं नाव लिहावं, यावरून घरात वाद होतो. हा वाद होतो त्याला खास महत्त्व आहे. कारण लग्न सोहळ्याच्या तयारीत होणारा हा सर्वात पहिला वाद. त्यानंतर असंख्य वाद लग्नसोहळ्यात ठाई ठाई उभेच असतात. यावरून लग्न सोहळ्याला 'विवाह सोहळा' म्हणण्याऐवजी 'विवाद सोहळा' का म्हणत नाहीत, असाच प्रश्न पडतो. देवतेच्या नावाचा प्रश्न सुटला की पुढे ''आपणास कळविण्यास आनंद होतो आहे'' पासून ते ''सहकुटुंब हजर रहावे'' पर्यंतचा मजकूर सर्व पत्रिकांमध्ये सारखाच असतो. पण त्यातही पत्रिका मुलाकडची असेल तर मुलीच्या आई वडिलांचे नाव आणि पत्रिका मुलीकडची असेल तर मुलाच्या आई वडिलांचे नाव छापखान्यात उपलब्ध असलेल्या सर्वात लहान अक्षरांत छापून घेण्याची प्रथा आहे. या मजकूरानंतर येतो तो सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे घरातल्यांची नावं. एखाद वेळेस वराचं किंवा वधूचं नाव वगळलं तरी चालेल, पण ही यादी अगदी डोळ्यात तेल घालून तपासावी लागते. यातून एकही नाव वगळणं, वराच्या किंवा वधूच्या वडिलांना लग्नाच्या खर्चाहूनही महागात पडणार असतं. कधी कधी तर ही यादी एवढी मोठी असते की ही सर्व नावे लग्नाला बोलवणाऱ्यांची नसून लग्नाला बोलवलेल्यांची आहेत की काय असाच प्रश्न पडतो.

लग्नाचा दिवस उजाडतो. लग्नाला ज्यांच्याकडे जायचे आहे ते आपल्या कितीही दूरच्या नात्यातले असोत, तरी आपल्यात एक प्रकारचा उत्साह हा असतोच. याच उत्साहाच्या भरात १० पैकी पाच जण कार्यालयाचा पत्ता घ्यायलाच विसरतात. मग पत्रिका घ्यायला परत घरी जावं लागतं. जवळ कार्यालयाचा पत्ता असूनही आपण इच्छित स्थळी वेळेवर पोहचू, याची काहीएक खात्री नसते. आपल्या कार्यालयापर्यंत आरामात न पोहचू देणं हे एकच ध्येय मनाशी बाळगून समस्त रिक्षावाले रिक्षात स्वार झालेले असतात. प्रवासी हा संपूर्ण शहर फिरायच्या दृष्टीनेच बाहेर पडला आहे, असा समज करून घेऊन ते आपल्याला प्रत्येक गल्ली फिरवत

फिरवत एका ठिकाणी आणून सोडतात. त्या ठिकाणी आठही दिशांना पाहूनही आपल्याला कार्यालयसदृश काहीही दिसत नाही. मग रिक्षावाला सांगतो काय आहे साहेब, पुढे नो एंट्री आहे. तुम्ही सरळ जाऊन उजव्या साइडला टर्न मारा, की लगेच उजव्या हाताला आहे की कार्यालय!. प्रत्येक रिक्षावाला हा सत्यवचनी असतो आणि त्यानी सांगितलेला प्रत्येक पत्ता हा बिनचूक असतो असं समजून आपण चालायला लागतो. मग १०-१५ मिनिटं चालतच राहतो. शेवटी एकदाचा 'शुभ मंगल कार्यालय' असा बोर्ड दिसतो आणि रिक्षावाल्याच्या सर्व पिढ्यांचा जप करून थकलेल्या तोंडाचं पाणी पळता पळता वाचतं. इथपर्यंत येईस्तोवर सकाळी आरशात सारखं बघून नीट लावलेली पावडर घामात विरघळून वाहून गेलेली असते. एवढ्यात समोर लग्नासाठी नटूनथटून आलेली मंडळी रिक्षातून उतरताना दिसतात आणि मग नो एंट्री आहे साहेब! म्हणून आपल्यासारख्या सिध्या-साध्या (अर्थात 'बावळट') माणसाला फसवणाऱ्या दुष्ट रिक्षेवल्याचा चेहरा पुन्हा एकदा डोळ्यांसमोरून जातो.

पण कार्यालयाच्या आत पाऊल टाकताच बाहेरचा सर्व थकवा आणि ताप एका क्षणात उडून जातो. सनईच्या सुरांशीवाय कार्यालयाची कल्पना करणे अशक्य. आपले कान एकीकडे या सुरांचा आस्वाद घेत असतात आणि डोळे आपले नातेवाईक, ओळखीच्या व्यक्ती शोधत असतात. एवढ्यात आपल्या लक्षात येतं की, स्टेजवर कुणी एक मुलगा बळी देतात त्या बकऱ्याप्रमाणे तोंड करून बसलेला आहे, आणि बाजूला कसाईरूपी न्हावी एका हातात वस्तरा घेऊन दुसऱ्या हाताने त्या वस्तऱ्याएवढ्याच धारदार मिशा पिळत आहे. आपल्याला आपली चूक लक्षात येते आणि आपण उगाचच 'गुपचूप' बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो. बाहेर येऊन इच्छित लग्न दुसऱ्या मजल्यावर आहे असं कळतं. मग योग्य लग्नमंडपात पाऊल टाकल्यावर आणि नातेवाईकांची भेट झाल्यावर, का कोण जाणे आपल्याला खूप हायसं वाटतं.

मग खुर्च्यांवर जरा स्थिरस्थावर झाल्यावर खाण्यासाठी ताटली आपल्या समोर येते. या ताटलीत आजवर पोहे, उपमा किंवा खिचडी या व्यतिरिक्त कुठलाही पदार्थ मी पाहिलेला नाही. मुलगी दाखवण्याच्या कार्यक्रमातही हेच तीन पदार्थ असतात. त्यामुळे बहुदा हे पदार्थ मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम आणि तिचं लग्न यातील दुवा म्हणून वापरत असावे. खाऊन झाल्यावर ''चहा घ्याल की कॉफी'' असं विचारलं जातं. पण आपण 'चहा' असं सांगायचं असतं. कारण कॉफी ही निव्वळ संपण्यासाठीच बनवलेली असते. तुम्ही मंडपात १२:०० वाजता पोहचा किंवा ८:०० वाजता, नेहमी ''कॉफी ना, आत्ताच संपली!'' हेच उत्तर ऐकू येईल. पण त्यामुळेही काही फरक पडत नाही. कारण 'कॉफी पिणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच' अशी प्रतिज्ञा वगैरे करून काही आपण लग्नाला गेलेला नसतो. आपल्याला हवी असते ती फक्त एका दिवसाची भरपेट मजा. या भरपेट मजेसाठी प्रमुख साहित्य म्हणजे एक सुस्थितीत असलेली खुर्ची आणि सर्व मंडपावर लक्ष ठेवता येईल अशी मोक्याची जागा. चवीखातर बाजूला ४/५ नातलग असतील तर फारच उत्तम. अशा प्रकारे आपण लग्नाच्या रसग्रहणासाठी ठाण मांडून बसतो आणि ताटावर बसल्या बसल्याच कोणी तरी आपल्याला, मुलीच्या माहेरून आलेलं रुखवत बघण्यासाठी उठवतं. चांगली जागा जात असल्याची आतली चिडचिड, बाहेर 'रुखवत पाहण्यास आपण किती उत्सुक आहोत' या भावनेतून दर्शवावी लागते. बायकांना मात्र असा उत्साहाचा आव आणावा लागत नाही. त्या अगदी मनापासून आहेराच्या टेबलाकडे धाव घेतात. इथल्याही काही वस्तू या फक्त लग्नाच्या रुखवतातच आपल्याला पाहायला मिळतात. त्यापैकी पाच पैशांचं जहाज, धान्याने भरलेली बैलगाडी, सुपारीचे भटजी आणि लोकरीचे रुमाल हे पाहून पाहून वीट येतो. ''वा! बैलगाडीची कल्पना फारच सुरेख आहे'' असं काहीतरी म्हणून त्या टेबलापासून सुटका करून घ्यावी लागते. विशेषतः बैलगाडीत विविध धान्याची पोती लादल्यानंतर स्वस्थ न बसता प्रत्येक पोत्यावर गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, नाचणी अशा चिठ्ठ्या चिकटवण्याची कल्पना ज्या स्त्रीच्या डोक्यातून उपजली, तिला माझा शतशः प्रणाम. रुखवताच्या टेबलापासून सुटका झाल्यावर मात्र मजाच मजा असते. तेव्हा एकदा खुर्चीत बसलं की एकदम अक्षता टाकण्याच्या वेळी उठावं लागतं. मधला सगळा वेळ भटजी 'खातात'. ते नुसता वेळच खात नाहीत. समोर, लग्नाच्या या सर्व कार्याला पाहून बावरलेली वधू बसलेली असते, आणि काहीतरी कारण काढून सारखं सारखं वधूकडे पाहणारा 'वर' बसलेला असतो. त्यामुळे भटजी अगदी सहजरीत्या मंत्रही खाऊन जातात. त्यातून जे मंत्र उरतात तेही त्यांच्या तोंडावाटे बाहेर न येता नाकातून बाहेर पडत असतात. त्यामुळे नाकातल्या नाकात म्हटलेल्या या मंत्रांचा आवाज आणि बाजूला वाजत असलेल्या सनईचा आवाज यातील फरक ओळखणे अशक्य होऊन बसतं.

या आवाजात भर घालण्यासाठी लहान मुलांचा गोंधळ असतोच. आजकालच्या काळात कुठेही न मिळणारी मोकळी जागा बघूनच आधी मुलांना चेव चढलेला असतो. त्यात भर म्हणून रिकाम्या खुर्च्या असतातच. मग काय, त्या खुर्च्यांमधून रस्ता काढत काढत पकडापकडी खेळायची आयडिया कोणाच्या तरी सुपीक डोक्यातून निघते आणि मग सगळी मुलं वेड्यासारखी धावत सुटतात. लहान मुलंच ती! करून करून किती गोंधळ करणार? ही मुलं गोंधळ करण्याच्या बाबतीत त्या समस्त मुलांच्या मातांबरोबर कधीच स्पर्धा करू शकणार नाहीत. भाजीबाजारत चाललेल्या गोंधळाप्रमाणे गोंधळ इथे माजलेला असतो. फरक एवढाच की बाजारातल्या गोंधळात भांडण-तंटे अगदी उघड असतात. पण इथली सर्व भांडणं ही गनिमी काव्याने लढली जातात. आवाजाची पट्टी मात्र तीच असते बरं. या छुप्या लढायांना लागणारं साधन म्हणून देवानी 'सोनं' आणि 'साडी' अशा दोन 'स' ने सुरू होणाऱ्या वस्तू बनवल्या आहेत. काय गंमत आहे बघा, घरातल्या भांडणांना लागणारे सर्वात महत्त्वाचं साहित्य म्हणजे 'सासू' आणि 'सून' ही याच जातीतल्या आहेत. पण इथली भांडणं मात्र सासू सुनेच्या स्तरावरच अडकून पडत नाहीत. इथे अनेक स्तरावरची युद्धं एकदम खेळली जातात. एखादी नणंद आपल्या भावजयीला नवीन सोन्याच्या पाटल्या दाखवायला लागते.

नणंद : ''यांनी करून घेतल्या माझ्या वाढदिवसाला!''

भावजय : ''छान आहेत. कुठून घेतल्या?''

नणंद : ''ते केळकर रोडवर घाणेकरांचं दुकान आहे नं, तिथून''

भावजय : ''अरेरे! मी तर ऐकलं आहे की तो बरंचस सोनं खाऊन जातो. सात आठ हजाराचा तरी फटका बसलाच असेल तुला.''

झालं! नणंद त्यावर काही बोलू शकत नाही. तिचा एक पॉइंट भावाजयीच्या खिशात जातो. मग भावजय आपलं गळ्यातलं दाखवायला लागते.

भावजय : ''हे आमच्या लग्नाच्या वाढदिवसाला करून घेतलं. ऑफिसातून येता येता हेच घेऊन आले. एकदम घरी येऊन मला सर्प्राइज दिलं!''

नणंद : ''फारच छान दिसतंय! दादाचा चॉइस मस्तच दिसतोय. हे गळ्यातलं बनवणाऱ्या कारागिरचीही कमालच आहे. सांगितलं नाही तर कुणाला खरं सोन्याचंच वाटेल!''

हे वाक्य ऐकून, भावजयीच्या मनात जे भाव उत्पन्न होतात, त्याला मराठी साहित्यात तरी अजूनही शब्दरूप मिळालं नसल्यानं, 'क्रोध' किंवा 'राग' अशा पाणचट शब्दांनीच तुम्हाला भागवून घ्यावं लागेल.

'आनंद गगनात न मावणे' म्हणजे काय हे त्यावेळी नणंद अनुभवत असते. एका दगडात दोन पक्षी मारावे तसं तिने एका वाक्यात भावजयीच्या गळ्यातलं आणि तिचा गळा या दोघांनाही कापून काढलेलं असतं.

या सर्व बायकांचं पुढे, स्टेजच्या जवळ हे सर्व राजकारण चालू असताना, मागे पुरुष मात्र आरामात घोळका करून गप्पा मारत असतात. त्यांच्या गप्पांची गाडी तर 'राजकारण' आणि 'क्रिकेट' या दोन स्टेशनांना सोडून कुठे थांबतच नाही. 'राजकारण' झालं की 'क्रिकेट', आणि 'क्रिकेट' झालं की 'राजकारण'. एखादा पुरुष एकटा पडला असेल तर तो आपलं डोकं पेपरात घालून बसतो.

पण या सर्व लग्न सोहळ्यात सगळ्यात जास्त मजा असते ती म्हणजे, नुकतीच शालान्त परीक्षा दिल्यामुळे आपण कॉलेजात जाणार वगैरे स्वप्न बघणाऱ्या मुलांची. त्यांना नुकताच, 'स्टाइल' नावाची एक अदृश्य वस्तू असते आणि लग्न, मुंज, गणपती, दिवाळी अशा सार्वजनिक सोहाळ्यांमध्ये ती, विशेषतः एका 'गि'कारांत व्यक्ती अथवा व्यक्तीसमूहावर मारायची असते, असा शोध लागलेला असतो. त्यामुळे ते सर्व घोळका करून सगळ्या मंडपाच्या फेऱ्या घालत असतात. मंगलाष्टक चालू असताना, आपण वधू-वरांवर अक्षता टाकत आहोत असा भास निर्माण करून त्या इतरत्र, म्हणजेच इच्छित व्यक्तींवर, कशा पाडाव्या, याचं तंत्रही याच मुलांना अवगत असतं. तिथे स्टेजवर, मंगलाष्टक वेगवेगळ्या चालीत आणि वेगवेगळ्या पट्टीत म्हणण्याचे प्रयोग चालू असताना आणि त्यामुळेच समस्त लोकं अक्षतांबरोबरच जीवही मुठीत धरून उभे असताना, या मुलांची तपश्चर्या कशी भंग होत नाही तेच कळत नाही. नातेवाईकांची मंगलाष्टकं म्हणून संपतात आणि मुख्य भटजींची 'टिपिकल' या शब्दाखेरीज कुठल्याही शब्दात न व्यक्त करता येणाऱ्या आवाजात आणि चालीत मंगलाष्टकं म्हणणं सुरू होतं. आणि ''शुभमंगलऽऽऽऽ सावधान'' म्हणताच रामदास स्वामी पळाले नसतील त्या गतीने शेवटल्या रांगेतील सर्व माणसं पंगतीला पळतात.

पंगतीला बसल्याबसल्याच आपलं भांड हे उजव्या बाजूचं

आहे की डाव्या बाजूचं असा प्रश्न आणि आपल्या बाजूच्याने त्याच्या दोन्ही बाजूंची भांडी का वापरली असा उपप्रश्न पडतो. पंगतीच्या वाढप्यांना तर ही सर्व माणसं जलद जेवण्याचा विश्वविक्रम करण्यासाठी इथे आलेली आहेत असं वाटत असतं की काय कुणास ठाऊक. आता खूप लग्नांचा अनुभव गाठीशी असल्याने जो पदार्थ हवा असेल त्याला नको म्हणणं आणि नको असेल त्याला होकारार्थी मान हलवणं यात मी तरबेज झालो आहे. असं करावंच लागतं हो! लहानपणी आई-बाबांबरोबर लग्नाला जायचो तेंव्हा जेवणाच्या पंगतीत बसल्यावर कराव्या लागणाऱ्या कसरतीची वगैरे सवय नव्हती. घरी अळूच्या पातळ भाजीला स्पर्श न करणारा मी, या पंगतींमध्ये आठ आठ दहा दहा वाट्या पातळ भाजी प्यायलो आहे. वाढपी असा उजव्या बाजूनी डाव्या बाजूकडे धावत धावत पदार्थ वाढत (?) नव्हे टाकत जायचा. माझ्यासमोर आल्यावर पातळ भाजी त्याच्या हातात दिसली की मी 'नको-नको' वगैरे म्हणायचो आणि वाटीत पातळ भाजी पडलेली असायची. बरं, आई बाजूलाच बसलेली असायची. आईने डोळे मोठे केले की मी चूपचाप वाटी तोंडाला लावायचो. मग आठ-दहा वेळा असं झाल्यावर त्या वाढप्याला माझ्यासारख्या निरागस बालकाची दया यायची म्हणून किंवा मग सर्व पंगतीसाठी केलेली पातळ भाजी मी एकट्यानेच संपवून टाकलेली असायची म्हणून तो परत वाढायला येणं थांबवायचा.

असंच एकदा लहानपणी लग्नाच्या पंगतीला बसलो होतो. जीव आणि पातळ भाजी अशा दोन्ही गोष्टी कंठाशी आल्या होत्या. इतक्यात समोरच्या रांगेतून दोन वाढपी, एक पुरुष आणि एक बाई, असे दोघं तूप वाढत चालले होते. विशेषतः दोघांचे कपडे वाढप्याला न शोभणारे होते. त्यावर जिलबीचा पाक नव्हता की आमटीचा डाग नव्हता. ते वाढप्यांचे मुख्य वगैरे कोणीतरी असतील. मी आईला विचारणार पण होतो की तूप वाढायला ही दोन दोन जणं कशाला? तेवढ्यात ते आमच्या समोर आले. त्यापैकी जो पुरुष वाढपी होता त्यांने बाबांना ''सावकाश होऊ द्या'' असं म्हटलं आणि ती व्यक्ती डॉक्टर, इंजिनियर, क्लार्क, सुतार, चांभार, लोहार अशी कोणीही असू शकते, पण ती वाढपी असणं शक्यच नव्हतं हे मला कळलं.

सांगायचं तात्पर्य एकच की, या वाढप्यांनीच मला पंगतीत कसं जेवावं वगैरे शिकवलं आणि शिकणं भागच होतं हो! कारण लग्नाच्या पंगतीत माझी जी गत व्हायची ते टाळण्याचा तो एकच मार्ग होता. आताही मी पंगतीत जेवायला एकदम तरबेज झालोय अशातला भाग नाही. समोरून जिलबी चालली असताना नको नको म्हणूनही कधी कधी ती आपल्या ताटात न पडता बाजूच्याच्या ताटात पडतेच. पण त्यानं जास्तीत जास्त काय होतं तर मी उपाशी राहतो, पण पातळ भाजी खायची वेळ आता काही माझ्यावर येत नाही.

एकीकडे पंगत चालू असते आणि दुसरीकडे स्टेजवर वधूवरांचा ओळखीचा कार्यक्रम चालू असतो. आत्तापर्यंत वधू आणि वर या सोहळ्यातल्या सर्वात दुर्लक्षित व्यक्ती असतात. आणि आता त्यांना भेटायलाच रांगा लागलेल्या असतात. बऱ्याच जणांच्या हातात पत्रिकेमधील 'कृपया आहेर आणू नये.' असं वाक्य लिहून ज्या गोष्टीची आठवण करून दिलेली असते ती वस्तू असते. लग्नातला हाच एक कार्यक्रम असतो जो एकदम शिस्तीत चालतो. काय करणार? समोर कॅमेरा असतो ना!

एकावेळी सात-आठ माणसं स्टेजवर येतात. 'वर' त्याच्या नातेवाईकांची ओळख करून देतो, 'वधू' तिच्या नातेवाईकांची ओळख करून देते, मग हातातला आहेर दिला जातो. ''अहो हे कशाला?!'' आणि तत्सम वाक्य फेकून झाली की मग वर आणि वधू, तो आहेर खास आहेर धरण्यासाठीच स्टेजवर उभा केलेल्या चिंटू किंवा चिंगीकडे देतात. मग सगळ्यांचा एकत्र फोटो काढला जातो. समोर व्हिडिओ काढत असले तरी लोकं फोटोसारखी स्थिर का उभी राहतात हे मला आजपर्यंत कळलेलं नाही.

असो. पुढचे काही कार्यक्रम हे घरातल्या फक्त खास मंडळींसाठी राखून ठेवलेले असतात. आहेरांची देवाण-घेवाण, मुलीची पाठवणी वगैरे वगैरे. आपल्या घरातलं कार्य नसेल तर आपण तिथे थांबायचं नसतं. जेवण झाल्यावर विड्याच्या ताटातून जे तीन-चार विडे चूपचाप उचलून आपण कुडत्याच्या खिशात ठेवलेले असतात ते काढून खात खात रमत-गमत घरी जाऊन मस्त झोप काढणे हा आता पुढचा प्लॅन असतो.

तर या अशा माझ्या लहानपणापासून ते आत्तापर्यंत अनुभवलेल्या लग्न समारंभाच्या सुखद आठवणी. मी मरेपर्यंत तरी लग्न संस्था टिकून राहो आणि लग्नाच्या आमंत्रण पत्रिका दारी पडत राहोत हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# Thanks to Our 2024 Gold and Event Sponsors



















किलबिल मराठी शाळा
2.0
परदेशात स्थायिक झालो तरी मातृभाषेविषयी आपल्याला
वाटणारं प्रेम, त्यातून मिळणारी शिकवण म्हणजे
न संपणारी शिदोरी! हीच प्रेमाची शिदोरी पुढच्या पिढ्यांना
मिळत राहावी यासाठीच केलेला अट्टाहास म्हणजे
किलबिल मराठी शाळा!
सुबद्ध अभ्यासक्रम, उत्तम, निःस्पृह शिक्षकवर्ग आणि मराठी
भाषेचे शिक्षण आनंदाचे करणारी शाळा म्हणजे आपली
किलबिल मराठी शाळा!
CONTACT : kilbil.marathishala@gmail.com


MSBC's AAVARTAN
आवर्तन
MSBC
VANCOUVER
सहभागी होण्यासाठी, संपर्क साधा at msbcinquiry@gmail.com